१ फेब्रुवारी ७४
एक रुपया

# मार्मिक

चित्र वार्ता पुस्तक






# माणूस चित्र वार्ता पुस्तक

एक फेब्रुवारी १९७४ एक रुपया अंक तेरावा

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे



## वरळी दंगल

### चित्र कथा

छाया । मोहन नावेलकर

**नामदेव ढसाळ**

ढाले–ढसाळांचे नेतृत्वच पँथरचे भविष्य ठरविणार !



बुद्धं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।।

सर्वाभूती समानता सांगणारा बौद्ध धर्म गौतम बुद्धांनी इथं रुजवला. हिंदू-धर्म मार्तंडांशी टक्कर देत देत रुजवला.

पण हजारो वर्षानंतरही या देशात दलितांवरील अत्याचार चालूच आहेत. महर्षि शाहू महाराज, ज्योतिबा फुले, आगरकर, गांधी, सावरकर असंख्य समाज सुधारकांनी प्रयत्न करूनही हे अत्याचार थांबले नाहीत.

शेवटी बाबासाहेबांनी पुन्हा एकदा या देशात बौद्ध धर्माला उजळा दिला. कोटयवधी पददलितांना, त्यांची अस्मिता मिळवून देण्यासाठी बौद्ध धर्माची, शांतता धर्माची, इथल्या मातीशी इमान राखणाऱ्या धर्माची दीक्षा दिली.

पण डॉ. आंबेडकरांच्या ह्या प्रयत्नांनीदेखील दलितांवरील अत्याचार थांबले नाहीत. उलट अलीकडच्या काळात हे अत्याचार वाढतच आहेत. त्याचीच नैसर्गिक प्रतिक्रीया म्हणून दलित पॅन्थर ही लढाऊ संघटना उभी राहिली...

दलित पॅन्थरचे नेते श्री. राजा ढाले यांच्या एका लेखानेच ('साधना'मधील राष्ट्रध्वज प्रकरणातील ! ) पॅन्थरने मोठी खळबळ उडवून दिली. त्या पाठोपाठ मनुस्मृति, गीता आदि हिंदूंचे धर्मग्रंथ जाळून त्यांनी पॅन्थरचे अस्तित्त्व मजबूत केले. ताज्या निवडणूक बहिष्कारांमुळे दलित पॅन्थरला दलितांची प्रातिनिधीक संघटना म्हणून निर्विवाद स्थान मिळाले.

पण पॅन्थर्सच्या भाषणांनी, कृतिनी प्रतिक्रीयांना देखील आमंत्रण दिले. त्यातूनच, मुंबईत तब्बल पंधरा-सोळा दिवस तंग वातावरण निर्माण करणारी दंगल उसळली.....




दगलात बुद्ध विहार देखील सुटला नाही. शांततेसाठी आयुष्य वेचणाऱ्या भगवान बुद्धांच्या, ज्योतिबा फुल्यांच्या, बाबासाहेबांच्या साक्षीनंच हे बुद्ध मंदीर उध्वस्त झालं.....



एका भाषणाच्या निमित्तानं पसरलेल्या दंगलीनं बुद्ध मंदिराला तडाखा दिला, तसाच तो बौद्ध वसाहतींनाही बसला. वरळी, नायगाव भागातल्या बी. डी. डी. चाळीतून अक्षरश: दगड, विटा, बाटल्यांचे खच पडले. हातगाड्यांची मोडतोड झाली. असंख्य लोकांना गंभीर जखमा झाल्या.

दोन जमातीतली दंगल म्हणजे पोलिसांचा हस्तक्षेप आलाच. दंगल शमविण्यासाठी अश्रुधुरांची नळकांडी पोलिसांनी फोडली. किती त्याची मोजदाद नाही. पण चाळींच्या तोंडाशी जाऊन अशी नळकांडी बरीच फोडली. त्यात छोट्या तान्ह्या मुला-मुलींची पार वाट लागली एवढं मात्र खरं !





अश्रुधुरापाठोपाठ पोलिसांचे जथ्थे चाळीचाळीतून घुसले. चाळीतले दगडविटांचे साठे तर त्यांनी बाहेर काढलेच, पण त्यांनी घराघरांतून माणसंही टिपून बाहेर काढली, मारझोड करीत कस्टडीत नेली.

अश्रुधूर, लाठीमार या पोलिसी कारवायांनी, आधीच दंगलींनी पोळलेला दलित समाज पार भांबावून गेला तर त्यात नवल नाही....
यशोदाबाई कांबळे या वयस्क बाई मात्र म्हणतात, " बाबासाहेबांची आम्ही लेकरं आहोत. किती मारू देत त्यांना, आम्ही डरणार नाही. परमेश्वर वरनं बघतो आहे. तो कधी ना कधी न्याय देईलच. "





अश्रूधूर, लाठीमारानंतर ही थोडी शांतता – अर्थात भितीग्रस्त ! आणि चाळीच्या सीमारेषेपाशी जमलेली ही मंडळी बहुधा: 'युद्धस्य कथा' सांगण्या-ऐकण्यात रमलेली असावीत – युद्ध ज्यास्त जवळून पाहता येत नाही कारण 'बापरे, दरोगा साहब खडे हैं न पिस्तौल लेके !'

नायगाव, वरळीत अशी तकलुपी शांतता अनेकदा आली. पण थोड्याशाच शांततेनंतर कुठूनतरी दगड येत, पाठोपाठ दगडविटांचा भन्नाट मारा सुरू होई. आरोळ्या, किंकाळ्या – अन् पाठोपाठ लाठीम अश्रुधूर, गोळीबार.....






मोर्चे, पोलिस बंदोबस्त, पोलिसांच्या उगारलेल्या काठ्या. पोलिसांनी तरुण पोरांना फरफटत नेल्याच्या तक्रारी इथे अनेक आहेत....बेछूट लाठीमारात डोकी फुटल्याच्याही आहेत.....

५ जानेवारी ते २० जानेवारीपर्यंत चाललेल्या या दंगलीत शिवसेना–दलित पॅन्थर्स असा संघर्ष होता असे कुणी म्हणतात. सवर्ण हिंदूंनी पोलिसी सहकार्याने दलितांवर हल्ले चढवले असे दुसरे कुणी म्हणतात. काही असले तरी, एक मात्र खरे, आणि ते हे की ह्या काळात भरपूर पिटून निघाला तो मात्र दलित समाजच – विरोधकांकडून आणि पोलिसांकडूनही ! दोन बळीही ह्या दंगलीने घेतले आहेत. तेही दलित समाजाचेच !!


दंगल काळातल्या बहुतेक वेळात पॅन्थर्स नेते अटकेत तरी होते किंवा भूमिगत तरी ! आणि खास रिपब्लिकन नेत्यांनी ह्या काळात ह्या समाजाकडे पाठच फिरवली. इतरही पुढारी मंडळी एरवी सर्वत्र लगबगीनं धावून जातात. पण इथे मात्र दंगलींच्या दोन्ही हप्त्यात (५ ते १२ आणि १५ ते २० जाने.) चार चार दिवस वरळीकडे, नायगावाकडे फिरकली देखील नाहीत.






शेवटी, जेव्हा चारी बाजूंनी या अत्याचारांविरुद्ध आवाज उठला. वृत्तपत्रांनी दलितांची बाजू घेऊन शासनाला धारेवर धरलं, तेव्हा २० तारखेला विविध नेत्यांनी महापौर सुधीर जोशी ह्यांच्या नेतृत्त्वाखाली या विभागातून शांतियात्रा काढल्या. दोन्ही बाजूंना शांततेचं आवाहन केलं.

लोकांनी शांततेचं आवाहन ऐकलं. इथे आज शांतता नांदते आहे. २० लाच संध्याकाळी नामदेव ढसाळ आदी पॅन्थर्स नेत्यांची मुक्तता होऊन त्यांची मुख्यमंत्र्यांशी बोलणीही झाली...
पण ही वरवरची शांतता आहे. तिथे असंतोष, परस्पर द्वेष खदखदतो आहे.
शांतियात्रा काढणारे, हात जोडून शांततेसाठी आवाहन करणारे जोपर्यंत ह्या समाजाच्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत नाहीत तोपर्यंत ही शांतता, ही शांती-कबुतरे दिखाऊच राहतील ! ह्या दिखाऊ शांततेतून केव्हाही भडका उडू शकेल !!





# अराजकाची चाहूल ...

२ जानेवारीला 'महाराष्ट्र बंद' झाला. तेव्हापासून तो तहत् आज तागायत मुंबईतले जीवन अतिशय अस्थिर झाले आहे. निवडणुकीतल्या कांग्रेस पराभवानंतर विरोधी पक्षीयांनी आपला आवाज अधिक बुलंद केला आहे, परिणामतः वेगवेगळी आंदोलने गती घेत आहेत. ती आंदोलने दडपून टाकण्याच्या शासनाच्या प्रयत्नात आंदोलनांना वेगळे वळण लागत आहे. दगडफेक, अश्रुधूर, गोळीबार. दंगलींची ही वर्णने असल्याशिवाय रोजचे वर्तमानपत्र मुंबईत निघूच शकत नाही, असेच जणू गेल्या काही दिवसातल्या बातम्यांवरून वाटायला लागले आहे...

ठाणे, जोगेश्वरी आदी भागातून दंगली भडकल्याच्या व शांत झाल्याच्या काही बातम्या येत असल्या तरी, दैनंदिन उलाढाली होत होत्या त्या वरळी, नायगाव, दादर, वडाळा, परळ, लालबाग, लव्हग्रोव्ह आदी मध्य मुंबई विभागातच ! सचिवालयात, मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर महागाई विरोधी महिला आघाडीच्या महिलांनी आ. श्रीमती मृणाल गोरे यांच्या नेतृत्त्वाखाली धरणे धरले तेव्हा तिथे काही भयानक प्रकार घडले पण त्याचेही पडसाद उठले ह्या मध्य मुंबई विभागातच. एकूण निवडणूक काळात मध्य मुंबई तापली ती अद्यापही शांत झालेली नाही. नायगाव, वरळीतले गोळीबार, तिथल्या दंगली, गिरणगावातले विराट मोर्चे, मोर्च्यांवरचे लाठीहल्ले, गोळीबार, महिला आघाडीच्या सभा, मोर्चे ह्या साऱ्यांनी ह्या विभागातले वातावरण तापले होते, तापत राहिले...

ही सारी आंदोलने वेगवेगळ्या कारणांनी होत होती. गिरणगाव पेटून उठले होते ते गिरण्यातल्या बेमुदत संपाबाबत तोड निघत नाही म्हणून. संपावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मोर्च्यांवर इथे हल्ले होत आहेत म्हणून संपकरी, कर्मचारी, त्यांच्या स्त्रिया रस्त्यात उतरल्या आहेत. गिरण्यांच्या फाटका फाटकांवरून ह्या स्त्रियांची निदर्शने होत आहेत. गिरणी कामगारांच्या मोठाल्या सभा होताहेत, निदर्शने, मोर्चे, सभा चिरडण्यासाठी पोलीसी बळाचा प्रयत्न होतो आहे. संपविरोधकांकडून संप चिरडून टाकायसाठी सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा होत आहे. तरीही संप मजबूतीने चालू आहे. इंटक, मालक, कांग्रेस, सरकार कुणाचेही ऐकायला इथला कामगार तयार नाही !

पृष्ठ ११ वर


मध्यवस्तीत बिनपागडीची जागा उपलब्ध..
चौकशी:
बी. डी. डी. चाळ
काँग्रेसची
सर्व राज्यातील सर्व जागांसाठी
तिकीटे विनामूल्य मिळतील.
त्वरा करा!!
कोण म्हणतो टंचाई आहे ?
उमेदवार पडल्यास प्रथमोपचार
फुकट!


अहो, बाईंचा दौरा रद्द झाला. मग एवढ्या काळ्या निशाणांचं करायचं तरी काय असा प्रश्न पडला.


एखादं तरी झेला की! मला डॉक्टरनी अंडं द्यायला सांगितलं आहे !!

# प्रवाह बदलला

सु. ल. सोमण

५ जानेवारीला वरळीतले वातावरण तापले. १३ जानेवारीच्या पोटनिवडणुकांपूर्वी दोन दिवस ते काहीसे निवळले. पण निवळताना दलित पन्थर्सचा निवडणुकीवरील बहिष्कार घोषित होऊनच ते निवळले. निवडणूक निकालाला वेगळी कलाटणी मिळाली ती इथेच असे मुंबईतल्या काँग्रेसच्या पराभवासंबंधी बोलताना म्हटले जाते. पण वरळी, नायगावच्या चाळीतून हिंडल्यानंतर मात्र मला असे जाणवले की, हा बहिष्कार नसता पडला तरी काँग्रेसला निवडणूक जिंकता आली नसती. उलटपक्षी, हे दलित मतदानही काँग्रेस विरोधात जाऊन अधिक मोठा पराभव काँग्रेसला स्वीकारावा लागला असता. ह्या मतदारांशी मी बोललो तेव्हा मला एक बदल त्यांच्यात, त्यांच्या पूर्वीच्या पार्श्वभूमीवर निश्चित जाणवला. ह्या दलितांची एक गठ्ठा मते आता कुणालाही विकत घेता येणे शक्य नाही. ही मंडळी आता बरीच विचार करिताहेत असे दिसते. भंडारे, कांबळे, खोब्रागडे, गवई, रूपवते वगैरे मंडळींच्या एकेकाळच्या पुण्याईचे भांडवल करून संपूर्ण दलित मत एका बाजूला खेचता येईल अशा भ्रमात आता कुणी न राहिलेले बरे! आज बाबासाहेबांचे नाव घेऊन उभ्या राहिलेल्या 'दलित पॅन्थर्स'ला हा समाज मानतो आहे. ते नेतृत्व जर उद्या थिटे पडले तर त्यालाही फेकून द्यायला हा समाज तयार आहे, एवढा पूर्वविचार तिथल्या तरुणात आढळतो! आणि हा संपूर्ण समाज आज तरी पूर्णपणे काँग्रेसविरोधी आहे. त्यांच्या शब्दाशब्दातून ही चीड जाणवते. आणि म्हणूनच बहिष्कार नसता पडला तरी हे मत काँग्रेसविरोधात गेले असते, काँग्रेसच्या बाजूने नाही ह्याविषयी माझ्या मतात संदेह नाही!

शिवसेनेच्या पाठिंब्यामुळे काँग्रेसी मतांवर विपरीत परिणाम झाला आणि काँग्रेस पडली हा दुसरा एक विचार मांडला जातो. खुद्द श्री. बाळ ठाकरे यांनी ह्या विचाराला चालना दिली आहे. मला त्यातही तथ्य वाटत नाही. शिवसेनेमुळे, काँग्रेसला होणारे मतदान कमी झाले असे तर नाहीच, पण शिवसेनेच्या पाठिंब्यामुळे काँग्रेसला शिवसेनेची अशी जास्त मते मिळतील असे जे वाटत होते तेही खोटे ठरले. यात 'सेनापती' (??) बाळ ठाकरे ह्यांचे नेतृत्व फार फार उघडे पडले. शिवसेनेत फूट नाही ही बाळ ठाकऱ्यांची वल्गनाही फोल ठरली. १८ डिसेंबरच्या बंदच्या यशाने (त्याचे नेमके गमक कशात होते हे आता शिवसेनेने स्वतःलाच विचारून पहावे!) आलेली धुंदी निवडणूक निकालाने उतरली आणि शिवसेनेने व श्री. ठाकऱ्यांनी परखड आत्मपरीक्षण केले, तरी निवडणूक निकालाचा शिवसेनेला फायदा झाला असे मी म्हणेन. एरवी, निवणुकीत प्रत्यक्ष भाग न घेताही तिच्या निकालाने शिवसेनेला तडे जातील, मात्र मिळणारी काही ज्यादा मते अनपेक्षितपणे मिळाली नाहीत एवढाच तोटा काय तो काँग्रेसचा होईल!

वर उल्लेखिलेल्या दोन घटनांमुळेच (दलित पॅन्थर्स व शिवसेना पाठिंबा!) मुंबईतल्या निवडणूक निकालाला कलाटणी मिळाली हे मात्र खरे नाही. त्याचप्रमाणे केवळ कापसाच्या प्रश्नावरूनच रामटेकला काँग्रेस हरली हेही बरोबर नाही. सावंतवाडीला असा कुठला विवाद्य मुद्दा होता? सांगोल्यात प्रक्षुब्ध जनमत विरुद्ध शासकीय समर्थन (?) ह्याशिवाय तिसरा पक्षच नव्हता. ह्या दोन्ही ठिकाणी काँग्रेस का हरली? इथे तर शिवसेना नव्हती. दलित पॅन्थर्सचा बहिष्कारही नव्हता!

मला असे वाटते की, काँग्रेसच्या ह्या साऱ्या ताज्या पराभवांचे एकमेव कारण हेच की, ६७ प्रमाणेच आज पुन्हा जनमताचा प्रवाह बदलला आहे! १९६७, मध्ये ६५ साली पाकिस्तानबरोबरचे युद्ध जिंकूनही, जनमताच्या प्रवाहात बडे बडे धुतले गेले. अनेक आराखड साफ कोलमडून पडले. १९७१ मध्ये या प्रवाहाचा ओघ पुन्हा काँग्रेसकडे वळला आणि मी मी म्हणणारे विरोधक पार झोपले. गेल्या तीन वर्षात जनतेचा निःसंदिग्ध कौल मिळूनही काग्रेस पक्षाने जनतेची दैनंदिन गाऱ्हाणी यत्किंचितही कमी केली नाहीत. प्रत्येक बाबतीत जनता जास्त जास्तच होरपळून निघायला लागली. आज ७४ मध्ये ह्या प्रवाहाने पुन्हा नवे वळण घेतले आहे. त्यातच काँग्रेसच्या ह्या ताज्या पराभवांचे मूळ आहे. म्हणूनच, मुंबईच्या निवडणुकीच्या निकालावर दलित पॅन्थर्सने किंवा शिवसेनेने घेतलेल्या निर्णयांचा परिणाम झाला असे म्हणण्यात फारसा अर्थ नाही.

केवळ महागाईने त्रस्त झाल्यामुळेच जनतेने विरोधी कौल दिला. हा कौल मुळात काँग्रेस विरोधी नाहीच! काँग्रेसचे हे आत्मसंतुष्ट समीक्षणही खोटे तर आहेच आहे, पण काँग्रेसच्या दृष्टीने धोकादायकही आहे. गेल्या तीन वर्षात काँग्रेसने काही भरीव कामगिरी केली असती, तर वाढत्या महागाईतही जनता काँग्रेसबरोबरच राहिली असती. पण आपसातले हेवेदावे, खुर्च्यांसाठीची मारामारी ह्या व्यतिरिक्त या तीन वर्षात काँग्रेसने काहीही भरीव कार्य केले नाही. कामगार लढे नेटाने चिरडून टाकीत असताना, दुसऱ्या बाजूने साखर, कापड वगैरे जीवनावश्यक वस्तूंचे भाव मात्र शासनाने वाढवून दिले. बारा किलोच्या मागणीचे सोडाच, पण पाच सात किलोही धान्य वेळेवर व योग्य किंमतीत शासनाने पुरविले नाही.' मात्र त्याचवेळी, खुल्या बाजारात व 'काळ्या बाजारात' अन्नधान्य चढ्या किंमतीत हवे तेवढे उपलब्ध होते. धान्याचे, वनस्पतींचे चोरटे साठे बाहेर

काढले ते विरोधी पक्षियांनी! विरोधी पक्षाच्या मंडळींना जे कळते ते काँग्रेसवाल्यांना कळत नाही, शासनाच्या नजरेत येत नाही, ह्यावर शेंबडे पोर तरी विश्वास ठेवील का? पण कळूनही शासन, काँग्रेस हे धान्य बाहेर काढीत नाही ह्याचा अर्थही लोकांना कळतो. 'गरिबी हटाव' आणि 'समाजवाद' घोषणेतच फक्त, व्यवहारात नाही, हे जनतेला अशा घटनांनी चांगले कळले व म्हणूनच ती कडवेपणाने काँग्रेसविरोधात उभी ठाकली. केवळ तात्पुरत्या उद्रेकांमुळे नाही!! उत्तर प्रदेश आदि ठिकाणच्या निवडणुकातही हा प्रवाह लोकांच्या कल्पनांना जबरदस्त हादरे देईल याची मला तरी खात्री वाटत आहे!!

इतके असूनही, काँग्रेस काही निर्भीड आत्मपरिक्षण करील हे काही संभवत नाही. आणि २३ व्या प्रजासत्ताकाच्या दिनी जनतेचे दुर्दैव हे की, ह्या वेळी, एकच एक असा कुठलाही मातबर विरोधी पक्ष नाही की जो आज जनतेचा आधार बनू शकेल. त्यामुळे ही विरोधाची लाट वाढत जात जेव्हा पुन्हा १९६९–७० ची अवस्था निर्माण होईल, तेव्हा पुन्हा एकदा नाइलाजाने जनता काँग्रेसकडे वळेल. त्यावेळची काँग्रेस कदाचित पुन्हा थोडी नवी झिलई दिलेली असेल! 'गरिबी हटाव'सारखी एखादी नवी घोषणा घेऊन आलेली ही 'आणखी नवी' काँग्रेस असेल!! भारतात जिवंत लोकशाही असल्याची जी ग्वाही अशा प्रसंगी मतदार देतो, त्याचा एवढा जुजबीच जर फायदा होणार असेल, तर कालांतराने मतदारही लोकशाही जिवंत ठेवायला कंटाळेल. आजच्या हिंसाचारी घटनांमध्ये, जर अराजकाची नांदी कुणाला दिसत असेल तर ज्या क्षणी मतदार असा लोकशाही जिवंत ठेवायला कंटाळेल त्या क्षणी अराजकाची भीषण पूर्तता होईल. विरोधी पक्षांनी हे नीट लक्षात घेऊन त्यांनीही आत्मपरीक्षण केले पाहिजे. काही चार आठ विजयांनी बेभान होऊन जर ते वागले तर विरोधी पक्षांचीही काँग्रेस व्हायला वेळ लागणार नाही. १९७१ मध्ये त्याची प्रचिती एकदा आलेली आहेच. पुन्हा न येवो ही सदिच्छा!

किमान एवढे सर्व बाजूंनी परखड आत्मपरिक्षण होऊन, काँग्रेस पडल्यास विरोधक जबाबदारपणे ('संविद' पद्धत नव्हे!) शासनाचा गाडा रेटू शकतात असे जनतेला आढळून आले, तर तेविसाव्या प्रजासत्ताकाच्या मुहूर्तावर जनमताचा जो प्रवाह बदलला आहे त्याचे चीज होईल! एरवी, आहेच, ये रे माझ्या मागल्या!!

## अराजकाची चाहूल

पृष्ठ ६ वरून

वरळी-नायगावातल्या दंगली भडकताहेत वर्णकलहामुळे–सवर्ण हिंदू आणि नवबौद्ध ह्यांच्यात! ह्या दंगलीच्या मुळाशीही काही प्रमाणात मध्यमुंबईतली निवडणूकच होती. ह्या निवडणुकीवर दलित पॅन्थरनी घातलेला बहिष्कार व त्यातून सिद्ध झालेले पॅन्थरचे नेतृत्व ही ह्या निवडणुकीतली महत्त्वाची घटना! ह्याच बहिष्काराच्या निमित्ताने झालेल्या भाषणातून वरळी नायगावच्या दंगली उद्भवल्या हे लक्षात घेता, 'दलित पँथर्स' चळवळच दडपून टाकायसाठी काँग्रेस–शासन–शिवसेना या त्रयीचा तो एक डाव आहे.' ह्या दलित पँथर्सच्या आरोपातला अर्थ लागू शकतो आणि आज 'शांति-यात्रा' काढून तिथे शांतता काही प्रमाणात नांदली असली तरी, एकूण प्रकारातून डिवचला गेलेला पॅन्थर शांत बसेल हे संभवत नाही. तिसरे, ह्या काळात गाजलेले आंदोलन, म्हणजे महागाई विरोधी महिला आघाडीचे आंदोलन. सचिवालयात ह्या महिलांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे धरणे धरले. तिथे मंत्र्यांनी महिला शिष्टमंडळाची भेट न घेता, पोलिसाकरवी त्यांची उचलबांगडी करण्याचा जो प्रकार घडला त्यामुळे एकूण वातावरणच तापलं. महिलांचे मोर्चे, त्यांच्या सभा ह्यांचे एक नवीन सत्रच त्या निमित्ताने सुरू झाले! हे तिन्ही संघर्ष वेगवेगळ्या कारणांनी, वेगवेगळ्या ठिकाणी उभे राहिले असले तरी, त्या सर्वांमध्ये एक समान सूत्र होते. सरकार विरोध हे ते समान सूत्र. महागाई रोखण्यात सरकारला अपयश आलेले आहे. गिरणी कामगारांच्या संपात, कामगारांनी इंटक-मालक कराराविरोधी स्पष्ट कौल दिलेला असतानाही न्याय देण्यात शासनाने टाळाटाळ केली आहे. समाजवादाच्या लंब्याचवड्या गप्पा मारून, दलितासाठी कायदे कानू तयार करूनही दलितावर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध गंभीर उपाययोजना करण्यात तर शासनाने अक्षम्य कुचराई केली आहे. एकूण सर्वच आघाड्यावरचे सरकारी अपयश ह्या सर्व लढ्यांच्या मुळाशी आहे आणि शासनाने जर त्वरित काही उपाय योजले नाहीत, जनतेच्या पदरात भरीव असे काही टाकले नाही तर, दलित पॅन्थर्ससारख्या कडव्या लढाऊ संघटना हाच सामान्य जनतेला आधार वाटेल! प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर ही अराजकाची चाहूल उपेक्षणीय खचितच ठरू नये!! ■

# परसूच्या पशुकथा

**वसंत सबनीस**

परशुराम हा आमचा फार जुना मित्र. लहानपणापासून हरहुन्नरी. कुत्री, मांजरे, कबूतरे, पोपट पाळण्याचा त्याला विलक्षण नाद होता. अभ्यासाकडे त्याचे लक्ष क्वचितच असे. तो कधी अभ्यासाबद्दल बोलल्याचे मला आठवत नाही. नेहमी कुत्र्यांचे पराक्रम, पोपटाची प्रगती, मांजराच्या युक्त्या याबद्दल त्याचे पुराण चालावयाचे. आमची एकदा वार्षिक परीक्षा चालू असताना वर्गाच्या खिडकीत एक कबूतर येऊन बसले. त्याबरोबर परसू पेपर टाकून त्या कबुतरामागे पळाला. इतका नादिष्ट. मात्र खेळात प्रवीण. या एकाच गुणामुळे तो मॅट्रिकच्या मंडपात जाऊन आला. पलीकडे मात्र गेला नाही.

असा हा बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसांचा परसू शाळा सोडून एके दिवशी नाहीसा झाला. आमची एक मोठी करमणूक गेली. तो कुत्र्या-मांजरांच्या गोष्टी खुलवून खुलवून सांगायचा आणि सांगताना तल्लीन व्हायचा. आपल्या कुत्र्यांना घेऊन तो छोटया छोटया शिकारीही करायचा आणि त्याच्याही कथा मोठया रंगतदारपणे सांगायचा. म्हणूनच परसू गाव सोडून गेला तेव्हा आम्हाला फार चुकल्यासारखे वाटले. पुढे आम्ही आमच्या व्यवसायाला लागलो. त्यात गुंतून गेलो. परसूला जवळ जवळ विसरून गेलो.

वीस वर्षांचा काळ उलटला. एके दिवशी गावात एक सर्कस आली. वाघसिंहांच्या पिंजऱ्यात काम करणारा इसम पाहताच मला एकाएकी परसूची आठवण झाली. लहानपणीचा परसू आणि तो इसम यात तसा काही फरक दिसत नव्हता. पूर्वीपेक्षा तो थोडासा उंच झाला होता. बाकी गोटीवंद शरीर, झुपकेदार केस, सावळा वर्ण, सर्व काही जसेच्या तसे होते. सर्कस सुटल्यावर मी मुद्दाम चौकशी केली. तो परशुरामच होता. दोघांनाही खूप आनंद झाला. परसूने इतक्या वर्षांत काय काय केले हे जाणून घेण्याची मला फार उत्सुकता होती. सर्कशीचा दोन-तीन आठवडे मुक्काम होता. त्या मुक्कामात परसू रोज दुपारी माझ्याकडे येत असे. आम्ही जुन्या आठवणी काढून खूप हसत असू. त्याचे जुने खेळ आठवून आठवून त्यात रंगत असू.

परसू गाव सोडून जो गेला तो नोकरी शोधीत फिरत राहिला. एका प्राणिसंग्रहालयात त्याला नोकरी मिळाली. निरनिराळ्या प्राण्यांवर देखरेख करण्यात त्याचे मन रंगून गेले, पण त्याला समाधान वाटले नाही. काही दिवस तो एका बोटीवर कामाला राहिला. तेथूनही तो निघाला आणि एका संस्थानिकाच्या पदरी राहिला. संस्थानिकाबरोबर शिकारीला जाणे, त्याना शिकारीच्या कामात मदत करणे वगैरे कामे त्याला करावी लागत असत. यामुळे शिकारीचे तंत्रही त्याने आत्मसात केले. मधून मधून कंटाळा आला की, तो आपल्या चुलत्याकडे येऊन राहत असे. थोडे दिवस विश्रांती घेऊन पुन्हा आपल्या कामावर जात असे. [पुढे संस्थाने विलीन झाली आणि परसूला नवी नोकरी शोधावी लागली. कलकत्त्यात एका बंगाली माणसाकडे तो राहिला. निरनिराळ्या सर्कशींना, प्राणिसंग्रहालयांना वन्य श्वापदे पुरविण्याचा त्याचा धंदा होता. परसू या कामात त्याचा मदतनीस झाला. मलायाच्या जंगलात जाऊन श्वापदे पकडणे किंवा तेथील आदिवासींनी पकडलेली श्वापदे विकत घेऊन ती निरनिराळ्या सर्कशींना व प्राणिसंग्रहालयांना विकणे या कामात परसू तयार झाला. धाडस तर मुळातच त्याच्या स्वभावात होते. त्यामुळे या धंद्यात त्याचा फार जम बसला. त्याच्या मालकाचे व त्याचे नंतर खटके उडू लागले, तेव्हा परसूने स्वतःचा धंदा सुरू केला. परंतु युद्धकाळात त्याच्या धंद्याला ओहोटी लागली. वेळेवर बोटी मिळेनात, सर्वत्र युद्धकार्याला प्राधान्य असल्यामुळे त्याची दाद लागेना. धंद्याची घडी विस्कटली. त्यातच युद्धाचे पाय मलाया, सिंगापूर व कलकत्त्यालाही लागल्यामुळे परसूच्या धंद्यावर मोठाच घाला आला.

त्याच सुमारास रंगूनहून भारतात परत जाणाऱ्या एका सर्कशीत तो दाखल झाला. मालकाने त्याचा वन्य श्वापदांचा अनुभव ध्यानात घेऊन त्याला ठेवून घेतले. लहान सहान कामे करीत करीत त्याने वाघ-सिंहाकडून कामे करवून घेण्यात विशेष कौशल्य दाखविले. दोन-तीन सर्कशी बदलून तो सध्याच्या सर्कशीत राहिला होता. परसूच्या ह्या प्रगतीचा आणि नाट्यपूर्ण जीवनाचा मला अभिमान वाटला. त्याला आलेले अनुभव ऐकावेत, त्याच्या गोष्टीत रंगून जावे असे वाटत असे. परशुरामही बऱ्याच वर्षांनी माझी भेट झाली म्हणून विशेष खुशीत होता. त्या पंधरा दिवसात आम्ही वीस वर्षांच्या गप्पा मारून घेतल्या. त्याने आपल्या शिकारीचे, जंगलातील वास्तव्याचे, वन्य प्राण्यांच्या स्वभावाचे अनेक प्रसंग सांगितले. कुत्र्याच्या गोष्टी सांगितल्या, कोल्ह्याच्या कसबाच्या कथा सांगितल्या, लांडग्याच्या मिजासीचे प्रसंग सांगितले, माकडाच्या अपत्यप्रेमाच्या गोष्टी निवेदन केल्या, पण त्यात एक वैशिष्ट्य होते. नेहमीसारख्या शिकारीच्या गोष्टी न सांगता त्याने वन्य पशूंच्या स्वभावांचे विशेष, त्यांच्या लकबी, सवयी, त्यांचे विचार, प्रसंगावधान, त्यांचे मातापित्यांकडून होणारे शिक्षण, यावर अधिक भर दिला. वन्य पशूंच्या भावभावनांचा, हालचालींचा त्याने जवळून अभ्यास केला होता. त्याने कितीतरी गोष्टी सांगितल्या. मी त्याला त्या सर्व लिहून काढायचा आग्रह केला, पण तो म्हणाला, 'लिहिण्याचे नाव काढू नकोस, तू लिही पाहिजे तर, तू म्हणशील तितक्या गोष्टी सांगतो.' मग मीही विचार केला की, त्याने सांगितलेल्या गोष्टी थोडया नीटनेटक्या स्वरूपात लिहिल्या तर हमखास वाचनीय ठरतील. म्हणून परसूने सांगितलेल्या कथा शक्यतोवर जशाच्या तशा सांगण्याचा हा प्रयत्न केला आहे.

—वसंत सबनीस

या एकूण सात कथा आहेत. 'राजहंस'ने दहा वर्षांपूर्वी या कथांचे पुस्तकही काढलेले आहे. पुस्तकातील एक कथा तूर्त येथे पुनर्मुद्रित केली आहे. वाचकांना ती आवडली तर इतरही कथा चित्रवार्ता अंकातून क्रमशः सादर करता येतील.

# १ : राजा

जंगलाचे सम्राटपद सिंहाकडे असले, तरी हिरण्य जंगलाचे सम्राटपद मात्र त्याला मिळाले नव्हते. वास्तविक हिरण्य हे जंगल नाही. ते भले मोठे कुरण आहे. हिरण्य नदी त्या भागातून वाहत जाते व त्यामुळे वैरण विपुल पिकते. तेथे मोठेमोठे गुरांचे कळप चारण्यासाठी नेले जातात. अशा या हिरण्य जंगलाचे–किंवा कुरणाचे म्हणा हवे तर–राजेपण एका करड्या रंगाच्या लांडग्याने भूषविले होते.

त्या भागातील लोक त्याला ‘राजा’ या नावाने ओळखीत असत. राजा हा लांडग्यांच्या एका कळपाचा धिप्पाड असा नेता होता. या कळपाने अनेक वर्षे या भागात धुडगूस घातला होता. त्या भागातील गुराख्यांना व शेतकऱ्यांना राजा चांगलाच माहीत होता आणि ज्या ज्या वेळी तो आपल्या कळपासह तेथे दिसत असे त्या त्या वेळी गुरे भीतीने गर्भगळीत होत आणि त्यांचे मालक संतापाने व निष्क्रियतेच्या जाणिवेने लाल होत. राजा हा इतर लांडग्यांच्या मानाने धिप्पाड होता. रात्रीच्या वेळी त्याने फोडलेली डरकाळी सर्वांच्या परिचयाची होती. आणि इतर लांडग्यांच्या ओरडण्याहून ती वेगळी होती.

तसे पाहिले तर राजाचा कळप छोटासाच होता. वास्तविक, राजासारखा अधिकार व नेतृत्व मिळाल्यावर त्या लांडग्यांच्या मागे बरेच लांडगे जमतात असा नेहमीचा अनुभव आहे. पण कदाचित राजाच्या उग्र स्वभावामुळे त्याचा कळप वाढला नसावा. त्याचे पाच साथीदार त्याच्याइतके जरी नसले, तरी सर्वसाधारण लांडग्यांपेक्षा शरीराने मोठे होते. त्यात शुभ्र रंगाचा एक देखणा लांडगा होता. आणि त्याला त्या भागातील लोक ‘बंकी’ या नावाने ओळखीत असत. तो लांडगा नसून ती लांडगी असावी असा लोकांचा समज होता.

थोडक्यात म्हणजे, राजा आणि त्याचा कळप त्या भागात सर्वांच्या परिचयाचा होता. हा कळप वारंवार दिसत नसला, तरी त्यांच्या आरडाओरडीवरून त्यांचे अस्तित्व सतत जाणवत असे. त्या भागातील कोणत्याही शेतकऱ्याने राजाच्या कळपातील कोणताही लांडगा मारणाऱ्यास वाटेल ते बक्षीस दिले असते. पण राजा त्या सर्वांना पुरून उरला होता. त्याला मारण्यासाठी केलेले सर्व उपाय त्याने निष्प्रभ करून टाकले होते. शिकाऱ्यांना त्यांनी दाद दिली नाही. किंवा विष घालून ठेवलेल्या मांसाकडे हुंगूनही पाहिले नाही; आणि रोज एक गाय याप्रमाणे आपली खंडणी वसूल करण्याचे व्रत अखंड चालू ठेवले होते. राजा आणि त्याच्या कळपाने निदान पाच वर्षे तरी हिरण्य रानात आपला अम्मल गाजविला होता. म्हणजे तेवढ्या काळांत या लांडग्यांनी जवळजवळ २००० उत्कृष्ट गाईंचा फडशा पाडला होता. कारण प्रत्येक वेळी हा कळप उत्कृष्ट व धष्टपुष्ट अशीच गाय मारण्यासाठी निवडीत असे.

लांडगा हा नेहमी भुकेलेला असतो आणि त्यामुळे तो वाटेल ते खातो ही जुनी समजूत राजाच्या कळपाच्या बाबतीत तरी साफ खोटी ठरली होती. हा कळप कधी भुकेलेला नव्हता किंवा वाटेल ते खातही नसे. किंबहुना, नैसर्गिकरित्या मेलेल्या जनावरास कधी या कळपाने स्पर्शही केला नाही. दररोज स्वत: जनावर मारून ते खायचे हा त्याचा बाणा होता. त्यांतही कोवळ्या कालवडीच्या शरिराचा नाजुक व मृदु भाग हे त्यांचे आवडते अन्न होते. म्हातारा बैल किंवा गाय याबद्दल त्यांनी कधीच प्रेम दाखविले नाही. काही वेळा एकादे शिंगरू ते मारीत असले तरी घोड्याच्या मांसाबद्दल त्यांना विशेष आस्था वाटत नव्हती. बकऱ्यांचे मांसही त्यांना प्रिय नव्हते. केवळ खेळ म्हणून ते बकऱ्या मारीत असत. एकदा बंकीने आणि कळपातील दुसऱ्या एका लांडग्याने मिळून एका रात्रीत केवळ मजेखातर अडीचशे बकऱ्या मारल्या; पण त्यातील कणभरही मांस त्यांनी खाल्ले नाही.

राजाने आपल्या कळपासह कसा धुमाकूळ घातला होता हे यावरून कळून येईल. दरसाल त्यांना मारण्यासाठी निरनिराळे उपाय व निरनिराळ्या युक्त्या तेथील लोकांनी योजिल्या, पण व्यर्थ! राजाला मारण्यासाठी मोठ्या रकमेचे बक्षीस लावण्यात आले आणि सहज कळणार नाही अशा पद्धतीने विषाचा वापर करून त्याला आमिष दाखविण्यात आले. त्याने कशालाच दाद दिली नाही. कशात विष आहे हे त्याला चटकन् समजत असे व तेथून तो दूर जात असे. फक्त बंदुकीला मात्र तो घाबरत असे. त्या भागातील लोक नेहमी जवळ बंदूक बाळगतात हे त्याला समजले होते की काय कुणास ठाऊक! कारण त्याने सरळ माणसावर हल्ला केल्याचे उदाहरण कानावर आले नाही. दिवसा माणसाचा वास लागला रे लागला की, राजा आपल्या कळपासह सुसाट पळत असे.

एकदा एका गुराख्याने राजाची चिरपरिचित डरकाळी ऐकली आणि लपत छपत तो एका झाडाआड गेला व तेथून राजाच्या हालचाली पाहू लागला. थोड्या खोलगट अशा भागात गाईंचा एक ताफा उभा होता आणि राजाच्या कळपाने त्यांना वेढले होते. स्वत: राजा मात्र दूर अंतरावर एका उंच दगडावर दोन पाय पुढे सोडून बसला होता. बंकी आणि इतर लांडगे त्या गाईंच्या ताफ्यामधून एका धष्टपुष्ट गाईला वेगळे करण्याचा प्रयत्न करीत होते. पण सर्व गाई एके ठिकाणी गोळा होऊन आणि बाहेरच्या बाजूला शिंगे रोखून गोलाकार उभ्या होत्या. त्यामुळे एकाही लांडग्याची पुढे जाण्याची ताकद होईना. लांडग्यांच्या प्रयत्नास बराच वेळ यश आले नाही. हा सर्व प्रकार राजा दुरून पाहत होता. त्याचा मात्र धीर सुटत चालला. शेवटी तो तेथून उठला आणि काहीही विचार न करता मोठ्या डौलाने गाईंच्या ताफ्याकडे वळला. एक मोठी डरकाळी फोडून तो गाईंच्या जवळ येऊन ठेपला. इतक्या लांडग्यांच्या प्रयत्नांनी जे झाले नाही ते राजाच्या एका डरकाळीने झाले. डरकाळी ऐकल्याबरोबर गाई भेदरल्या आणि सैरावैरा पळू लागल्या. त्याबरोबर एकाच झेपेत राजाने हव्या असलेल्या गाईची मान पकडली आणि तिला असा जबरदस्त हिसडा दिला की, ती गाय दोन-तीन वेळा उलटी-सुलटी होऊन काही अंतरावर जाऊन पडली. ती पडल्याबरोबर इतर लांडग्यांनी तिच्यावर झडप घालून तिचा निकाल लावला! गाईला हिसडा देऊन पाडल्यावर मात्र राजाने तिला स्पर्शहि केला नाही. तो धीमेपणाने आपल्या जागेकडे वळला. जणू त्याला म्हणावयाचे होते, ‘गाढवांनो! एवढ्या गोष्टीसाठी इतका वेळ कशाला घालविलात?’

पृष्ठ ३३ वर

# डॉक्टर चिटणीस आणि 'माझ्या आठवणी'

रवींद्र पिंगे

डॉ. ग. य. चिटणीस म्हणजे मराठी साहित्य-क्षितिजावरचा मावळलेला धूमकेतू. पुनरपि त्याचं दर्शन घडणं नाही. मात्र, जेव्हा ते नक्षत्र आभाळात झळकत होतं तेव्हा सर्वांचं लक्ष त्याने आपल्याकडे बळेच ओढून घेतलं होतं. नव्या पिढीला त्यांचं नाव ऐकूनही माहीत नसणं शक्य आहे. कारण डेरेदार वटवृक्षासारखं भरगच्च असलेलं त्यांचं मनस्वी आत्मचरीत्र 'माझ्या आठवणी' आज कुणाच्या वाचनातही नसेल. आत्मचरित्रांचं प्रारब्ध फुलांसारखं असतं. ती ताजी असतात तोपर्यंत वाचक ती हातात धरतात. ती हुंगून होतात न होतात तोपर्यंत काळ पालटतो. नवी आत्मचरित्रं प्रकट होतात. मग बाश्या फुलांसारखी रया गेलेली जुनी आत्मचरित्रं मागे पडतात. पुंडलीकजी कातगडयांचं नितांतसुंदर आत्मचरित्र 'पुंडलीक' आज कुणाच्या स्मरणात तरी आहे? तात्यासाहेब केळकरांच्या 'गत-गोष्टी'ची आज पानं तरी चाळली जातात? ही आत्मचरित्रं वाङ्मयदृष्टया कलागुणमंडीत तर आहेतच, शिवाय सत्यापासून वीत-भरसुद्धा दूर नाहीत. तरीही त्यांचे एकूण भवितव्य करुणच आहे. अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या लक्ष्मीबाईंच्या 'स्मृतिचित्रां'चं एकूण नशिबच शिकंदर. ते आत्मचरित्र नदीच्या पाण्यासारखं पारदर्शकच आहे. तथापी, तितकंच प्रांजळ आणि प्रसादगुणयुक्त असलेल्या धर्मानंद कोसंबीच्या 'निवेदन'ला काही ती अलोट लोकप्रियता लाभली नाही. माटे मास्तरांच्या चटपटीत आत्मचरित्रालाही ते भाग्य लाभलं नाही. उत्तम आत्मचरित्रांची जिथे ही परवड तिथे लोकप्रियतेच्या चाकोरीवरून चालत न जाण्याचा अट्टाहास धरणाऱ्या डॉ. चिटणिसांच्या आत्मचरित्राची याद कोण ठेवणार? तरीही, मराठीतल्या अमोल आत्मचरित्रामध्ये 'माझ्या आठवणी'ला मानाचंच पान राखून ठेवावं लागेल.

पंचवीस वर्षांपूर्वी ऑपेरा हाऊसच्या चौकात आम्हाला डॉक्टर-साहेब नेहेमी दिसत. शुभ्र पायजमा, तलम नेहरूशर्ट डोळ्यांना काळा गॉगल आणि तोंडात पाईप, अशी डॉक्टरांची टक्कलवाली मूर्ती शांत-पणे समोरून येताना दिसणी की वाङ्मयात आपण तरवार मारून दाखवू अशा भ्रमात असलेली आम्हा कॉलेज तरुणांची टोळकी मनातून जरा दबकत असू. कारण डॉक्टरांचा दबदवा दुहेरी होता. ते प्रकांड पंडित होते आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् त्यांचे चहाते होते असं आम्ही ऐकून होतो. डॉ. एस. राधाकृष्णन म्हणजे त्यावेळच्या आम्हा उमेदवार मंडळींचे साक्षात् भगवान सूर्यच होते! त्यांना डॉ. चिटणिसाबद्दल आदर. म्हणजे आम्ही खलासच! शिवाय 'नवा पाईक' नावाचं एक द्रष्टं नाटक लिहून ते कॉलेजयुवकामार्फत रंग-भूमीवर आणण्याची धडपड डॉक्टर चिटणीस करीत होते. म्हणजे एका बाजूने विद्वत्ता आणि दुसऱ्या बाजूने मनोरंजनाच्या द्वारे प्रबोधन घडवून आणण्याची उबळ. त्यामुळे डॉक्टराबद्दलचा आमचा आदर वाढतच गेला. पुढे कळलं की बा. सी. मर्ढेकरसुद्धा डॉक्टरावर लट्टू आहेत. इतके, की रेडिओचे ऑफीस सुटल्यावर मर्ढेकर रोज तडक डॉक्टरांच्या घरी गप्पांसाठी जात. ते खोटे नव्हतं. मर्ढेकर एवढ्या-वरच थांबले नाहीत, तर डॉक्टरांनी लिहिलेली 'कुसुम' ही कादंबरी खुद्द मर्ढेकरांनी रेडिओवरून प्रकरणशः वाचून दाखवली! संपूर्ण कादंबरी श्रोत्यांना ऐकवणं हे काय दिव्य आहे, हे आज मी त्याच पागेतला अश्व असल्यामुळे नीट जाणू शकतो. पण मर्ढेकर हाडाचे बहाद्दर हेच खरं. डॉक्टरांवर त्यांनी ओंजळी भरून भरून प्रेम केलं. पुढं बुद्धीनिष्ठ डॉक्टरांनी मर्ढेकरांच्या वाङ्मयीन विचारांना विरोध करताच मर्ढेकर संतापले आणि डॉक्टरांचे संबंध त्यांनी समूळ कापून टाकले, हा भाग वेगळा. ह्याच्याही पाऊलभर पुढे गेले. आकाशवाणी-वरल्या चाकरमान्यांनीही डॉक्टरांशी असलेले आपापले स्नेहसंबंध तोडून टाकावेत, अशी इच्छा त्यांनी ठणकावून जाहीर केली आणि ज्यांनी तसं अमानुष वागायचं नाकारलं त्यांच्या मार्गात मर्ढेकरांनी आपल्या अधिकारात अगदी पोटभर विघ्नं आणली हे सत्य आहे. अर्थात, हा झाला मर्ढेकरांच्या डूक ठेवण्याचा एक विलास. तथापी, मर्ढेकर डॉक्टरमहाशयावर एके काळी लुब्ध होते हेही तितकंच प्रसन्न सत्य आहे. का लुब्ध होते? डॉक्टर त्यांची रगड स्तुती करीत असत म्हणून? नाही; तर डॉक्टरांपाशी अमोघ विद्वत्ता होती म्हणून. डॉक्टर पाच-पाचशे पानांचे ग्रंथराज, पोपट रानात भिरभिरतात त्या सहजतेने वाचून मोकळे होत आणि त्यावर आपले रोखठोक भाष्य करीत. तो काळही असा होता की वाङ्मयाच्या क्षेत्रात विद्वानच तुरळक होते. होती ती सगळी हौशी लोकांची वावटळ. वा. ल. कुलकर्णी, प्रभाकर पाध्ये आणि माधव मनोहर ही विलायती वाङ्मय साक्षेपाने वाचणारी इन मिन तीनच उमेदवार मंडळी होती. पुण्या-

कडे कुणी एखादा असेल तर नकळे आणि ह्या सर्वांहून विद्वत्तेच्या बाबतीत डॉक्टर ताडमाड उंच होते. व्यक्तिशः मला त्यातले फत्रेही कळत नव्हते. रसही नव्हता. फक्त लोक काय म्हणत ते सांगितलं.

डॉक्टर चिटणीस हा एक भलताच झपाटलेला माणूस होता. पक्का मध्यमवर्गीय. वडिलांची फिरतीची नोकरी. त्यामुळे दूर रत्नागिरीला आईपाशी राहून शालेय शिक्षण. संस्कृतात प्राविण्य. शिक्षण चालू असतानाच पारमार्थिक विषयाकडे वळले धर्मचिंतनाबद्दल जिज्ञासा जागृत झाली. सर्वसंगपरीत्याग करून ब्राह्मधर्माचा प्रसार करावा हा विचार प्रबळ झाला. डॉक्टरांचं वैशिष्ठ्य हे की आचार नि विचार ह्यात कटाक्षाने अंतर ठेवीत नसत. ब्राह्मधर्माची मूलतत्त्वं अभ्यासिण्यासाठी आणि उपासना करण्यासाठी साधकाच्या भूमिकेतून बंगाल, आसाममध्ये वास्तव्य. कलकत्त्याच्या सिटी कॉलेजात आणि शिलाँगच्या सेवाश्रमात अध्ययन, अध्यापन. आसाममध्ये खासी ह्या वन्यजमातीतल्या मुलांना इंग्रजी शिकवलं. हा कालखंड विरागी भटकंतीचा. स्वामी विवेकानंदांच्या बेलूर मठाने प्रभावित. आजन्म ब्रह्मचारी राहून ब्राह्मधर्माचे मिशनरी होण्याचा संकल्प. पूर्वेचा फेरफटका. प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी मुंबईची निवड. गिरगावातल्या राममोहन शाळेतल्या राममोहन आश्रमात साधक म्हणून एकाकी वास्तव्य. त्यावेळी त्यांनी भगवी वस्त्रं परीधान केली होती. पायात लाकडी खडावा असत. लोक त्यांना स्वामीच समजत. फांकडू इंग्रजीतून बोलत. इंग्रजीतून प्रवचनं देत. इंग्रजीतून उपासना चालवीत. राजा राममोहन रायांनी संस्थापिलेल्या आणि न्यायमूर्ती रानडेयांपासून भांडारकरांपर्यंत सर्व विवेकी विद्वानांनी अंगिकारलेल्या, तत्त्वतः मूर्तीपूजेविरुद्ध, पण मूलतः उदारमनस्क अशा ब्राह्मधर्माच्या प्रचाराचे काम मिशनरी वृत्तीने चालवले होते. उपकारशील अशा स्टुडंटस ब्रदरहूड, इंटरनॅशनल फेलोशिप, वगैरे संस्थांच्या सहकार्याने समाजसेवाही रुजू करत होते. मुंबईतल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांशी स्नेहबंध. त्यांच्या प्रोत्साहनाने आणि पुढाकाराने धर्मतत्त्वांचा सखोल शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी विलायतेला रवाना. ऑक्सफर्ड विद्यापीठातल्या मँचेस्टर कॉलेजात धर्मविद्येचे पद्धतशीर अध्ययन. त्या शाखेतली डॉक्टरेट प्रबंध लिहून मिळवली. नावामागे 'डॉक्टर' ही उपाधी लावून मुंबईला राममोहन आश्रमात पुनरागमन.

इथे जिज्ञासू साधकाच्या जीवनक्रमाचे पहिले पर्व संपले.

डॉक्टर ऑक्सफर्डहून परत आले आणि एका वर्दळीत सापडले. ही वर्दळ वाङ्मय, प्रचलीत राजकारण, मजूरसेवा, रंगभूमी आणि चित्रपट ह्या क्षेत्रात मनोभावे धडपडणाऱ्या तरुणांची होती. काळे, वर्तक, काणेकर वगैरे मंडळींना नाटकाच्या क्षेत्रात झेंडा रोवायचा होता. भाई सरदेसाई, कांदळकर वगैरेंना मजुरांची डावी आघाडी समर्थ करायची होती. प्रचलीत राजकारणात लोटवाला, कारा वगैरे मंडळींना प्रागतिक विचार प्रभावी करायचा होता. आणि ह्या सर्व बाबीत डॉक्टरांना कमालीचा रस होता. डॉक्टरांची रहाण्याची जागा गाठीभेटींना फारच सोईची होती. तशात डॉक्टरांचा कु. लीला नगरकर ह्या गुणी, कलासक्त, आणि अर्पणोत्सुक युवतीशी प्रेमसंबंध जुळून येऊन विवाह झाला होता. डॉक्टर राजकारणात डावी मतं मांडू लागले. बत्तीस साली मद्रासला भरलेल्या अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसला प्रनिनिधी म्हणून गेले. लपूनछपून भारतात आलेल्या एम. एन. रॉय ह्या डाव्या क्रांतीकारकाच्या गोटात सामील झाले. पर्यायाने त्यांना प्रार्थनासमाजाचा त्याग करावा लागला, नि तो त्यांनी व्यवहार वगैरे न पाहता केला. मात्र दरम्यानच्या काळात ब्राह्मसमाजाच्या शतसांवत्सरीक समारोहासाठी डॉक्टर जपानचा एक छोटा दौरा करून आले. पुढे डॉक्टर चिटणीस पत्रकार झाले. 'चित्रा' साप्ताहिकाचे संपादक झाले. वर्तक, काणेकर, दाते, काळे वगैरे तरुणांनी सुरू केलेल्या 'नाट्यमन्वंतर'चे संचालक बनले. त्यांनी भार्गव नावाच्या एका सुशिक्षित नटाला हाती धरून 'आदर्श चित्रपट कंपनी' काढली. 'धुंवाधार' नावाचा हिंदी चित्रपट काढला. त्यात स्वतःच्या पत्नीला, म्हणजे लीला चिटणीसला नायिका बनवलं. पुढें यजमानांच्या सक्रीय प्रोत्साहनामुळे, काळाच्या गरजेमुळे, आणि मुख्यता लाघवी अभिनयाच्या जन्मसिद्ध अंगामुळे लीला चिटणीस ह्या नावाला रंगभूमी आणि चित्रपट ह्या दोन्ही माध्यमात महत्त्व प्राप्त झालं. ह्या सर्व स्पर्धामय धडपडीत डॉक्टर होरपळायचे तेवढे होरपळलेच हा इतिहास आहे. तो पुसून टाकता येणार नाही. तथापी सर्व क्लेश भोगीत असतानाच डॉक्टरानी मनाचा सरळपणा कसा सतत दाखवला आणि विपरीत काळीही विद्येची कास कशी सोडली नाही, त्याचा एकतर्फी आलेख 'माझ्या आठवणी'त आढळेल. पुढे पुढे मानसिक कुचंबणेमुळे हा विवाह सुख देऊ शकला नाही. डॉक्टरांनी लीलाताईंना राजीखुशीने घटस्फोट दिला. मद्याचा प्याला जवळ केला.

डॉक्टरांना लीला चिटणीसपासून चार मुलं झाली. तीन मुलगे आणि एक मुलगी. पैकी थोरला मुलगा अलिकडेच अमेरिकेत वारला. एक मुलगीही मागेच वारली. दोन चतुर मुलगे इंग्लंड-अमेरिकेत व्यवसायानिमित्त स्थाईक झाले आहेत. लीलाताई कधी इथ, तर कधी तिथे असतात.

पहिल्या प्रपंचातून बाहेर पडल्यावर डॉक्टरांनी माई वरेरकर यांच्याशी दुसरा विवाह केला. त्या विवाहाची आणि डॉक्टरांच्या दुसऱ्या गृहस्थाश्रमाची रूपरेषा 'माझ्या आठवणी'ला माईंनी जोडलेल्या त्रोटक लेखात दिली आहे. ह्या संबंधापासून डॉक्टरांना दोन मुलं झाली. पैकी कलागुणसंपन्न मोठी मुलगी आपल्या यजमानांबरोबर मॉरिशसला आहे. धाकटा मुलगा अनिल हा व्यावसायिक चित्रकार असून त्याचा हात मोठा नामी आहे. माई आकाशवाणीवर माझ्या दयाळू सहकारी होत्या. इमानेइतबारे नोकरी केलेल्या माईंच्या अंगणात सायंकाळची शांत उन्हं आता पडली आहेत. त्यांच्यापरीने त्या कृतार्थ आहेत.

माणसाला, मग तो सामान्य चाकरमान्या असो, कलावंत लेखक असो किंवा उपकारीवृत्तीचा उदारमनस्क विचारवंत असो, संसारात सतत जागृतच असावे लागते. जो संसारात डुलकी घेईल त्याला काय धरावे लागते आणि काय सोडणे कर्मप्राप्त होऊन बसते, ह्याचा

डॉक्टरांचं आयुष्य हा छानदार आरसा आहे. नवस करून मिळणार नाही असली दर्जेदार प्रज्ञा त्यांना लाभली होती. रूप होतं. पैसे येत होते–कुठून येत होते ते अनेकांना कोडं होतं– पण येत होते. आणि जातही होते. चांगले नामवंत मित्र होते. रॉयसारखा क्रांतीकारक सहकारी होता. लोटवालाशेटजीसारखा मित्र होता. अर्धी पृथ्वी त्यांनी पायाखाली घातली होती. तीन संसारांचा अनुभव त्यांनी चाखलेला होता. सुलक्षणी मुलंबाळं झाली. मनासारखी साहित्यसेवा घडली. नाव झळकलं. तरीही काहीतरी राहून गेलं आहे, आपलं काहीतरी हरवले आहे, असं त्यांना सतत वाटत असे. त्यांना श्रेय हवं होतं. ते मात्र त्यांना लाभलं नाही. त्यांनी चाळीशीत लिहून ठेवलेल्या कादंबरीपेक्षा प्रभावी अशा 'माझ्या आठवणी' अवश्य वाचा. त्या रानवाऱ्यासारख्या आहेत. जीव तृप्त करतात. आणि भान आणून देतात. नियतीच्या अतर्क्य शक्तीचं डॉक्टर एवढा मोठा प्रकांड पंडित ! पण नियतीने कसा त्याला शरण-शरण आणला ! ◻

# 'माझ्या आठवणी'तील एक प्रकरण

# मी आणि नाट्यमन्वंतर

प्रार्थनासमाजाच्या राममोहन आश्रमात मी जेव्हा राहात होतो, त्यावेळी माझ्याकडे रात्री पुरोगामी नाटकाविषयी चर्चा चाले. त्या चर्चेमध्ये श्री. पार्श्वनाथ आळतेकर, कै. बापूराव आपटे, श्री. के. ना. काळे आणि श्री. अनंत काणेकर प्रभृती मंडळी भाग घेत असत. त्यानंतर म्हणजे ३३ साली आम्ही लॅबर्नमरोडवरील सरस्वती व्हिलांत राहात असताना एके दिवशी सकाळी श्री. वर्तक, काळे, काणेकर वगैरे मंडळी माझ्याकडे आली. वर्तकांच्याबरोबर केशवराव दातेही आले होते. याच वेळी माझी आणि केशवरावांची पहिली ओळख झाली. सर्व मंडळीचं चहापान झाल्यानंतर श्री. वर्तकांनी आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे व्याख्यान देण्यास सुरुवात केली, यापूर्वी माझी आणि वर्तकांची ओळख झाली होती, ती कधी आणि कुठं झाली होती ते सांगता येत नाही. वर्तक म्हणाले, 'हे पहा डॉक्टर, आम्ही नाट्यमन्वंतर नावाची संस्था काढली आहे बरं का ! ती लिमिटेड कंपनी आहे, तुम्हाला तिचे आम्ही डायरेक्टर करणार आहोत. तुम्हाला माहीत आहे का कोण कोण डायरेक्टर आहेत त्या कंपनीत ? अहो, या कंपनीचे महर्षी अण्णासाहेब कारखानीस डायरेक्टर आहेत. मी आणि दाते आहोतच. शिवाय आपले काणेकर, काळे, शांताराम शृंगारपुरे वगैरे मंडळी आहेतच. मग बोला, काय तुमचे म्हणणं आहे ?' मी वर्तकना म्हटलं, की 'नाट्यमन्वंतरसारखी पुरोगामी संस्था काढावी असं काळे, काणेकर, आळतेकर, आपटे आणि मी यांच्या मनात किती दिवसांपासून तरी घोळत होते. तुमच्या उत्साहानं आणि कर्तबगारीनं या अशा संस्थेला मूर्त स्वरूप आलं ही आनंदाची गोष्ट आहे. मी तुम्हाला वाटेल ती मदत करायला एका पायावर तयार आहे. पण मला एक अडचण वाटते ती अशी की इब्सेनच्या Do'lls House साठी योग्य पात्रांची निवड करणं जरा कठीण जाईल. काणेकरांनी या नाटकाला जे 'घरकुल' हे नाव दिलं आहे ते अत्यंत योग्य आहे.' वर्तक मला मध्येच थांबवून म्हणाले, की 'आम्ही सध्या घरकुलचा प्रयोग करायचा नाही असं ठरवलं आहे. मी स्वतःच 'आंधळ्याची शाळा' या नावाचं एक नाटक लिहिलं आहे, आणि तेच प्रथम बसवायचं आम्ही सर्वांनी ठरवलं आहे.' मी म्हणालो, 'पण मी हे नाटक वाचलेलं नाही. तेव्हा त्याबद्दल मला काही सांगता येणार नाही.' वर्तक ताबडतोब म्हणाले, 'अहो, तेवढ्याचसाठी तर आम्ही जमलो आहोत. मी तुम्हाला आता माझं नाटक वाचून दाखविणार आहे.' असं म्हणून वर्तकांनी आपलं चोपडं उघडून नाटक वाचून दाखविण्याची तयारी दाखविली.

मी, काळे, काणेकरांकडे आळीपाळीनं पाहिलं, पण त्यापैकी एकानेही तोंडातून शब्द काढला नाही. वर्तकांनी नाटक वाचायला सुरुवात केली. नाटकाच्या चार अंकांचं जसंजसं वाचन होऊ लागलं, तसतसा माझ्या संतापाचा पारा वर वर चढू लागला. म्हणजे ते नाटक वाईट होतं असा माझ्या म्हणण्याचा भावार्थ नाही. नाट्यमूल्याच्या दृष्टीनं ते एक उत्कृष्ट नाटक होतं यात शंकाच नाही. परंतु आम्ही ज्या हेतूनं पुरोगामी नाट्यसंस्था काढणार होतो, त्या हेतूला पोषक असं ते नाटक नव्हतं. म्हणून नाटकाचं वाचन संपल्या-

नंतर मी वर्तकांना म्हणालो, की 'तुमचं नाटक चांगलं आहे. परंतु इब्सेनचा नॉर्वेजियन प्रतिस्पर्धी ब्यार्नसन याचं जे Gauntlet नाटक आहे, त्याचा हा फिक्कट अनुवाद आहे. आम्ही जी पुरोगामी नाटच-संस्था काढणार होतो ती इब्सेनची नाटकं मराठी रंगभूमीवर आणण्यासाठी आणि तुम्ही तर त्याच्या प्रतिस्पर्ध्याला मराठी रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न करीत आहात. तेव्हा या तुमच्या संस्थेत मला मुळीच सामील होता येत नाही.' यावर काळे आणि काणेकर एकदम म्हणाले, 'आंधळ्यांची शाळा हे मराठी रंगभूमीवर एकदा यशस्वी झालं की, त्यानंतर ताबडतोब आम्ही 'घरकुल' नाटक घेणार आहोत.' मी त्यांना म्हटलं, ठीक आहे. तुम्ही ज्यावेळी 'घरकुल' रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न कराल, त्याच वेळी मी तुम्हाला येऊन सामील होईन, आज मी या संस्थेत सामील होत नाही. परंतु मी जरी तुमच्यात सामील झालो नाही तरी तुमच्या नाटचमन्वंतरला वर्तमानपत्रद्वारा जी काही मदत करायची असेल ती मी अवश्य करीन.

'आंधळयांच्या शाळे'चे प्रयोग मुंबईस त्यावेळच्या रिपन थिएटरात सुरू झाले. नाटकाची सजावट आणि वेशभूषा श्री. नी. म. केळकर आणि श्री. राजे यांनी फारच चांगली केली होती. नाटकाच्या सजावटीसाठी खर्चही बराच झाला होता. सौ. ज्योत्स्ना भोळे, सौ. पद्मावती वर्तक, नटवर्य नानासाहेब दाते, श्री. पार्श्वनाथ आळतेकर आणि श्री. के. ना. काळे यांच्या भूमिका फारच परिणामकारक झाल्यामुळे ते नाटक चांगलंच रंगलं. मला वाटतं, या नाटकाचे प्रयोग सतत चार महिने सारखे चालले होते. त्यानंतर वर्तकांचं दुसरं नाटक 'लपंडाव' रंगभूमीवर आलं. हे नाटक मात्र साफ पडलं. पहिल्या नाटकाला एकंदर उत्पन्न जरी बरं होत होतं, तरी त्या नाटकाच्या सजावटीसाठी केलेल्या अवाढव्य खर्चामुळे जमाखर्चाची जेमतेम तोंडमिळवणी झाली होती की नाही याची मला शंका वाटते. 'लपंडाव' साफ पडल्यामुळं त्या नाटकाचा खर्चही अंगावर पडला. त्यानंतर वर्तकांचं तिसरं नाटक 'तक्षशीला' हे रंगभूमीवर आलं. या नाटकाच्या सजावटीसाठी अवाढव्य खर्च करण्यात आला होता आणि हे नाटक दुसऱ्या प्रयोगात ठार झालं. कंपनीच्या भागीदारांनी या संबंधानं हूं का चूं केलं नाही, कारण कंपनीच्या कर्जाची जबाबदारी घेण्यास श्री. वर्तक तयार होते. 'तक्षशीला' ठार झाल्याबरोबर वर्तकांचाही धीर खचला आणि त्यांनाही काय करावं ते सुचेनासं झालं. नाटचमन्वंतर साफ बुडून जाण्यापूर्वी काही घटना घडून आल्या त्याचा उल्लेख या ठिकाणी करणं जरूर आहे.

'लपंडाव' नाटकाच्या तालमी सुरू असताना काणेकर, काळे माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, की 'नाटचमन्वंतर ही काही पुरोगामी संस्था राहिली नाही. 'आंधळयांच्या शाळे' नंतर 'घरकुल' रंगभूमीवर यावं अशी आमची तीव्र इच्छा होती आणि आम्ही त्याप्रमाणे तुम्हाला सांगितलही होतं, परंतु ते काही जमेल असं दिसत नाही. वर्तकांना आपली एकटचाचीच नाटकं रंगभूमीवर आणायची आहेत असं दिसतं. अण्णा कारखानीस नी केशवराव दाते हे त्यासंबंधानं त्यांना काही बोलतच नाहीत. म्हणून आम्ही नाटचमन्वंतरमधून बाहेर पडायचं ठरवलं आहे. काणेकर आणि काळे माझ्याकडे येण्यापूर्वी कै. आपटे, पार्श्वनाथ आळतेकर आणि मी नवयुग प्लेअर्स नावाची निराळी नाटच-संस्था काढावी असा विचार करीतच होतो. याच वेळी काळे आणि काणेकर आम्हाला येऊन मिळाले. त्यानंतर नवयुग प्लेअर्स ही संस्था आम्ही स्थापन केली. गावदेवीतील चौहान भुवनचा हॉल आम्ही भाड्यानं घेतला आणि तिथं तालमी सुरू करण्याचं ठरवलं. या तालमी काळयांनी घ्यावयाच्या हे सुद्धा निश्चित झालं. मला काळे म्हणाले की, 'आपण जर पहिल्याप्रथम 'घरकुल'चा प्रयोग केला आणि योग्य पात्रं आपल्याला मिळाली नाहीत, तर ते नाटक रंगभूमीवर यशस्वी होणार नाही. म्हणून मी म्हणतो की मी एका इटालियन नाटककाराचं नाटक अनुवादित केलं आहे. त्या नाटकाचं नाव मी 'बिघडलेली घडी' असं ठेवलं आहे. तेव्हा त्या नाटकाच्या आपण तालमी घेऊ. लीलाताई त्या नाटकातील हिरॉइनची भूमिका करतील. खरोखर पाहिलं तर लीलानं या नाटकात काम करावं हे मला मुळीच आवडत नव्हतं. कारण तिची परीक्षा जवळ येत चालली होती. परंतु काळयांनी तिला हिरॉइनच्या कामासाठी पसंत केली आणि तिनं जर काम करण्याला नकार दिला तर आमची नाटचसंस्थाच संपुष्टात येईल, असा विचार माझ्या मनात आला. मी तिला काहीच बोललो नाही. या नाटकाच्या तालमी चालू असताना एका रात्री के. ना. काळे, श्री. बेंडे यांना घेऊन आले. त्यांनी आपलं 'बुवा' नाटक वाचून दाखवलं. काळयांनी त्या नाटकाची फारच तारीफ केली, परंतु मला ते नाटक मुळीच आवडलं नाही. काळयांनी त्या नाटकाच्या तालमी सुरू करण्याचा आग्रह धरला. आमच्यामध्ये अगदी पहिल्या प्रथमच फाटाफूट नको म्हणून मीही काही बोललो नाही. परंतु 'बुवा' नाटकाच्या तालमीला हजर राहण्याचं मी साफ नाकारलं. या नाटकाच्या तालमी चालू असताना नाटच मन्वंतरचे बहुतेक नट आम्हाला येऊन मिळाले. केशवराव भोळे आणि ज्योत्स्ना भोळे यांच्याशी माझे निकटचे स्नेहसंबंध होते. नाटच मन्वंतर डबघाईला आल्यामुळे केशवरावांनीसुद्धा आपल्या बायकोला या संस्थेतून काढून घेतलं. ☐

एके दिवशी सकाळी चहा प्याल्यानंतर बाहेरच्या दिवाणखान्यात बसतो न बसतो तोच केशवराव दाते अण्णासाहेब कारखानिसांना घेऊन माझ्याकडे आले. अण्णांचा नि माझा विशेष परिचय नव्हता, परंतु त्यांनीच प्रथम बोलायला सुरुवात केली. नाटचमन्वंतर बुडालं या एकाच गोष्टीचं त्यांना फार दुःख होत होतं असं त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून येत होतं. ते मला म्हणाले, 'मी आता परत पुण्याला जातो. नाटचमन्वंतर साफ बुडालं असं मी समजतो. या संस्थेला जिवंत ठेवण्याची दगदग मला म्हातारपणी होणार नाही. या संस्थेचा मी सल्लागार आहे खरा, पण माझा सल्ला कुणीच घेत नाही. मी जातो. तुम्हाला जर या संस्थेला वाचवायचं असेल तर या संस्थेला अवश्य वाचवा अशी विनंती करायला मी आलो आहे.' बोलता बोलता म्हाताऱ्याच्या डोळयांना पाणी आलं. दाते दुर्मुखलेले बसले होते. ते काहीच बोलले नाहीत. मी त्यांना लगेच म्हटलं की, 'हे पाहा अण्णासाहेब, आपला माझा जरी विशेष परिचय नसला, तरी नाटचसृष्टीची जी आपण अमोल सेवा केली आहे, ती माझ्या पूर्ण परिचयाची आहे. आपण काही करू नका. नाटचमन्वंतर जिवंत

ठेवण्याचे जे काही उपाय करणं मला शक्य असतील तेवढे मी करीन. एवढं आश्वासन मी तुम्हाला देतो.' काही वेळानं ते दोघेही निघून गेले.

यानंतर आळतेकर, काणेकर, काळे आणि मी असे एकत्र बसून अण्णासाहेब कारखानीस यांनी केलेल्या सूचनेचा सर्व दृष्टीनं विचार केला. आमच्यापुढे असा प्रश्न होता की, आपली नवयुग प्लेअर्स ही संस्था चालवायची आणि नाटयमन्वंतर मरू द्यायचं किंवा आपली संस्था बंद करायची व नाटयमन्वंतरचं पुनरुज्जीवन करायचं. नवयुग प्लेअर्स बंद करायचे ही कल्पना काणेकर, काळे किंवा आळतेकर यांना मुळीच सहन झाली नाही. ते म्हणाले की, 'आपण सर्वजण १९२८ सालापासून नाटयमन्वंतरसारखी संस्था अस्तित्वात आणण्यासाठी सारखे झगडत होतो. त्यानंतर पाच वर्षांनी श्री. वर्तक यांनी या संस्थेला मूर्त स्वरूप दिलं. त्याबद्दल आम्ही त्यांचे खरोखर आभारी आहोत. परंतु असं दिसतं की, या संस्थेद्वारा वर्तकांना आपली स्वतःचीच नाटकं रंगभूमीवर आणायची आहेत या त्यांच्या अट्टाहासामुळं नाटयमन्वंतर आज मृतावस्थेत पडली आहे. अण्णासाहेब कारखानीस आणि नानासाहेब दाते यांच्यासारखे तज्ज्ञ सल्लागार नाटयमन्वंतरमध्ये होते खरे; परंतु वर्तकांना इतरांपेक्षा पैशाचं अधिक पाठबळ असल्यामुळं त्यांना कुणाचा सल्ला घेण्याची जरुरी भासली नाही. वर्तकांच्या या शहाणपणामुळेच ही अवस्था झाली आहे. आपण सर्वांनी कितीही प्रयत्न केले तरी तिला जिवंत करणं शक्य नाही. म्हणून आम्ही म्हणतो की, नाटयमन्वंतरच्या भानगडीत न पडता आपण आपली संस्था स्वतंत्रपणे चालवू. शिवाय नाटयमन्वंतरला आज जे कर्ज झालं आहे, त्या कर्जाचा बोजा कुणी उचलायचा? वर्तकांच्या एककल्लीपणामुळे आणि भलत्याच महत्त्वाकांक्षीपणामुळे नाटयमन्वंतरला जे कर्ज झालं आहे, ते फेडायचं कुणी? अण्णासाहेबांनी जे काही तुम्हाला सांगितलं ते ठीक आहे, परंतु मागचं हे खरकटं कुणी काढायचं ते सांगा.'

माझ्या तिघाही मित्रांचं म्हणणं अक्षरशः खरं होतं. तरीसुद्धा नाटयमन्वंतर संस्था नामशेष व्हावी ही कल्पनाच मला सहन होईना. वर्तकांचं पहिलं नाटक माझ्या दृष्टीनं प्रतिगामी होतं, तरीसुद्धा नाटयमन्वंतरनं नाटयतंत्रामध्ये ज्या काही अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या, त्या विचारात घेणं अत्यंत जरुरीचं होतं. नाटयमन्वंतरनं नाटयसृष्टीत एक नवीन प्रथा पाडली होती, ती म्हणजे स्त्रियांची कामं स्त्रियांनी करायची ही होय. शिवाय माझ्या स्वतःच्या दृष्टीनं जरी वर्तकांचं नाटक प्रतिगामी होतं तरी या वेळी जी नाटकं महाराष्ट्रात होत होती, त्यांच्या मानानं हे नाटक कितीतरी पुरोगामी होतं. हे सर्व विचार मी माझ्या मित्रांसमोर मांडले. मी त्यांना म्हणालो की, 'आपलं जे वर्तकांशी भांडण आहे ते वैयक्तिक स्वरुपाचं नाही. आपण त्यांच्याशी तत्त्वासाठी भांडत आहोत. म्हणून वर्तकांनी काही चूक केली आणि नाटयमन्वंतर त्यामुळं बुडत आहे असं आपल्याला दिसून आलं, तरी आपण तिला तारण्याचा काहीच उपाय करायचा नाही हे मला प्रशस्त वाटत नाही. म्हणून मी म्हणतो की, नाटयमन्वंतर कुठल्या अटीवर वर्तक आम्हाला द्यायला तयार आहेत याची आपण प्रथम त्यांच्याशी चर्चा करू.' यावर आळतेकर काही बोलले नाहीत. पण काळे व काणेकर मला म्हणाले, 'या बाबतीत काय करायचं ते आम्ही तुमच्यावर सोपवतो. तुम्हाला काय करायचं असेल ते तुम्ही ठरवा.' काळे तर रागानं मला म्हणाले, 'मला वर्तकांशी एक शब्दसुद्धा बोलायचा नाही. म्हणून यासंबंधानं ज्या काही वाटाघाटी करायच्या असतील त्या तुम्हीच करा. मी फक्त तुमच्याबरोबर येईन, पण एक शब्दही बोलणार नाही.'

वाटाघाटीचा दिवस मुक्रर झाला. जेवण झाल्यानंतर काळे, काणेकर आणि मी वर्तकांच्या घरी गेलो. नानासाहेब (केशवराव) दाते वर्तकांच्या घरी अगोदरच येऊन बसले होते. त्यांना पाहिल्यावर मला थोडं आश्चर्यच वाटलं, पण मी काही बोललो नाही. आमच्या बैठकीला सुरुवात झाली. वर्तकांची पूर्वीची उत्साही वृत्ति मला मुळीच दिसली नाही. ते तर अगदी हताश झाल्यासारखे दिसले. नाटयमन्वंतरचं पुढे काय करायचं हा जेव्हा प्रश्न निघाला त्यावेळी नानासाहेब दाते म्हणाले, 'माझी अशी सूचना आहे की, नाटयमन्वंतर माझ्या स्वाधीन करावं. मी संस्थेची सर्व जबाबदारी घ्यायला तयार आहे. माझी फक्त एवढीच अट आहे की तुम्ही मंडळींनी माझ्यावर पुरोगामी विचारांची कोणतीच बंधनं लादू नयेत. जुन्या नाटक मंडळीप्रमाणेच मी ही संस्था चालवीन. जुनी नाटकही मला करावी लागतील. इतकंच नव्हे तर स्त्रियांची कामं करण्यासाठी मला पुरुषांचीही योजना करावी लागेल.' हे त्यांचे शब्द ऐकल्यावर वर्तक एखाद्या वाघासारखे उसळून म्हणाले. 'हे पाहा दाते, तुमच्या स्वाधीन ही संस्था करण्यापेक्षा ही संस्था मेलेली मला पत्करेल, पण मी तुमचं म्हणणं कधीही मान्य करणार नाही.' श्री. वर्तक इतके भडकलेले पाहून नानासाहेब एकदम चूप झाले. त्यानंतर त्यांनी तोंडातून एक शब्दही काढला नाही.

वर्तकांचा राग लवकरच ओसरला. आमच्याकडे वळून ते हसत हसत म्हणाले, 'हे पाहा डॉक्टर, मी आपली ही संस्था तुमच्या स्वाधीन करायला कबूल आहे. मी या संस्थेसाठी किती झीज सोसली हे तुम्हाला माहीत आहेच. या संस्थेमध्ये मी कमीत कमी दहा हजार रुपये ओतले आहेत, परंतु त्याचं काही चीज झालं नाही. आता ही संस्था बंद करायची की तुमच्यासारख्यांच्या हवाली करायची एवढाच एक प्रश्न माझ्यापुढे उभा आहे. तुम्ही जर तिला पुढे जगवणार असला तर मला फार आनंद होईल. तुमच्याशी पूर्ण सहकार्य करण्याची माझी तयारी आहे. परंतु माझ्या एकटयाने आता हे काम झेपणार नाही. मी त्यांना म्हटलं, की 'नाटयमन्वंतर नामशेष व्हावी किंवा तिचं जे स्वरूप आहे त्याच्यापेक्षा प्रतिगामी स्वरूपात पुनः उदयास यावी, हे आम्हापैकी कुणालाही पसंत पडणार नाही. म्हणून आम्ही नाटयमन्वंतरची जबाबदारी घ्यायला तयार आहोत. प्रश्न असा आहे की नाटयमन्वंतरला आतापर्यंत जे कर्ज झालं आहे, ती जबाबदारी आमच्यापैकी कुणीही घ्यायला तयार होणार नाही.' तेव्हा वर्तक म्हणाले, 'नाटयमन्वंतरला एकंदर जे कर्ज आहे, त्यापैकी सर्वांत मोठा भाग नाटयमन्वंतरनं माझ्याकडून घेतलेल्या कर्जाचा आहे. इतर कर्ज अगदीच मामुली आहे. तेव्हा तुम्ही असं करा, की नाटयमन्वंतर पूर्व स्थितीवर आणीपर्यंत माझ्या कर्जापैकी तुम्ही एक पैसासुद्धा देऊ नका. नाटयमन्वंतर चांगल्या स्थितीला येईपर्यंत मी तुमच्याकडे पैसासुद्धा मागणार नाही. मग तर झालं ना?' वर्तकांनी असे म्हटल्यानंतर काळे मला म्हणाले, 'वर्तक असं म्हणताहेत खरं.

पण आम्हाला त्याप्रमाणे ते लिहून देतील का?' काळ्यांचा हा प्रश्न मी वर्तकांच्यापुढे टाकला. तेव्हा ते लगेच उठले आणि त्यांनी आम्ही सांगितल्याप्रमाणे एक पत्र ताबडतोब लिहून दिलं. अर्थात् यानंतर आम्ही नाटयमन्वंतरची जबाबदारी स्वतःकडे घेतली.

नाटयमन्वंतर आमच्या ताब्यात आल्यानंतर काय करायचं याचा मी मनाशी विचार करू लागलो. काळे त्यावेळी, मला वाटतं, ठाण्याला राहात होते आणि काणेकर आपल्या लग्नाच्या भानगडीत होते. नवयुग प्लेअर्सतर्फे ज्या दोन नाटकांच्या तालमी चालल्या होत्या, त्या पुऱ्या व्हायला आणखी ४।६ महिने लागले असते. निदान २।३ महिने तरी खास लागले असते. म्हणून मी नाटयमन्वंतर पुण्याला न्यायचं ठरवलं. नाटयमन्वंतरची जुनी नाटकं म्हणजे 'आंधळ्यांची शाळा,' 'लपंडाव' वगैरे त्या ठिकाणी करून दाखवायची, असा मी विचार केला. 'आंधळ्याच्या शाळे'त काम करण्यासाठी पद्मावती वर्तक आणि ज्योत्स्ना भोळे यांचीच जरुरी होती. वर्तकांनी पद्मावतीबाईंना पुण्याला पाठवण्याचं आनंदानं कबूल केलं. म्हणजे ज्या ज्या वेळी 'आंधळयांच्या शाळे'चा प्रयोग होईल, त्या त्या वेळी त्यांनी मुंबईहून पुण्याला यायचं असं ठरलं. पुढला प्रश्न ज्योत्स्नाबाईंचा. त्यावेळी केशवराव भोळे प्रभात कंपनीत संगीत दिग्दर्शकाचं काम करीत होते. पगारही त्यांना चांगला मिळत होता. पुण्याला ज्या ज्यावेळी मी जात असे, त्या त्यावेळी त्यांच्याकडेच उतरत असल्यामुळे मी त्यांना म्हटल्याबरोबर ज्योत्स्नाबाईंना बिबाचं काम करण्यास त्यांनी पाठवलं. 'आंधळयांच्या शाळेचे' प्रयोग पुण्याला बरेच यशस्वी झाले आणि मिळालेल्या उत्पन्नांतून मुंबईत झालेल्या कर्जाचं बरंच निवारण मी करू शकलो. मला पुण्याला सतत राहाणं शक्य नव्हतं. कारण त्यावेळी मी संडे ॲडव्होकेटचा संपादक होतो. म्हणून शनिवारी काम संपल्यानंतर डेक्कन क्वीनने मी पुण्याला जात असे आणि त्याच गाडीनं सोमवारी सकाळी परत येत असे. 'आंधळयांच्या शाळे'चे प्रयोग जरी यशस्वी झाले, तरी ते फार दिवस चालणं शक्य नव्हतं. मध्यंतरी हे प्रयोग चालू असताच केशवराव दात्यांनी प्रभातमध्ये नोकरी धरली. म्हणून त्यांना नाटयमन्वंतरकडे विशेष लक्ष द्यायला वेळ मिळेना. काळयांनी मात्र 'बुवा' नाटकाच्या तालमी सतत चालू ठेवल्या होत्या. तालमी पुऱ्या झाल्यानंतर काळयांनी 'बुवा' नाटक रंगभूमीवर आणलं. परंतु ते माझ्या अपेक्षेप्रमाणे अयशस्वी ठरलं. मुंबईमध्ये नाटयमन्वंतरचं कर्ज जरी बहुतेक निवारलं होतं, तरी पुण्यातील कर्जाचा बोजा मात्र वाढतच होता. दात्यांनी 'उसना नवरा' हे नाटक रंगभूमीवर आणलं. 'उसना नवरा'तील मालतीचं काम ज्योत्स्नाबाईंची बहीण प्रेमा हिला देण्यांत आलं. कै. डॉ. रानडे यांना अरविंदाचं काम देण्यात आलं आणि दात्यांनी बाबूरावाची भूमिका केली होती. स्त्रियांच्या आणखी दोन भूमिका या नाटकात आहेत, त्या सौ. वसिष्ठ आणि सौ. पुराणिक यांना देण्यात आल्या होत्या. हे नाटक रंगभूमीवर फारच लोकप्रिय ठरलं. परंतु लोकप्रिय नाटक झालं तरी ते मराठी रंगभूमीवर किती दिवस टिकणार! मला आता बरोबर आठवत नाही, 'लपंडाव' या नाटकाचे आम्ही काही प्रयोग केले असावेत. परंतु यावेळी आमचा पुण्याचा सीझन संपला होता, म्हणून पुण्याहून कंपनी सोलापूरला न्यावी असं आम्ही ठरवलं. याच वेळी 'संडे ॲडव्होकेट' बंद पडला. कारण मी आजारी पडलो होतो आणि नागपूरहून परत येऊन लीलानं सागर कंपनीत नोकरी धरली होती. मला रोज ताप येत असताही मी कंपनी सोलापूरला नेण्याचं ठरवलं, परंतु आम्ही सोलापूरला जाण्यापूर्वीच पुण्याला आमच्या कंपनीत एक पेचप्रसंग निर्माण झाला.

कंपनीतील नटनटींनी काळयांच्या विरुद्ध कट केला. त्याला कारण काय झाली ती मी इथं सांगत बसत नाही. परंतु ते सर्वजण मला म्हणाले की, 'काळे जर आमच्याबरोबर येणार असतील तर आम्ही सोलापूरला येत नाही.' मला मोठी पंचाईत पडली. काही झालं तरी काळे माझे मित्र. त्यांच्याविरुद्ध या लोकांनी काय कट केला होता तोही मला माहीत होता. त्यांत काळयांचा मुळीच दोष नव्हता. परंतु मी अडवणीत सापडलो. काळयांची बाजू घ्यावी तर कंपनी सोलापूरला नेणं अशक्य होतं. आणि सर्वच लोकांनी डॉ. रानडयांच्या चिथावणीमुळे संप पुकारला होता. बरं, त्यांची बाजू न घ्यावी तर काळयांवर अन्याय करण्यासारखं होतं. या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी मी कंपनीच्या डायरेक्टरांची तांतडीची सभा बोलावली. कारण सर्व डायरेक्टर पुण्यासच होते. त्या सभेमध्ये मी सर्व वस्तुस्थिती काळयांच्या समोर मांडली. तेव्हा काळे लगेच म्हणाले, 'हे पाहा डॉक्टर, तुम्ही इतके काळजीत का पडला तेच मला समजत नाही. तुम्हाला नाटयमन्वंतर जगवायचं आहे ना! मग तुम्ही माझा विचार करू नका. मी इथंच पुण्याला राहातो. तुम्ही नाटयमन्वंतर घेऊन सोलापूरला जा. तुम्ही माझी काही काळजी करू नका. प्रभात कंपनीचे डायरेक्टर व्ही. शांताराम यांनी मला बोलावणं पाठवलंच आहे. तेव्हा त्या कंपनीतच नोकरी धरीन. सोलापुरांत काम करायला – माझं काम करायला कुणी माणूस मिळणार नाही हे मला ठाऊक आहे. म्हणून जेव्हा माझी तुम्हाला गरज असेल तेव्हा तुम्ही मला ताबडतोब तार करा. मी लगेच येईन. तुमच्याविषयी माझ्या मनात कधीच गैरसमज उत्पन्न होणार नाही.' काळे यांचे हे उद्गार ऐकल्यानंतर असा निस्वार्थी मित्र मला लाभल्याबद्दल माझी मलाच धन्यता वाटली. यापूर्वी दात्यांनी शनिवार–रविवारी 'आंधळयांच्या शाळे'च्या प्रयोगासाठी येण्याचं कबूल केलं होतं.

सोलापुरांत गेल्यानंतर नाटयमन्वंतरचे प्रयोग व्यवस्थित रीतीनं सुरू झाले. 'आंधळयाच्या शाळे'तील सुशीलेचं काम सौ. विमलाबाई वसिष्ठ या करीत. बाकीचे सर्व नट-नटी पूर्वीचेच होते. आम्हाला उत्पन्नही बरं झालं. म्हणजे सगळा खर्च जाऊन आम्हाला थोडं फार कर्जाचं निवारणही करता आलं. इतक्यात आमच्यावर एक आपत्ती ओढवली. सोलापूरच्या प्रखर उन्हामुळं माझा ताप कमी होत होता, परंतु त्याच उन्हामुळे विमलाबाईंच्या मुलाला एकाएकी सनस्ट्रोक झाला. कंपनीत सर्वांचीच धावपळ आणि धांदल सुरू झाली. डॉक्टरला बोलावून योग्य ते उपचार केले. मुलाला थोडं बरं वाटू लागलं खरं, पण ज्योत्स्नाबाई मात्र फारच घाबरल्या. त्यांचा मुलगा किशोर हा त्यावेळी अगदीच लहान होता. सोलापुरांतील उन्हाचा आपल्या मुलावर काही परिणाम होईल की काय अशी त्यांना भीती वाटून त्या ओक्साबोक्शी रडू लागल्या. त्यांचं सांत्वन कसं करावं ते मला कळेना. शेवटी मी एक मनाशी निश्चय केला नि त्यांना सांगितलं, की 'दुर्गाताई,, किशोरला घेऊन तुम्ही पुण्याला जा. इथं आमची नाटकं

बंद पडली तरी चालतील. परंतु तुम्हाला अशा मनस्थितीत या ठिकाणी टेवून घेणं मला प्रशस्त वाटत नाही.' दुसरे दिवशी किशोरला घेऊन ज्योत्स्नाबाई दात्यांच्याबरोबर पुण्याला निघून गेल्या. ज्योत्स्नाबाईंची 'बिंबा'ची भूमिका आम्ही प्रेमाला दिली आणि 'आंधळयांच्या शाळे'चे प्रयोग पुन्हा सुरू झाले. एक दोन महिने गेल्यानंतर सोलापूरचा सीझन संपला. आम्ही परत पुण्याला जाण्याची तयारी करू लागलो. ज्या दिवशी आम्ही निघणार त्याच्या आदल्या दिवशींच्या प्रयोगाचं उत्पन्न मी प्रवास खर्चासाठी राखून ठेवणार होतो. परंतु आमचे त्यावेळचे मॅनेजर श्री. शुक्ल यांच्याकडून त्या उत्पन्नातील बरीच मोठी रक्कम श्री. दाते यांनी घेतली आणि त्याच रात्री ते पुण्याला निघून गेले. सकाळी उठल्याबरोबर 'प्रयोगाचं उत्पन्न किती झालं?' म्हणून मी शुक्लांना विचारलं. शुक्ल म्हणाले, 'उत्पन्न तसं बरं झालं. परंतु त्यातील बरीच मोठी रक्कम दात्यांनी माझ्याकडून मागून घेतली आहे.' मला दात्यांचा आणि शुक्लांचाही खूप राग आला. बेशिस्त वर्तन केल्याबद्दल मी शुक्लांना बोललोही. पण नुसता राग येऊन काय उपयोग?

पुण्याला कंपनी परत न्यायची कशी हा माझ्यापुढं मुख्य प्रश्न होता. विशेषतः 'तक्षशीले'चं इतकं अवाढव्य सामान न्यायला आणि आमचा कामगारवर्ग आणि नटनटींना न्यायला पुरण्याइतका पैसा माझ्याजवळ नव्हता. शिवाय थिएटरचं भाडं द्यायचं होतं ते वेगळंच. शेवटी मी असं ठरवलं की, थिएटर मालकाच्या ताब्यात 'तक्षशिले'चं सामान ठेवायचं आणि कामगार लोकांची जेवणाखाण्याची तात्पुरती व्यवस्था सोलापुरांतच करून बाकीच्यांना मी मोटारबसनं पुण्याला न्यायचं. पुण्याला आल्यानंतर आम्ही बादशाही बोर्डिंगांतच उतरलो हे सांगायला नकोच. यावेळेस दाते व काळे यांनी प्रभातमध्ये नोकरी धरल्यामुळे मी आणि काणेकर असे दोघेच कंपनीची व्यवस्था पाहाण्यास शिल्लक राहिलो होतो. हातामध्ये पैसा नाही आणि कंपनीचा रोजचा खर्च सारखा वाढत चाललेला. शिवाय आमच्या कामगार लोकांना सोलापूरला ठेवून दिलं होतं ते वेगळंच. आम्ही दोघे या गोष्टीचा सारखा विचार करीत असू, परंतु एकमेकांच्या तोंडाकडे पाहात बसण्यापलीकडे आम्ही काहींच करू शकलो नाही. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट एकच होती की, माझा ताप साफ नाहींसा झाला होता आणि माझी प्रकृती थोडी थोडी सुधारू लागली होती. हा वैयक्तिक उल्लेख या ठिकाणी करण्याचं कारण इतकंच की, माझा ताप जर तसाच राहिला असता तर कंपनी बंद करून मला मुंबईला परत गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. असे हे दिवस चालले असताना आमचे सोलापुरांतील कामकरी लोक कंटाळले. ते पुण्यापर्यंत पायी चालत आले. अर्थात त्यांची बोर्डिंगामध्येच मी व्यवस्था केली हे खरं, परंतु आम्हाला वाईट वाटत होतं ते हेच की, आमच्या कंपनीत हे लोक निव्वळ पोटावारी राहून काम करीत होते. कंपनीतून त्यांना वेळेवर पगार मिळत होता अशांतली गोष्ट नव्हे. या लोकांना आमच्यामुळे विनाकारण त्रास झाला याचं मला तर दुःख होत होतं, परंतु मला काही बोलताच येत नव्हतं. नेहमी शांत दिसणारे काणेकर मात्र खूप खवळले. त्यांनी नाटचमन्वंतरच्या आद्यप्रवर्तकांना एक दोन शिव्या हासडल्या, आणि नंतर ते म्हणाले, 'कुठं झक मारली नि या नाटचमन्वंतरच्या भानगडीत पुन्हा पडलो. पण हा सगळा घोटाळा तुमच्यामुळे झाला. कंपनीचा इतका खटाटोप आपण करतो, पण आपल्याला एक पैचीही प्राप्ती होत नाही. त्रास मात्र फार. हे लोक आता सोलापूरहून चालत आले, यांत केवढी बदनामी झाली!' मी काणेकरांना म्हटलं, 'असं चिडून जाण्यात काही अर्थ नाही. नाटचमन्वंतरची बिघडलेली घडी नीट करण्यासाठी तर आपण संस्था घेतली ना. ती नीट जर झाली नाही तर खरा दोष काही आपल्यावर येत नाही. आपण शक्य तितका प्रयत्न करून पाहिला. आता आपल्याला काहींच करता येत नाही. म्हणून नाटचमन्वंतर बंद करू आणि स्वस्थ बसू.' काणेकर म्हणाले, 'अहो, स्वस्थ बसायचं तर आहेच आपल्याला, पण त्यापूर्वी आपल्याला थोडे हातपाय हलवायला नकोत का? मी म्हणतो, नाटचमन्वंतर इतक्या चांगल्या परिस्थितींत निघालं असताना त्याची अशी आज हलाखीची परिस्थिती का व्हावी;' मी त्यांना म्हटलं, की 'नाटचमन्वंतरची अशी परिस्थिती व्हायला दोन गृहस्थ जबाबदार आहेत. श्री. वर्तक आणि श्री. दाते. वर्तकांनी आपल्या स्वतःच्या नाटकावर इतका अवाढव्य पैसा खर्च केला नसता तर नाटचमन्वंतरची घडी कधी बिघडली नसती. विशेषतः 'तक्षशीले'वर त्यांनी जो अवाढव्य खर्च केला, त्यानं नाटचमन्वंतरची तर कंबरच मोडून गेली. तरीसुद्धा वर्तकांचा मला तितका राग येत नाही. उलट त्यांचं कौतुक करावसं वाटतं. कारण त्यांनी नाटचमन्वंतरद्वारे आपली हौस भागवून घेतली असं जरी आपण म्हटलं, तरी या हौशीखातर त्यांनी एक, दोन नव्हे दहा हजारांची झीज सोसली आहे आणि त्यांना माहीत आहे की आपण त्यांना त्यातली एक पैही देऊ शकणार नाही. माझा खरा राग आहे केशवराव दात्यांवर. मुंबईमध्ये वर्तकांच्या हाती सर्व सूत्रं असल्यामुळे काही करता आलं नाही हे कबूल, पण पुण्याला कंपनी आल्यावर आपण ती त्यांच्या स्वाधीन केली नव्हती का? पुण्याला जुन्या नाटकांचे प्रयोग चालू असता या गृहस्थानं प्रभात कंपनीत नोकरी करण्याशिवाय दुसरं काहीच कलं नाही. सोलापूरला आम्हाला प्रवासखर्चापुरते सुद्धा पैसे जमवता आले नाहीत. त्यालाही दातेच जबाबदार आहेत. आज जर कंपनीची वाताहत झाली तर त्याची जबाबदारी तुमच्यावर नाही, माझ्यावर नाही, किंवा वर्तकांवरही नाही; त्याची सर्व जबाबदारी दात्यांवर पडते.'

काणेकर म्हणाले, 'तुम्ही म्हणता ते खरं आहे. पण आता पुढे काय करायचं? काही दिवसांपूर्वी बाबूराव पेंढारकर म्हणाले होते, की नाटचमन्वंतरसारखी संस्था जर जिवंत राहिली तर तिच्यापासून फिल्म कंपनीला फायदा आहे. म्हणून मी म्हणतो, कोल्हापूरला जाऊन बाबूरावांना भेटतो आणि बघतो ते आपल्याला काही मदत करतात का!' बुडत्याला काडीचा आधार म्हणून मी म्हटलं, 'तुम्ही कोल्हापूरला जा आणि काही जमतं की नाही ते पाहा.' काणेकर त्याच रात्री कोल्हापूरला निघून गेले आणि एक-दोन दिवसांनी बाबूरावांकडून एक हजार रुपये घेऊन परत आले. झालं. आम्हाला तात्पुरती मदत मिळाली आणि नाटचमन्वंतर जगण्याची आशा वाटू लागली. मी दुसऱ्या दिवशी सोलापूरला जाऊन तिथलं देणं देऊन टाकलं आणि नाटचमन्वंतरच राहिलेलं सामान घेऊन पुण्याला परत आलो.

पृष्ठ २९ वर

# चीनमधील हजार बुद्धांच्या गुंफा



## यशवंत भारद्वाज

चीनच्या कान्सुप्रांतातील तुंगव्हचुआन या गावात असलेल्या 'हजार बुद्धांच्या' गुहा जगप्रसिद्ध आहेत. सिकियांगमधून येणारे दोन रस्ते या ठिकाणी एक होऊन, चीनमध्ये प्रवेश करतात. या दृष्टीने पाहिले असता तुंगहचुआन हे चीनचे प्रवेशद्वार मानावयास हरकत नाही. सिकियांगवरून येणारे हे दोन रस्ते एकेकाळी अतिशय महत्त्वाचे होते. कारण या रस्त्यावरून जगातील व्यापारी, सर्थवाहनांचे तांडे चीनमधील रेशमी कापडासाठी येत असत. हा व्यापार मोठा किफायतशीर असल्यामुळे, या रस्त्यावर मोठी रहदारी असे. स्वाभाविकच या चीनच्या प्रवेशद्वाराजवळ कैक महिन्याचा प्रवास करून आलेले सार्थवाहनांचे तांडे विश्रांतीसाठी तुंगहचुआनमध्ये थांबत असत. सिकियांग मधून बुद्धधर्म पहिल्या शतकात चीनमध्ये पसरला होता. व्यापारी तांड्याच्या तात्पुरत्या प्रोत्साहनाने बुद्धभिक्षुंनी रस्त्यानजीक असलेल्या डोंगरावर अनेक गुंफा खोदल्या व बुद्ध-मठ स्थापिले. व्यापारी स्वाभाविकच देणग्या देत. आपला प्रवास सुखासमाधानाने पार पडावा म्हणून नवस करीत. या गुंफा त्यांच्या देणग्यांनी समृद्ध झाल्या असाव्यात हे उघड आहे. आणि असे मानावयास लेखी पुरावाही सापडतो. गुंफातील अनेक मूर्ति, त्याचप्रमाणे बुद्ध पुराणातील कथा विषद करणारी चित्रे, ह्या वस्तू देणाऱ्या या दात्यांची नावे अनेकदा मूर्तींच्या आसनावर व चित्राच्या खाली लिहिलेली दिसून येतात.

एका गुहेत असलेल्या शिलालेखावरून या गुंफाची वास्तुशांती इ. स. ३६६ साली केल्याचे सिद्ध होते. याचा अर्थ सर्वगुंफा त्याच साली तयार करण्यात आल्या असा होत नाही. इतर गुंफा त्यानंतर एका मागून एक तयार झाल्या असाव्यात. बहुतेक महत्त्वाच्या गुंफा इ. स. सातव्या ते दहाव्या शतकापर्यंत अस्तित्वात आल्या असाव्या, अशी तज्ज्ञांची कल्पना आहे व असे मानण्यास बराच पुरावाही आहे.

या सर्व गुंफात सुमारे हजारावर बुद्धाच्या मूर्ती आहेत. त्या बहुतेक सर्व व्यापारी लोकांच्या देणग्यातून तयार करण्यात आल्या होत्या. प्रत्येक सार्थवाहाचा तांडा चीनमध्ये जाते वेळी नवस करीत असे व परत येताना, किंवा दुसऱ्या प्रवासाच्या वेळी, केलेला नवस फेडीत असे. रेशीम व्यापाऱ्यांची त्या दिवसात चलती होती. युरोपमध्ये, विशेषतः रोममध्ये रेशमी कापडास व्यापारी मागेल ते मोल मिळत असे, यामुळे आपला प्रवास सुखाचा व फायद्याचा व्हावा या बुद्धीने बुद्धदेवास नवस करून पुढे जावे व येतेवेळी तो नवस फेडावा अशी व्यापाऱ्यांची पद्धत होती. स्वाभाविकच किफायतशीर काम हमखास मिळण्याची खात्री असल्यामुळे चांगले कलाकार या गुंफात, किंवा त्यांच्या आसपास रहात असावेत. चीन व शेजारचा सियांगप्रांत या दोन्ही ठिकाणी इ. सनाच्या पहिल्या दहा-अकरा शतकात महायान बुद्धधर्म बराच प्रचारात होता. मार्को पोलो या इटालियन प्रवाशाने आपल्या चीनमधील प्रवासाच्या वर्णनात सबंध एक प्रकरण या मूर्तींच्या वर्णनास दिले आहे. मार्को पोलो तेराव्या शतकात चीनमध्ये गेला होता. बुद्धधर्माच्या उतरत्या काळास आधी एक शतक प्रारंभ झाला होता.

या गुंफा एका नापिक दरीच्या डोंगराच्या उतारावर आहेत. त्या निरनिराळ्या उंचीवर आहेत. एकेकाळी या गुंफात जाण्याकरता

लाकडी जिने होते व एकाच पातळीवर असलेल्या निरनिराळ्या गुंफात जाण्याकरता एकमेकांना जोडणारे पूल होते. परंतु जेव्हा एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ह्या गुंफा आधुनिक प्रवाशांच्या, बऱ्याच शतकानंतर नजरेस आल्या, तेव्हा हे सर्व लाकडी भाग सडून मोडून गेले होते. फक्त त्यांचे अवशेष शिल्लक होते. त्यावरून त्यांच्या एकेवेळच्या अस्तित्वाची कल्पना येत असे. एकंदर गुंफा शंभराहून जास्त असून, त्या निरनिराळ्या आकाराच्या आहेत. काही प्रशस्त असून, विशेष कलाकुसरीने शृंगारलेल्या आहेत. दोन गुंफात ९० फूट उंच बुद्धमूर्ती आहेत. त्यांच्यावर प्रकाश पडावा म्हणून एकावर एक अशी प्रशस्त दालने खोदलेली आहेत. या दालनाच्या दोहो बाजूस समोरासमोर असलेल्या खिडक्यांतून या प्रचंड मूर्तीवर उजेड येतो व कुठल्याही मजल्याच्या मागल्या खिडकीतून मूर्तीचे दर्शन घडते. या दोन्ही मूर्तींचा सांगाडा खडकातून कोरून तयार केल्यावर, अवयव वस्त्रे व अलंकार प्लॅस्टरसारख्या मातीने, नंतर मूर्तीच्या शरिरावर व्यवस्थित लिपल्या होत्या. मुळात या प्रचंड पुतळ्यावर योग्य ते रंग चढविले होते. अलंकार इत्यादी वस्तू सोन्याच्या पानांनी भरल्या होत्या. अर्थात विसाव्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा अर्वाचीन संशोधक या गुंफात गेले, तेव्हा पुतळ्यावरील रंगरंगोटी व सोन्याच्या वर्खाने केलेले अलंकार इत्यादी नाहिसे झाले होते, परंतु जे अवशेष शिल्लक राहिले होते, त्यावरून एका वेळच्या कसबी रंगकामाची कल्पना येण्यासारखी होती.

बहुतेक सर्व गुंफांना खडकातून कोरलेले छप्पर असलेले सज्जे होते. त्यातील बरेच मोडून तोडून गेलेले होते. काही ठिकाणी या मूळ दगडी सज्जाच्या जागी लाकडी सज्जे जुन्या काळात केलेले आढळून आले, परंतु विसाव्या शतकात तेही मोडलेल्या स्थितीत होते. मात्र यावरून एक गोष्ट दिसून आली, की या गुंफा बरीच शतके पवित्र श्रद्धास्थान म्हणून अस्तित्वात असाव्यात; कारण खडकातून गुंफांबरोबर खोदून तयार केलेले पहिले सज्जे पडून झडून जाण्यास तीन-चार शतके लागली असावीत व त्यावेळी भाविक लोकांनी पडलेल्या सज्ज्याच्या जागी लाकडी सज्जे तयार करण्यास, तेथे राहणाऱ्या बुद्ध भिक्षूस, देणग्या दिल्या असाव्यात.

'हजार बुद्धांची गुंफा' हे युरोपियन संशोधकांनी दिलेले नाव यथार्थ होईल एवढ्या बुद्ध मूर्ती या गुंफात आहेत. नवसानुसार प्रत्येक सार्थवाहांच्या व्यापारी तांड्यांनी या मूर्ती गुंफास सुमारे सात शतकांच्या कालात अर्पण केल्या असाव्यात. प्रत्येक गुंफेतील गर्भगृहात एका मंचकावर बुद्ध मूर्ती किंवा बोधिसत्त्व मूर्ती स्थापिलेल्या आहेत. त्यांच्या शेजारी अनेक देवता व देवतुल्य अमानुष लोकांच्या किंवा बुद्ध साधूंच्या प्रतिमा उभ्या केलेल्या आहेत. मंचकाच्या सभोवार, व प्रदक्षिणा पथावर देखील अशा मूर्ती किंवा प्रतिमा ठेवलेल्या आढळून आल्या. मूर्तींची रचना, तिची लक्षणे या सर्व गोष्टी हिंदुस्थानातील मूर्तींच्या ठरलेल्या प्रथेप्रमाणे असलेल्या दिसून येतात. बुद्धधर्माचा प्रसार चीनमध्ये मध्य आशियातून झाला असल्यामुळे, व मध्य आशियातील प्रदेशात त्याचा प्रसार अफगाणिस्थानमार्गे गांधार मधून, म्हणजे आजच्या पेशावर भागातून झाला असल्यामुळे या सर्व मूर्ती तेथे प्रचारात आलेल्या मूर्ती विज्ञानानुसार (Iconography) तयार केलेल्या दिसून येतात. या प्रथेस अनुलक्षून एक दंतकथा या भागात अस्तित्त्वात आली होती. बुद्धमूर्तीचे परंपरागत स्वरूप मध्य आशियाच्या प्रदेशात सर्वस्वी आधारभूत आहे हे सिद्ध करण्यासाठी, ही दंतकथा बुद्ध भिक्षूंनी प्रचारात आणली असावी. अव्वल काळी जेव्हा बुद्धधर्म या प्रदेशात प्रचारात आला तेव्हा उद्यान (म्हणजे अफगाणिस्थानचा एक भाग) मधून तेथील सुप्रसिद्ध बुद्धमठातील मूर्ती आकाशातून उडत मध्य आशियातील खोतान प्रांतात आली व त्या मूर्तीच्या बरहुकूम इतर मूर्ती बनविण्यात आल्या ही दंतकथा तेथील मूर्तींना पुराणोक्त स्वरूप देण्यासाठी प्रचारात आणली गेली असावी ! आधुनिक संशोधकास बुद्धमूर्ती तयार करण्याचे साचे मध्य आशियातील वाळवंटात गडप झालेल्या अनेक गुंफात सापडले आहेत. यामुळे बहुतेक बुद्ध एक साची आढळून येतात. बोधिसत्त्वाच्या मूर्तीत मात्र वैचित्र्य आढळते. उदाहरणार्थ अतिशय लोकप्रिय असलेला बोधिसत्त्व म्हणजे अवलोकितेश्वर हा होय. याच्याबद्दलची धार्मिक कल्पना अशी होती की तो भक्ताच्या हाकेस धावून येण्यास नेहमी तयार असतो. निर्वाण झाले असताही, त्याचा स्वीकार न करता तो मानवास मदत करण्यासाठी आपल्या स्वर्गाच्या भागात सिद्धहस्त असा रहात असतो.

या बोधिसत्त्वाचे पुतळे त्याचप्रमाणे चित्रे वैचित्र्यपूर्ण आहेत. मुळातील ठराविक स्वरूपाच्या हिन्दी मूर्तिमध्ये नंतर अनेक नव्या-कल्पना समाविष्ट केलेल्या आढळून येतात. परंतु मूळस्वरूची त्यामुळे विकृती होणार नाही अशी काळजी घेण्यात येई, असे दिसून येते. अनेक इराणी, तिबेटी आणि मध्य आशियातील देशातील लकबी व कलावैचित्र्य अवलोकितेश्वराच्या चित्रात समाविष्ट झाल्याचे दिसून येते. पुष्कळदा अवलोकितेश्वरास अनेक हात दाखविण्यात यतात, तर काही चित्रात त्याच्या डोक्यामागील प्रभावळ तयार करण्यासाठी अनेक हात वर्तुळाकृतीमध्ये चितारलेले आढळून येतात. तो बोधिसत्त्व अनेक हातांनी भक्तगणास मदत करण्यास सिद्ध हस्त असतो याचे हे प्रतीकात्मक चित्रीकरण होय !

बहुतेक गुंफांच्या प्रदक्षिणा पथावरील मागील भिंतीवर सुंदर चित्रे, भींतीचे भाग पाडून, त्यामध्ये चितारलेली आहेत. त्यातील बरीच चित्रे शाबूत राहाण्याचे कारण गुहांच्या आजूबाजूच्या वाळवंटीतील शुष्क वाळू प्रदक्षिणापथाच्या चिंचोळ्या भागात गोळा होऊन, चित्रांच्या अगदी वरच्या भागापर्यंत लेपटून राहिली होती. यामुळे भिंतीवरील बहुतेक चित्रे हवापाण्याच्या माराने खराब झाली नाहीत. मध्यआशियातील एका गुंफेत सर ऑरियल स्टाईन गेला तेव्हा ती गुंफा पाशिष्टापर्यंत वाळूने भरली होती. स्टाईनने माणसे लावून वाळूचे ढीग बाहेर काढताच, मागल्या भिंतीना लेपून राहिलेली वाळूखाली सरकू लागली. त्यावरोबरच (स्टाईन लिहितो) त्याला आश्चर्याचा धक्का बसला. कारण भिंतीवरील अभिजात स्वरूपात असलेली चित्रे त्याला दिसून आली !

चीनच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या या 'हजारबुद्धांच्या गुफांत' भिंतीवरील चित्रे सुबक व सौंदर्य संपन्न अशी त्यास आढळून आली. चित्रांचे विषय बुद्धाच्या आयुष्यातील प्रसंग, अथवा जातक कथातील प्रसंग होते. चित्रातील प्रसंग जरी मूळ कथाप्रमाणे हिंदी

स्वरूपात होते, तरी त्याची पार्श्वभूमी चिनी स्वरूपाची होती. चित्राची रेखन पद्धत मूळ जरी इतरत्र, विशेषत: अजंठागुंफामध्ये दिसून येते, त्याप्रकारचीच होती तरी त्यातील बऱ्याच लकबा इराणी व चिनी पद्धतीच्या समिश्रणाने अस्तित्वांत आल्या होत्या. भिंती-वरील चित्रे अजिंठा प्रमाणे 'फ्रेस्को' पद्धतीने चितारण्या ऐवजी 'टेम्पास' पद्धतीने चितारलेली होती. परंतु त्यात 'फ्रेस्को' पद्धतीने चितारलेली चित्रे मुळीच नव्हती असे नाही. ती बहुतेक बौद्धसांप्रदायिक होती.

या भिंतीवरील चित्रांशिवाय एका बंदिस्त गुंफेत कापडाच्या तुकड्यांवर चितारलेली अनेक चित्रांचे गठ्ठे स्टाईनला सुदैवाने सापडले. १९०७ साली त्या गुंफाचे संशोधन करण्यासाठी काही दिवस स्टाईन तंबू ठोकून टुंग हुवान येथे राहिला, तेव्हा त्याने गुंफात राहाणाऱ्या एका 'स्टोईस्ट' पंथी भिक्षूशी दोस्ती केली. अर्थातच त्या टोईस्ट भिक्षुला त्याला चांदीच्या लगड्यांचा मुखलेप करावा लागला. परंतु तो व्यर्थ गेला नाही. एक मोठ्या गुंफेतील बंदिस्त दालन नाहीतर स्टाईनला माहित झाले नसते. टोईस्ट भिक्षूने त्या दालनाच्या तोंडावरची शिळा काढून स्टाईनला आत नेले. पूर्वकाळी परचक्राच्या भीतीने या गुंफा जेव्हा बुद्ध भिक्षूंनी सोडल्या व ते पळून गेले, त्यावेळी आपला मौल्यवान ठेवा त्यांनी या गुंफेच्या दालनात सुरक्षित ठेवला होता. अर्थात गडबडीने तो तेथे साठविल्यामुळे कापडावरील चित्रे, व हस्तलिखीत ग्रंथ दालनाच्या जमिनीवर ठेवून दिले होते. ग्रंथ बहुतेक चिनी भाषेतील बुद्ध धर्मीय (विशेत: महायान शाखेचे) धर्म ग्रंथ होते. एकदोन ग्रंथ संस्कृत भाषेत व खरोष्टी लिपीत लिहूलेले होते, काही तिबेटी होते. (खरोष्टी ही लिपी पंजाव व वायव्य सरहद्दीवरील प्रान्त यामध्ये इ. सनाच्या चवथ्या शतकापर्यंत प्रचारात होती. बाकी हिंदुस्थानच्या भागात सर्रास ब्राह्मी लिपी प्रचलित होती. ब्राह्मी लिपीची उत्क्रान्ती आजच्या नागरी लिपीत गुप्तकालानंतर झाली आहे.)

रेशमाच्या किंवा पातळ तागाच्या कापडाच्या तुकड्यावर चितारलेली चित्रे अतिशय सुबक व कलापूर्ण असल्याची साक्ष ब्रिटिश म्युझियमचा, त्यावेळी असलेला तज्ज्ञ-संरक्षक, ए. वॅले याने व जर्मन कलातज्ज्ञ ग्रुनवेडेल यांच्या त्या चित्राबद्दलच्या लिखाणाने मिळते. त्यातील बरीच चित्रे ब्रिटिश म्युझियमतर्फे वॅले यांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहेत. स्टाईनच्या गुंफांबद्दलच्या पुस्तकात देखील बरीच चित्रे रंगीत स्वरूपात घातलेली आहेत. ती पहाण्यासारखी सुंदर आहेत. बहुतेक चित्रात बुद्ध चरित्रातील प्रसंग, किंवा जातक कथातील प्रसंग, अगर बुद्ध भिक्षुच्या धार्मिक मिरवणुका, किंवा अवलोकिकतेश्वराच्या सुखवती या स्वर्गाची काल्पनिक चित्रे चितारलेली आहेत. या चित्रातील प्रसंग परंपरागत मूर्ती विज्ञान व कला यावर टीकात्मक लेख पेट्रुची (Petrucci), लॉरेन्स बिनीयन, फ्रेड अॅड्रूज व एफ्. लॉरिमर यांनी प्रसिद्ध केले आहेत. या सर्वांच्या मते ही चित्रे पाचव्या शतकाच्या पूर्वार्धापासून १० शतकापर्यंतच्या काळात तयार केली असावीत व ती सीलबंद दालनात अकराव्या शतकाच्या कुठल्या तरी वर्षी ठेवण्यात आली असावीत. त्यातील बरीच चित्रे टॅग् या प्रसिद्ध चिनी राजवटीत तयार झाली असावीत, असा त्यांचा अभिप्राय आहे. चित्रकार बहुतेक चिनी आहेत, तथापी त्यांमध्ये काही हिंदी चित्रकार असावेत असाही तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. त्यातील काही चित्रे उत्कृष्ट चित्रकारांची आहेत व इतर बरीच बाजारी असावीत असे दिसते.

ही कापडावरील चित्रे, ज्यांना पाश्चात्य संशोधकांनी Prayer flags–प्रार्थना किंवा पूजा चित्र–असे नाव दिले आहे व ज्यांना तिबेटमध्ये 'टंखा' असे नाव आहे. ही देवालयाच्या परिसरात दोरीवर टाकून ठेवीत. भाविकांनी ती पाहून आपल्या धर्मभावना चेतवाव्या अशी मूळ कल्पना होती. बहुतेक चित्रे निरनिराळ्या दात्यांची देणगी असे. अशा देणगीने पुण्य संपादन होते अशी त्यावेळी समजूत होती.

काही चित्रामध्ये मुख्य धार्मिक चित्राच्या समासामध्ये दात्याची चित्रे रेखाटली आहेत. ती अगदी हुबेहूब काढलेल्या तसविरी (Portrait) प्रमाणे आहेत. ते निरनिराळ्या देशांचे रहिवासी असल्यामुळे, त्यांचे चेहरे, त्यांचे पोशाख व इतर वैशिष्ट्यदर्शक गोष्टी संपूर्ण यथार्थ पद्धतीने चितारलेल्या आढळून येतात. अनेक देशांचे रहिवासी रेशमाच्या कपड्यासाठी लांबचा प्रवास करून चीनमध्ये येत असत व ते सर्व या गुंफात किंवा गुंफांच्या आसपास मुक्काम करीत व नवसाला पावणाऱ्या बुद्धदेवास देणग्या देत. तज्ज्ञ संशोधकांनी या चित्रांतून दिसून येणाऱ्या परदेशी नागरिकांची यादी तयार केली आहे, त्यात सिरीया, इराण, अरेबिया व हिंदुस्थान याचा समावेश आहे, असे दिसून येते.


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे



# अणुबॉम्बचे रहस्य

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने दोन अणुबॉम्ब जपानवर टाकले. लगेच जपानच्या शरणागतीबरोबरच दुसरे महायुद्धही संपले. पण अणुबॉम्बचे रहस्य (फार्म्युला) मिळविण्याच्या पाठीमागे रशिया लागला. अखेर त्यांच्या हेरगिरीला यश येऊन त्यांना अणुबॉम्बचे सूत्र कळले. पण त्या प्रकरणाचे धागेदोरे उलगडून अमेरिकेच्या एफ्. बी. आय्.ने रोजनबर्ग दांपत्याला फासावर चढवले....

**वसंत डोळस**

डॉ. फुशने गुन्हा कबूल केल्यावर अमेरिकेच्या फेडरल ब्यूरो ऑफ् इन्व्हेस्टिगेशनने एका प्रश्नावर आपलं सर्व लक्ष केंद्रीत केलं. ज्या व्यक्तीला एकदा नव्हे तर चांगले दहा वेळा अणुबॉंबच्या फार्म्युल्यासंबंधी सांगण्यात आले होते. ती व्यक्ती कोण? त्या संदर्भात त्यांच्यासमोर न्यूयॉर्क, सान्टा फे, न्यू मेक्सिको आणि केंब्रिज ही स्थळे होती.

डॉ. फुशने दिलेल्या माहितीवरून ती व्यक्ती चाळीस–पंचेचाळीसच्या दरम्यान असावी. त्याची उची पाच फूट, दहा इंच होती. शरिराने मजबूत व गोल चेहरा होता. तो वैज्ञानिक नव्हता. त्याचप्रमाणे अणुबॉंब निर्माण करणाऱ्या फॅक्टरीतील कर्मचारीही नव्हता. त्याला केमिस्ट्रीमध्ये थोडं फार ज्ञान अवगत होतं. कदाचित तो केमिस्टही असेल. तो आपलं नाव रेमंड असं सांगत असे. पण ते त्याचं खरं नाव नव्हतं.

या माहितीशिवाय डॉ. फुश गुप्तचर अधिकाऱ्यांना अधिक माहिती पुरवू शकला नाही. इतक्या विशाल क्षेत्रात त्याने वर्णन केल्याप्रमाणे अनेक माणसे असतील. तसाच चेहरा, तशीच उंची. त्यामुळे आता कोठून सुरुवात करावयाची यावर परत गुप्तचर विभागाचे अधिकारी विचार करू लागले.

तो केमिस्टच असावा. या विचाराजवळ गुप्तचर विभागाचे अधिकारी येऊन पोहोचले. त्यासाठी डॉ. फुशची बहीण श्रीमती क्रिस्टल हेनमन आणि तिचे पती यांना ते केंब्रिजमध्ये जाऊन भेटले. त्या पतिपत्नीने सांगितले की, १९४५ मध्ये जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात एक अपरिचित व्यक्ती आमच्याकडे आली होती. व त्यांनी डॉ. फुशच्या संदर्भात आमच्याजवळ चौकशी केली होती. पण त्यावेळी सुटीत डॉ. फुश आमच्याकडे आले नव्हते. ती व्यक्ती देहानं मजबूत व चाळीस

पंचेचाळीसच्या दरम्यान होती. त्या व्यक्तीने आपला न्यूयॉर्कमधील एक टेलिफोन नंबर सांगितला होता. व फुश आल्यावर त्यांना या नंबरवर फोन करावयास सांगा असेही सांगितले होते. फेब्रुवारीमध्ये ती व्यक्ती परत आमच्याकडे आली. त्यावेळी डॉ. फुशही येथेच होते. तो डॉ. फुश त्याच्या चांगलाच ओळखीचा असावा. ते दोघेही बराच वेळ बोलत बसले. त्या व्यक्तीला लहान मुलांचा चांगलाच लळा असावा असे वाटते. कारण त्या व्यक्तीने त्यांना तुम्हाला केमिस्ट्रीचा एक सेट देईन असे सांगितले. जेव्हा गुप्तचर अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीचं नाव विचारलं तेव्हा त्यांनी ते आपल्या लक्षातच राहिलं नाही, असं सांगितलं.

या माहितीने गुप्तचर विभागाचे विशेष समाधान झाले नाही. एक मात्र झालं की, डॉ. फुशने वर्णन केलेली व्यक्ती त्यांनी सांगितलेल्या माहितीशी मिळती जुळती होती. अणुबाँबसंबंधी माहिती केंब्रिजमध्ये मिळवणारी व्यक्ती म्हणजे रेमंडच होती.

त्यामुळे आता गुप्तचर विभागाने आपले लक्ष केमिस्टांकडे वळविले. ते त्या लोकांच्या फाईल्स व इतर कागदपत्र, जुने रेकॉर्ड जाऊन पाहू लागले. काम सोपं नव्हतं. एकट्या न्यूयॉर्क शहरात केमिस्ट्रीचा व्यवसाय करणाऱ्या पंच्याहत्तर हजार फर्म्सला लायसेन्स मिळाली होती. पण तरी देखील गुप्तचर विभागाने हात टेकले नाहीत. त्यांनी आपलं काम नेटानं सुरू केलं व प्रथम पंधराशे, नंतर दोन हजार असं करीत करीत ते हॅरी गोल्डपर्यंत येऊन पोहोचले.

हॅरी गोल्डचं नाव गुप्तचर विभागाच्या लक्षात १९४७ मध्ये आलं. जेव्हा ते कम्युनिस्टांसाठी हेरगिरी करणारी मिस् एलिझाबेथ टी. बेंटले ही पकडली गेल्यावर व तिने गुन्हा कबूल केल्यावर तिने दिलेल्या माहितीचा पडताळा घेत असताना एका फाईलमध्ये गोल्डचे नाव एक केमिस्ट म्हणून नोंदविल्याचे आढळले.

पण गोल्ड सध्या कोठे आहे ? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी त्यांनी परत आपलं जाळं पसरलं. संबंधित ठिकाणी चौकशी केली. तेव्हा त्यांना असं आढळून आलं की, गोल्ड हा फिलाडेलफियाच्या जनरल हॉस्पिटलमधील बायालॉजिक सेक्शनचा इन्चार्ज आहे. १९ मे, १९५० मध्ये डॉ. फुशला चौदा वर्षांची कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यानंतर एफ. बी. आय. चे दोन अधिकारी फिलाडेलफियाच्या जनरल हॉस्पिटलमध्ये गेले. व त्यांनी आम्हाला तुमची मुलाखत घ्यावयाची असे गोल्डला सांगितले.

त्यावर गोल्ड म्हणाला,

'मी सध्या कामात आहे. आपण संध्याकाळी या !'

गुप्तचर अधिकारी त्याच्या सांगण्यानुसार बाहेर गेले व संध्याकाळी जेवण करून परत आले. गोल्ड त्यांचीच वाट पहात होता. मागेही एकदा आपल्याकडे गुप्तचर विभागाचे अधिकारी आले होते. याची त्याला आठवण झाली. गोल्डला डॉ. फुशचा फोटो दाखविण्यात आला. त्यावर तो म्हणाला,

'हा एक निष्णात फोटोग्राफर आहे. त्याचप्रमाणे तो ब्रिटीश हेर पण आहे. पण आपला आणि याचा परिचय नाही. पण त्याचे फोटो मी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले पाहिले आहेत. त्यामुळे हा फोटो जरा ओळखीचा वाटला !'

'केंब्रिजमधील हेनमन या पतीपत्नींना आपण ओळखता का ?'

'नाही. त्यांना मी ओळखीत नाही. केंब्रिज, सान्टाफे, आणि न्यू मेक्सिकोमध्ये माझ्या ओळखीचे कोणीच नाही.'

गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्याच्या प्रश्नांची उत्तरे तो अगदी सरळ सरळ व हसतमुखानं देत होता. जणू एखादी गोष्ट लपवून ठेवण्याचा त्याच्या बोलण्यामागेही उद्देश दिसत नव्हता.

त्याला जे प्रश्न विचारण्यात आले त्यांची उत्तरे देताना त्याने काही चुका केल्या. त्याच्याकडून महत्वाची अशी फारशी माहिती मिळाली नाही. ज्या गोष्टींच्या संदर्भात गुप्तचर अधिकाऱ्यांनी त्याला प्रश्न विचारले त्या गोष्टी खऱ्या असूनदेखील त्याने त्यावर बोलण्याचे कटाक्षाने टाळले.

आठवडा उलटल्यावर ते अधिकारी परत गोल्डकडे गेले. परत गोल्डला अनेक प्रश्न विचारण्यात आले. तेव्हा तो म्हणाला, 'मला जे काही माहित होतं ते तुम्हाला सांगून टाकलं आहे. मी काहीही लपवून ठेवलेलं नाही. आपल्याला जर अजूनही माझा संशय येत असेल तर आपण माझ्या घराची झडती घ्या !'

त्याने आपल्या घराची झडती घेण्यासाठी एफ्. बी. आय. ला लेखी संमती दिली. त्याचं दुमजली निवासस्थान ६८२३, किंडर्ड स्ट्रीट, फिलाडेलफियामध्ये होते.

गोल्डने लेखी संमती दिल्यावर गुप्तचर अधिकाऱ्यांनी वर दिलेल्या पत्त्यावर जाऊन गोल्डच्या बेडरूमची झडती घ्यायला सुरुवात केली. त्याठिकाणी त्यांना पत्रे, पुस्तके आणि त्याचे कामकाजाचे कागदपत्र आढळले. गोल्ड एका खुर्चीवर आरामात बसला. कारण झडतीचे काम बराच वेळपर्यंत चालणार होते.

गुप्तचर अधिकाऱ्याने बुक केसमागे सहज डोकावून पाहिले. त्याजागी कित्येक वर्षांत कुणाचा हात लागला नव्हता असं वाटतं. कारण त्या ठिकाणी बरीच घाण साचली होती. त्यात एक पिवळसर रंगाचा फोल्डर होता. तो त्याने उचलला. तो टुरिस्टांसाठी चेंबर ऑफ् कॉमर्सचा नकाशा होता. तो सान्टा फे चा नकाशा होता.

कधी कधी एखादी क्षुल्लक गोष्टही गुन्हा उजेडात आणावयास कारणीभूत ठरू शकते हे गोल्डच्या लक्षात यायला क्षणाचाही अवधी लागला नाही. गोल्डच्या नजरेसमोर पटकन् ती घटना उठून उभी राहिली.

२ जून १९४५ मध्ये तो सान्टा फे मध्ये येऊन पोहोचला आणि तेथेच भटकत असताना त्याने एका न्यूज पेपरच्या स्टॉलवर तो विकत घेतला होता. नंतर त्याने तो नकाशा खिशात टाकला. त्या दुर्लक्षिलेल्या क्षुल्लक गोष्टीचा परिणाम आज पाच वर्षांनी समोर येत होता.

तो नकाशा उघडून गोल्डच्या समोर धरीत गुप्तचर अधिकारी म्हणाले, 'आपण तर आम्हाला सांगितले होते की, मी या भागात गेलोच नाही. पण आपण या भागात गेला होता का ?'

हॅरी गोल्ड त्या नकाशाकडे पहातच राहिला. या प्रश्नाला काय उत्तर द्यावं हे सुचेना. बराच वेळ तो गप्पच बसला. गुप्तचर अधिकारी त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव डोळ्यात साठवीत होते. गोल्ड केव्हा आपल्या प्रश्नाचे उत्तर देतो याची ते वाट पहात होते. आणि अगदी सहजगत्या या प्रकरणात सापडलो आहोत याची त्याला पुरेपूर कल्पना आली. आता यातून आपली सुटका होणे अशक्यप्राय आहे असे वाटून गुन्ह्याची कबुली हा एकच पर्याय उत्तम आहे

असे त्यांना वाटले. गलितगात्र झालेल्या एखाद्या प्राण्यासारखी आता त्याची अवस्था झाली.

आणि त्याने लगेच त्या अधिकाऱ्यांसमोर आपल्या गुन्ह्याची कबुली दिली.

'डॉ. फुशने ज्या व्यक्तीला माहिती दिली होती ती व्यक्ती मीच होय!'

आणि मग डॉ. फुशने पकडल्यावर जशी सर्व गुन्ह्यांची कबुली दिली होती त्याप्रमाणे गोल्डने आपण केलेल्या सर्व कृत्यांची कबुली दिली व त्या अधिकाऱ्यांपासून काहीएक लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला नाही.

न्यूयॉर्क, सान्टा फे आणि केंब्रिजमध्ये आपण डॉ. फुशला कुठे कुठे भेटलो, अणुबाँबचा फार्म्युला त्यांच्याकडून कसा मिळविला व जॉनचे स्वाधीन कसा केला ही हकिगत अगदी सविस्तरपणे सांगून टाकली.

'जॉन' हे त्या व्यक्तीचे बनावट नाव होते. त्या व्यक्तीचे खरे नाव होते, अनातोली ए. याकोवलेव आणि तो न्यूयॉर्कच्या रशियन वकिलातीत व्हॉईस-कॉन्सल म्हणून काम पहात होता.

'आपण आपल्या देशाचा आणि कोटच-वधी नागरिकांचा विश्वासघात का केलात?'

त्यावर हॅरी गोल्ड म्हणाला,

मी रशियासाठी हेरगिरी करण्याची कामगिरी इ. स. १९३६ मध्ये अंगावर घेतली व रशियासाठी हेरगिरी सुरू केली. औद्योगिक क्षेत्रात आगेकूच करणाऱ्या राष्ट्राला मी जाणून बुजून मदत करीत होतो.

डॉ. फुशबरोबर काम करीत असतानाचे अनुभव सांगताना तो म्हणाला,

'एक मित्र राष्ट्र म्हणून रशियन सूचना मिळविण्याचे कामी मी मदत करीत होतो!'

शेवटी डॉ. फुशप्रमाणेच गोल्डही आपलं कारस्थान उजेडात येईल, याला भीत होता. जर आपण या प्रकरणात अडकलो व पकडलो गेलो तर आपल्यानंतर आपल्या कुटुंबियांचे काय होईल? याचीही त्याला चिंता वाटत होती. कारण आपल्या या भानगडीचा त्याने आपल्या कुटुंबियांना थांगपत्ता लागू दिला नव्हता.

पण आता पुढे गेलेल्या मार्गावरून त्याला परत मागे फिरता येणे अशक्य होऊन बसले होते. या संदर्भात तो म्हणाला,

'मी या प्रकरणात इतका गुरफटून गेलो की, इच्छा असूनही त्यातून अंग काढून घेता येईना. मी एका परक्या राष्ट्राला आपल्या देशाचं एक गुपित उघड करून सांगत होतो. याचा परिणाम काय होईल, याचा मी साधा विचारही करू शकत नव्हतो. मला कल्पना होती की, जर आपण या प्रकरणी पकडलो गेलो तर कठोरात कठोर शिक्षा आपल्याला मिळाल्याशिवाय राहणार नाही आणि त्या भीतीनेच मी तो विचार करण्याचे सोडून दिले होते.'

चौदा वर्षे रशियासाठी हेरगिरी करीत असताना आपला कोणा कोणाबरोबर संबंध आला, त्याने त्या लोकांची नावेही सांगून टाकली. त्यामध्ये अमेरिकन लष्करातील एक भूतपूर्व सार्जंट पण होता. त्याचं वय होतं, अठ्ठावीस आणि नाव होतं, डेव्हिड ग्रीन ग्लास. तो आपली पत्नी रुथ आणि दोन मुलांसह न्यूयॉर्कमध्ये २६५ रिव्हिंग्टन स्ट्रीट, एपार्टमेंट नंबर ६ मध्ये रहात होता.

त्या पत्त्यावर जेव्हा गुप्तचर विभागाचे दोन अधिकारी जाऊन पोहचले. तेव्हा ग्रीन ग्लास आपल्या छोट्या बेबीसाठी किचनमध्ये दूध तयार करीत होता. त्यावेळी दुपारचे एक वाजून पंचेचाळीस मिनिटे झाली होती आणि तो दिवस होता, १५ जून, १९५०. दरवाजा ठोठावल्यावर ग्रीन ग्लास किचन-मधून बाहेर आला आणि त्याने दरवाजा उघडला.

'डेव्हिड ग्रीन ग्लास आपणच का?'

'होय मीच!'

'आम्ही आत येऊ का?'

'या ना!' हसतमुखाने तो म्हणाला.

त्याच्या मागोमाग एफ. बी. आय. चे अधिकारी आत आले. आणि बैठकीच्या खोलीत शिरले.

'आम्ही एफ. बी. आय. कडून आलो आहोत!' त्यातील एकजण म्हणाला.

त्या अधिकाऱ्यांनी आपापले आयडेन्टि-फिकेशन कार्ड त्याला दाखविले.

'आम्ही लास आलमोस प्रोजेक्टच्या चोरीस गेलेल्या काही वस्तूंच्या तपासासाठी आलो आहोत. तुम्हीही तेथेच काम करीत होता ना?'

'होय!' ग्रीन ग्लास म्हणाला. 'परंतु मी आपल्याला काहीच मदत करू शकणार नाही. कारण मला त्या संदर्भात काहीच माहिती नाही!'

तरी देखील त्या अधिकाऱ्यांनी ग्रीन ग्लासला अनेक उलट सुलट प्रश्न विचारले. शेवटी ते अधिकारी म्हणाले,

'आम्ही या अॅपार्टमेंटची झडती घेऊ का?'

'जर आपली इच्छाच असेल तर आपण खुशाल झडती घ्या. मला काहीच लपवून ठेवायचं नाही!'

ग्रीन ग्लासने संमती दिल्यावर त्या अधि-काऱ्यांनी लगेच त्या जागेची झडती घेतली. आणि जाताना ग्लास पती पत्नीचे चोवीस फोटो घेऊन ते तेथून निघून गेले. त्या फोटो-ग्राफमध्ये लष्करी युनिफॉर्ममधील ग्रीन ग्लासचा एक फोटो होता.

एफ. बी. आय. चे अधिकारी ते फोटोग्राफ घेऊन हॅरी गोल्डकडे गेले. केमिस्टने बारका-ईने त्या फोटोग्राफकडे पाहिले आणि म्हणाला, 'मी अल्बुकर्कमध्ये या व्यक्तीला भेटलो होतो!'

'आपली ही भेट केव्हा झाली होती?'

'जून, १९४५ मध्ये!'

'कोणाच्या सांगण्यावरून आपण यांना भेटला होता?'

'मी रशियन गुप्तचर विभागाचे संचालक 'जॉन' यांच्या आदेशाप्रमाणे काम करीत होतो. ज्या व्यक्तीचा हा फोटोग्राफ आहे त्या व्यक्तीने लास आलमोसमध्ये आपल्या कामाच्या संदर्भात मला माहिती दिली. ती मी लगेच जॉनला कळविली.

'आपण दिलेल्या माहितीखाली स्वतःची सही कराल का?'

त्यावर त्याने डोके हलवून होकार दिला.

काही वेळपर्यंत ग्रीन ग्लास आपण निर्दोष असल्याचे नाटक करीत राहिला. पण शेवटी उलट सुलट प्रश्नांच्या माऱ्यापुढे त्याने डॉ. फुश व गोल्डप्रमाणेच हात टेकले आणि त्या प्रकरणातील आपली भूमिका व कामगिरी त्याने त्या अधिकाऱ्यांना सांगून टाकली. कोणा एका व्यक्तीला या प्रकरणाची सर्व हकीगत माहीत नव्हती. परंतु मिळालेल्या माहितीची एफ. बी. आय. च्या अधिकाऱ्यांनी जेव्हा सुसंगतवार अशी मांडणी केली. तेव्हा ह्या हेरगिरीचे चित्र अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले. एफ. बी. आय. च्या अधिकाऱ्यांना या प्रकरणाची जी हकीगत कळली आणि

फेडरल कोर्टामध्ये खटल्याचे कामकाज सुरू झाल्यावर जी माहिती बाहेर आली ती याप्रमाणे–

२९ नोव्हेंबर, १९४४ मध्ये टी/४ सार्जेंट डेव्हिड ग्रीन ग्लासच्या गुप्त अणुबाँब कारखान्याचे लास आलमोसमध्ये स्थानान्तर झाल्यावर तीन महिन्यांनी रुथ ग्रीन ग्लास न्यू मेक्सिकोमधील अल्वुकर्क येथे येऊन पोहोचली. त्या कारखान्यात डेव्हिड मशीनिस्ट म्हणून काम करीत होता. ती आल्यावर त्याने पाच दिवसांची रजा काढली. फ्रांसिकान हॉटलमध्ये तो आपल्या पत्नीला भेटला. त्यांच्या लग्नाचा त्या दिवशी दुसरा वाढदिवस होता.

एके दिवशी ती दोघे हाय-वे ६६ वर भटकत असताना रूथने न्यूयॉर्कमध्ये असताना ज्युलियस व एथेल रोजनबर्ग भेटल्याचे सांगितले. त्याचबरोबर कोणत्या विषयावर बोलणी झाली ते पण सांगितले. एथेल डेव्हिडची बहीण होती.

ती म्हणाली, 'ज्युलियसने मला सांगितले की, मी आणि एथलने कम्युनिस्ट पक्षाचे काम सोडून दिले आहे. आम्ही आता क्लबमधील मिटिंगला पण जात नाही आणि डेली वर्करची वर्गही देणेही आम्ही बंद केले आहे !'

डेव्हिडने आश्चर्यचकित होऊन विचारलं,

'पण का ?'

त्यावर रुथ म्हणाली,

'ज्युलियसला जे काम करण्याची मनापासून इच्छा होती ते काम आता त्याला आता मिळालं आहे. आणि ते काम म्हणजे रशियासाठी हेरगिरी करणे हे होय !'

रुथ म्हणाली, आपण कोठे आहात? काय काय करता याची त्यांना पुरेपूर कल्पना आहे. आपण अणुबाँबच्या कारखान्यात काम करता हे त्यांना ठाऊक आहे आणि म्हणूनच ज्युलियस आणि एथेलचा आपणाला तसा निरोप आहे की, अणुबाँबचा फार्म्युला आपण आम्हाला कळवा. म्हणजे तो फार्म्युला ते लगेच रशियन गुप्तचर विभागाला कळवतील व त्यामुळे रशियाचा चांगलाच फायदा होईल. अणुबाँबचं रहस्य अमेरिका, रशिया व इतर दोस्त राष्ट्रांपासून लपवून ठेवीत आहे. म्हणून रशिया या मार्गाचा अवलंब करीत आहे !'

ते ऐकून डेव्हिड चांगलाच हादरला.

'रूथ, असं मी करू शकणार नाही !'

पण दुसऱ्या दिवशी रूथने त्याची समजूत घातल्यावर तसे करण्यास त्याने आपली संमती दर्शविली.

ज्युलियस व एथेलने अनेक वर्षांपासून जणू त्याच्यावर स्वतःचं वर्चस्वच स्थापन केलं होतं. तो चौदा वर्षांचा असतानाच त्यांनी त्याला 'यंग कम्युनिस्ट लिग 'चा सभासद होण्यास भाग पाडले होते. त्याच्या आई-वडिलांना मात्र जावईबापूंची कम्युनिस्ट धार्जिणी वृत्ती अजिबात पसंत नव्हती. त्यामुळे एथेलने ज्युलियसबरोबर विवाह करणे हेही त्यांना पसंत नव्हते. डेव्हिडला मात्र मेव्हणा पसंत होता. मात्र ज्युलियसने एखादी मोठी कामगिरी अंगावर घेऊन आपला जीव धोक्यात घालू नये असं त्याला मनापासून वाटत होतं.

डेव्हिडने रूथला लास आलमोराच्या अणुबाँबच्या कारखान्यात ले-आऊट आणि त्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची व वैज्ञानिकांची नावे व संख्या सांगितली. त्या सर्वांची नावेपण सरकारीरीत्या गुप्त ठेवण्यात आली होती. तरी देखील डेव्हिडने ती माहिती मिळविली व ती रूथला सांगितल्यावर तो म्हणाला, तू लवकरात लवकर ही हकिगत ज्युलियस व एथेलच्या कानावर घाल.

त्यानंतर दोन महिने उलटले. नंतर सुट्टीत डेव्हिड न्यूयॉर्कला आला. नंतर ज्युलियसच्या सांगण्यावरून त्याने अणुबाँब निर्मितीसंबंधी प्लेटच्या सहाय्याने काही स्केच केले. त्याचा अणुबाँबच्या परिक्षणासाठी अत्यंत उपयोग होणार होता. त्याने लास आलमोसमधील कम्युनिस्ट धार्जिण्या काही लोकांची नावे पण ज्युलियसला सांगून टाकली कारण त्यांना या कामात सामील करून घेतल्यास त्याचाही चांगलाच उपयोग होण्यासारखा होता.

एक दोन दिवसानंतर डेव्हिड आमंत्रणावरून रोजनबर्ग दांपत्याच्या निवासस्थानी गेला. त्याच्याबरोबर रूथही होती. ज्युलियसने रूथला विचारले,

'आपण अल्वुकर्कमध्ये वास्तव्य कराल का ?'

'होय, अगदी आनंदानं वास्तव्य करीन !'

'बरं, मग तुम्ही गेलात असंच समजा· तुमचा जाण्याचा खर्च व तेथील खर्च याचा बंदोबस्त मी करीन. त्यासाठी लागणारा पैसा आपणाला रशियाकडून सप्रेम भेट म्हणून मिळेल !

नंतर ज्युलियस डेव्हिडकडे वळून म्हणाला, तुला मिळालेली गुप्त माहिती मिळविण्यासाठी आमचा गुप्त माणूस येईल. त्यासाठी विशिष्ट खूणही वापरण्यात यईल !'

नंतर ज्युलियसने कार्डबोर्डच्या डब्याचा एक भाग काढला. नंतर त्याने चौकोनी तुकड्याचे दोन भाग केले. ते तुकडे अशारीतीने कापले की, ते जोडल्यावर एक सलग चौकोनी तुकडा दिसत असे. एक तुकडा त्याने रूथला दिला व एक स्वतःजवळ ठेवला.

जानेवारीमध्ये सुटी संपल्यावर डेव्हिड परत लास आलमोसला परतला. रूथ फेब्रुवारीमध्ये अल्बुकर्कला निघून गेली व तेथे नॉर्थ हाय–वे स्ट्रीटच्या अॅपार्टमेंट नंबर २०६ मध्ये राहू लागली. आठवड्यातून सुटी पडल्यावर डेव्हिड सहजपणे तिच्याकडे येऊन जात असे.

त्यादिवशी रूथ आणि डेव्हिड आतमध्ये होते. इतक्यात कुणीतरी बाहेरून बटन दाबले. त्याचा त्या व्यक्तीशी अजिबात परिचय नव्हता. ती व्यक्ती हॅरी गोल्ड ही होती.

काही दिवसांपूर्वीच गोल्ड रशियन व्हाईस कौन्सल अनातोली याकोवलेव यांना भेटला होता. ते दुसऱ्या टेबलाजवळ जाऊन बसले व महत्त्वाच्या विषयावर त्यांनी चर्चा केली. त्याचठिकाणी गोल्ड जेव्हा सान्टाफे वरून परत येईल. तेव्हा त्याने त्यांची कोठे, केव्हा गाठ घ्यायची ते पण ठरले. गोल्ड डॉ. फुशकडून अणुसंबंधी माहिती मिळविण्यासाठी तिकडे जाणार होता. तेव्हा याकोवलेवने गोल्डला सांगितले की, डॉ. फुशकडून परतताना आपण अल्बुकर्क येथे जावे कारण तेथेही एक महत्त्वाचं काम आहे.

पण अल्बुकर्क येथे जाण्यास गोल्डने नापसंती दाखविल्यावर याकोवलेवने माझा तसा आदेश आहे, असे त्याला सांगितले.

मग मात्र गोल्ड गप्प बसला. याकोवलेवने गोल्डला ओनियन स्किन पेपरचा एक तुकडा दिला. त्यावर ग्रीन ग्लासचं नाव आणि पत्ता होता. त्याखाली लिहिलं होते.

'संकेत ओळखा. मी ज्युलियसकडून आलो आहे !'

याकोवलेवने गोल्डला आणखी एक वस्तु दिली. तो कार्डबोर्डचा कापलेला एक तुकडा होता. ती एक सांकेतिक खूण होती. त्याचबरोबर त्याने ग्रीनग्लासला देण्यासाठी गोल्डजवळ एक बंद पाकीट दिले. त्या पाकिटमध्ये पाचशे डॉलरच्या नोटा होत्या.

२ जून, १९४५ या दिवशी गोल्ड सान्टा फेला येऊन पोहोचला. बराच वेळ होता. म्हणून तो शहरात भटकू लागला. त्याच ठिकाणी त्याने पिवळसर फोल्डरचा सान्टा फेचा नकाशा एका न्यूजपेपरच्या स्टॉलवर विकत घेतला. पण एफ. बी. आय. चे लोक आपल्यामागे लागतील याची त्याला स्वप्नात देखील कल्पना नव्हती. ठरलेल्यावेळी भेटण्यासाठी जेव्हा तो सान्टा फेच्या रस्त्यावरून चालला होता त्यावेळी एक वैज्ञानिक त्याच्याच रोखाने येत असलेला दिसला. त्याच्याजवळ आल्यावर कार थांबली. तो आत जाऊन बसला. काही मिनिटांनी अणुबाँबच्यासंबंधी महत्त्वाचे कागदपत्र असलेले एक पुडके डॉ. फुशने त्याच्या स्वाधीन केले. त्याने गोल्डला सांगितले की, पुढच्या महिन्यात आल्मो गोर्डो या ठिकाणी अणुबाँबची परीक्षणात्मक चाचणी घेतली जाणार आहे. हे ठिकाण न्यू मेक्सिकोमध्ये आहे.

सान्टा फे मधील आपली कामगिरी पार पाडल्यावर गोल्ड बसनेच अल्बुकर्ककडे रवाना झाला. तो शनिवारचा दिवस होता. तो अंधार पडल्यावर अल्बुकर्कला पोहोचला व दिलेल्या पत्त्यावर गेला. पण त्यावेळी रूथ व डेव्हिड बाहेर गेल्यामुळे भेट होऊ शकली नाही. गोल्डने रात्री एका लॉजमध्ये मुक्काम ठोकला. दुसऱ्या दिवशी हिल्टन हॉटेलमध्ये आपले सामान ठेवून तो हायवे स्ट्रीटकडे निघाला.

डेव्हिड आणि रूथ नास्ता करून उठले होते. तेवढ्यात तो तेथे जाऊन पोहोचला व दारावरचं बटन दाबलं.

दरवाजा उघडला गेला.

'ग्रीनग्लास आपणच का ?'

'होय !'

गोल्ड आत आला आणि त्याला म्हणाला, 'ज्युलियसने मला पाठविलं आहे !'

'तुम्ही असं अचानक याल असं वाटलं नव्हतं मला. त्याने रूथच्या पर्समधून कार्डबोर्डचा तुकडा काढला. त्याचवेळी दुसरा तुकडा गोल्डने खिशातून काढून त्याच्या पुढे केला. ते दोन्ही तुकडे अगदी सारख्या आकाराचे होते. ते एकमेकात अगदी घट्ट बसले.

मग गोल्डने डेव्हिडला विचारलं,

'आपल्याजवळ मला सांगण्यासारखं काही विशेष आहे का ?'

'काही आहे. पण मला ते लिहूनच द्यावं लागेल. आपण थोड्या वेळाने आलात तर बरं होईल !'

डेव्हिडने गोल्डची आपल्या पत्नीबरोबर ओळख करून दिली.

गोल्ड निघून गेल्यावर ग्रीनग्लास आपल्या कामासाठी बसला. ज्या लेन्सवर तो काम करीत होता त्याचे त्याने स्केच केले. या लेन्सचा उपयोग ट्रिगरिंग डिव्हाइसमध्ये कसा केला जातो यासंबंधी खालच्या बाजूला त्याने टीपा लिहिल्या. त्याने त्या कागदपत्रात हेरगिरीसाठी काही रशियन धार्जिण्या लोकांची नावेपण सुचविली.

सप्टेंबर, १९४५ मध्ये डेव्हिड न्यूयॉर्ककडे गेला होता. तोपर्यंत हिरोशिमा आणि नागासाकीवर बाँबही जाऊन पडले होते व त्यामुळेच जपानने लगेच शरणागती पत्करली व दुसरं महायुद्ध समाप्त झालं.

यावेळी नागासाकीवर ज्याप्रकारचा अणुबाँब टाकण्यात आला होता त्याचे संपूर्ण स्केच डेव्हिडने ज्यूलियसला कळविण्यासाठी तयार केले होते. याबरोबरच लॉस आलमोसमध्ये चाललेल्या घडामोडीचा वृत्तांतही त्याने तयार केला होता.

ही सर्व हकिगत व माहिती जेव्हा पुडक्यातून ज्युलियसला मिळाली तेव्हा त्याला भलताच आनंद झाला. डेव्हिडकडून आलेला सर्वच्या सर्व वृत्तांत ज्युलियस रोजनबर्गने एथेलकडून टाईप करून घेतला. रूथ आणि ज्युलियसने त्यातील चुका दुरुस्त केल्या. रोजनबर्गने ग्रीन ग्लासला आपण एमरसन रेडिओमध्ये काम करीत असताना प्रॉक्सिमिटी फ्यूज चोरल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे आपण अण्विक शक्तिवर कार्य करू शकणाऱ्या विमानांच्या बाबतीत व अंतरिक्ष प्रयोगशाळांचीही माहिती गुप्तरीत्या हस्तगत केल्याचे त्याने सांगितले.

त्यानंतर ५ फेब्रुवारी, १९५० मध्ये डॉ. फुशला अटक झाल्याची बातमी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली. लगेच ज्युलियस रोजनबर्ग ग्रीनग्लासला भेटण्यासाठी त्याच्या निवासस्थानी आला. लगेच ते दोघे फिरण्यासाठी बाहेर पडले. फिरत फिरत ते हेमिल्टन फिश पार्कजवळ आले आणि तिथेच एकान्तात डॉ. फुशच्या अटकेची वार्ता रोजनबर्गने त्याच्या कानावर घातली.

"अल्बुकर्कमध्ये आपणाला गोल्ड नामक व्यक्ती भेटलेली आठवत असेलच. त्याचा डॉ. फुशबरोबर संबंध होता. डॉ. फुशनंतर आता त्याची पाळी आहे. कदाचित् त्यानंतर आपल्यालाही अटक होईल. तेव्हा आपण अमेरिका सोडून गेलात तर बरे होईल !"

रोजनबर्गच्या अंदाजानुसार डॉ. फुशनंतर गोल्डचाच नंबर लागला. त्यावेळी रोजनबर्गने मेक्सिको, स्वीडन, किंवा स्वित्झर्लंडहून झेकोस्लोव्हाकियामार्गे रशियाला पळून जाण्याचा डेव्हिडग्रीनग्लासला सल्ला दिला व त्या सल्ल्याबरोबरच त्याने डेव्हिड ग्रीनग्लासला प्रवास खर्चासाठी पाचहजार डॉलरपण दिले. पण तरी देखील डेव्हिड ग्रीनग्लासने अमेरिका सोडली नाही. तो तिथेच राहिला.

आणि एफ. बी. आय. च्या तडाख्यात तोही लवकरच सापडला. त्यानंतर ज्युलियस रोजनबर्ग, एथेल रोजनबर्ग, मोर्टन सोबेल या सर्वांना अटक करण्यात आले. आणि फेडरल एस्पायनेज अॅक्ट १९१७ च्या अंतर्गत रशियासाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली त्या सर्वांवर खटला भरण्यात आला. डेव्हिड ग्रीनग्लासने आपला गुन्हा कबूल केला. मात्र रोजनबर्ग पति-पत्नीने सांगितले की, आम्ही निर्दोष आहोत. या प्रकरणाशी आमचा काडीमात्र संबंध नाही.

ज्युलियस व एथेल रोजनबर्ग, मोर्टन सोबेल आणि डेव्हिड ग्रीन ग्लासवर भरण्यात आलेल्या खटल्याचे कामकाज ६ मार्च, १९५१ पासून न्यूयार्कमध्ये सुरू झाले. ट्राइलजज रॉबर्ट काकमान हे न्यायमूर्ती म्हणून काम पहात होते. ज्युरीने रोजनबर्ग व सोबेलवर एस्पायनेज स्टेट्यूटच्या अंतर्गत त्याचं उल्लंघन केल्याचा आरोप ठेवला. या प्रकरणात गुन्हेगाराला तीस वर्षे सक्तमजुरी किंवा फाशी देण्याची तरतूद आहे.

सर्वत्र या खटल्याने एकच खळबळ माजविली. खटला ऐकण्यासाठी कोर्टात मुंगीसारखी माणसं येऊ लागली. ज्युरीने रोजन-

बर्ग पति-पत्नी व सोबेलला एस्पायनेज नियमानुसार दोषी ठरविले. ५ एप्रीलला दोन्ही बाजूच्या वकिलांनी आपली बाजू मांडल्यावर लोक काळा गाऊन धारण केलेल्या न्यायमूर्तीकडे टक लावून पाहू लागले. न्यायमूर्ती ज्युलियस रोजनबर्गकडे वळून म्हणाले,

'ज्युलियस रोजनबर्ग, आपल्याला काही सांगावयाचं आहे काय ?'

'नाही सर !'

नंतर न्यायमूर्ती एथेलकडे पहात म्हणाले,

'एथेल रोजनबर्ग, आपल्याला काही सांगावयाचं आहे काय ?'

'नाही सर !'

नंतर आपला निकाल न्यायमूर्ती काफमन वाचू लागले. त्यांचा आवाज स्पष्ट व खणखणीत होता.

'हेरगिरी हे अत्यन्त घाणेरडे आणि हलकट असे काम आहे. आपल्या देशाबरोबर देशद्रोह करणाऱ्या व्यक्तीला मृत्युपेक्षाही कठोर शिक्षा मिळायला हवी. या प्रकरणात तुम्ही रशियाला अणुबाँबचे गुपित पुरवून जणु कोरियावर कम्युनिस्ट हल्लाच घडवून आणला आहे. तुमच्या देशद्रोही कृत्याचे परिणाम लाखो नागरिकांना भोगावे लागतील अशा देशद्रोही कृत्याने तुम्ही सारा इतिहासच बदलून टाकला आहे.

मी अनेक दिवस व रात्री या प्रकरणाचे कागदपत्र पहाण्यात घालविल्या आहेत. ते कागदपत्र पहात असतानाच मानवतावादी दृष्टिकोणातून तुमचे प्राण वाचविता येतील का यावरही विचार केला. पण ज्या अमेरिकन जनतेने माझ्यावर विश्वास टाकला आहे त्याचे पालन व न्याय हे मी आपले आद्य कर्तव्य समजतो आणि म्हणूनच आपल्यावर दया करणे हे मी मानवतेच्या विरुद्ध समजतो. आणि म्हणूनच ज्युलियस रोजनबर्गला मी फाशीची शिक्षा ठोठावीत असून सोबेलला ३० वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा देत आहे. ग्रीनग्लासला १५ वर्षांची कारावासाची शिक्षा देत आहे.

रोजनबर्ग पती-पत्नीला सिंग सिंग कारागृहात इलेक्ट्रिक चेअरवर बसविण्याअगोदर अमेरिकेच्या डिस्ट्रिक्ट कोर्टात त्यावर निरनिराळ्या कायद्यांच्या दृष्टिकोनातून सोळा वेळा विचारविनिमय करण्यात आला. युनायटेड स्टेट्सच्या अपिल सर्किटमध्ये त्यांना वाचविण्यासाठी सात अपिले सादर करण्यात आली. अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टात सात पिटिशन रिव्हयु दाखल करण्यात आले. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाकडे त्यांच्यावर दया करण्यासाठी दोन दयेचे अर्ज पाठविण्यात आले. परंतु शेवटपर्यंत काफमनचा निकाल कायम राहिला.

१९५१ च्या ऑक्टोबरमध्ये प्रोग्रेसिव्ह पार्टीच्या 'नॅशनल गार्जियन'ने रोजनबर्गच्या संदर्भात लेखमाला सुरू केली. त्या साप्ताहिकाचं असं म्हणणं होतं की, रोजनबर्ग पतीपत्नी राजकीय डावपेचाचे बळी आहेत.

त्याचं हे मत म्हणजे अमेरिकेच्या एफ. बी. आय. ला उघड उघड आव्हानच होते. नंतर कम्युनिस्ट पक्षाने रोजनबर्ग दांपत्याला वाचविण्यासाठी एक मोहीमच उघडली. त्यामुळे त्या आंदोलनाला चांगलाच जोर चढला. त्यांच्या प्रथम बैठकीत ३ जानेवारी १९५२ मध्ये ज्युरीमध्ये एकही ज्यू नव्हता. त्यामुळे धार्मिक वैमनस्यामुळे त्यांना दोषी ठरविण्यात आले असा निर्णय घेण्यात आला.

पण वस्तुस्थिती तशी नव्हती. खुद्द न्यायमूर्ती काफमन व दोन वकील ज्यू होते. जुलै, १९५२ मध्ये कमेंट्रीला रिपोर्ट देण्यात आला. त्यावेळी पॅनलच्या १५६ नावात १५ ज्यूंचा समावेश होता.

कम्युनिस्ट मुखपत्र 'डेली वर्कर'नेही रोजनबर्ग दांपत्याचीच तळी उचलून धरली.

'रोजनबर्ग दांपत्याला वाचवा' या आंदोलनाने चांगलाच जोर पकडला. त्यांना वाचविण्यासाठी त्यांच्या दोन मुलांचा ढालीसारखा उपयोग करण्यात आला. परंतु त्या सर्वांना न्यायमूर्ती काफमन पुरून उरले व आपल्या निकालापासून तसूभर ढळले नाहीत.

राष्ट्रपती आयसेनहावरने दयेचा अर्ज फेटाळून लावला.

आणि शेवटी १९ जून १९५३ चा दिवस उगवला. सकाळी आठ वाजून पाच मिनिटांनी सिंग सिंग या कारागृहात इलेक्ट्रिक चेअरवर प्रथम ज्युलियस रोजनबर्गला बसवून देहान्ताची शिक्षा देण्यात आली. आणि त्यानंतर दहा मिनिटांनी एथेल रोजनबर्गला त्याचमार्गाने जाऊन आपली इहलोकची यात्रा संपवावी लागली.

## माझ्या आठवणी पृष्ठ २० वरून

नाटचमन्वंतरचा प्रश्न तसाच शिल्लक राहिला. कंपनी आता यापुढं चालवता येणं शक्य नाही, ती आता बंद केलीच पाहिजे, असे विचार माझ्या मनात येतात न येतात तोच लीला सागर कंपनीतून घरी आली. तिला पाहिल्यावर माझ्या मनात एक विचार आला. मी तो तिला बोलूनही दाखविला. मी तिला म्हटलं, 'आज नाटचमन्वंतर बंद होण्याची वेळ आली आहे आणि ती बंद केल्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु तू जर पुण्याला येऊन 'उसना नवरा'मध्ये मालतीचं काम केलंस तर नाटचमन्वंतरचा निभाव लागेल. परंतु लक्षात ठेव, तुला सागर कंपनीतून काहीतरी नियमित पैसे मिळतात तेही कदचित तुला मिळणार नाहीत आणि आपल्या संसारात खूप ओढाताण होईल.' लीलाला नाटचमन्वंतरची सर्व हकीगत मी अगोदरच सांगितली होती. तेव्हा ती लगेच हसून म्हणाली, 'बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर हे एक नवीन धाडस करायला मिळेल. नाही पैसे मिळाले तर नाही. त्याचा विचार आपण पुढे करू. आपण कसंतरी निभावून घेऊ.' लीलानं असं म्हटल्यावर मग काय, दुसऱ्याच दिवशी आम्ही आमच्या तीन मुलांना घेऊन पुण्याला गेलो. मालतीच्या मैत्रिणीची भूमिका करायला कृष्णाबाई पुराणिक तिथं होत्याच, अरविंदाची भूमिका करायला वसंत ठेंगडी तयार होताच. कंपनीच्या बिऱ्हाडी जाऊन पोचल्यावर–आम्ही त्यावेळी कंपनीला राहाण्यासाठी एक स्वतंत्र घर घेतलं होतं–मी दाते यांना तावडतोब बोलावणं पाठवलं.

ते आमच्या शेजारीच राहात होते. ते आल्यानंतर मी त्यांना सांगितलं की 'आजपासून बरोबर आठ दिवसांनी म्हणजे मंगळवारी रात्री 'उसना नवरा'चा प्रयोग झाला पाहिजे. तुम्ही उद्यापासून

नाटकाच्या तालमी घ्या.' यावर दाते मोठ्यानं हसले आणि मला म्हणाले, 'सांगता आहात काय तुम्ही? नाटकाच्या तालमी घेऊन करायचं आहे काय? आता मालतीची भूमिका कोण करणार?' मी त्यांना सांगितलं, 'मालतीची भूमिका लीला करणार आहे आणि अरविंदाची भूमिका वसंत करील.' यावर दाते काही बोलले नाहीत आणि थोड्या वेळानं ते निघून गेले. मात्र दुसऱ्या दिवसापासून त्यांनी 'उसना नवरा'च्या तालमी घ्यायला सुरुवात केली. तालीम घेत असता मध्येच आठवल्यासारखं करून ते मला म्हणाले, 'मी तालमी घेतो आहे खरा, पण सगळंच मुसळ केरात. केतकीची भूमिका कोण करणार?' त्यांचा प्रश्न ऐकून मी एकदम गार झालो. माझ्यासमोरच रेखा काहीतरी करीत बसली होती. मी तर त्यावेळी अगदी डेस्परेट झालो होतो. मी दात्यांना म्हटलं, 'चिमुरड्या केतकीसाठी का खेळ थांबवायचा? ते काही नाही, त्या कामासाठी तुम्ही रेखाला तयार करा.' माझे शब्द ऐकून रेखा तर बावरूनच गेली आणि दाते हसायला लागले. रेखा मला म्हणाली, 'डॉक्टर, हे तुम्ही चालवलं आहे तरी काय? मी कसं काम करणार या नाटकात? शिवाय काणेकरही इथं नाहीत. त्यांना विचारायला नको का?' मी तिला म्हटलं, 'तू अगोदर काम करायला लाग. काणेकरांना काय विचारायचं ते मी मागाहून विचारीन.' तेव्हा ती मुकाट्यानं उठली. तिचं या नाटकात फार मोठंसं काम नव्हतं, पण होतं ते मात्र तिनं चोख बजावलं. या नाटकातील लीला, रेखा आणि वसंत यांच्याशिवाय बाकीच्यांची कामं चांगली बसलेली असल्यामुळे दात्यांनी पुढे सहासात दिवस फक्त तिघांना शिकवण्यातच घालवले. मंगळवारी 'उसना नवरा'चा प्रयोग होणार आणि त्यामध्ये लीला चिटणीस, रेखा काणेकर या दोन नव्या नटी कामं करणार असं अगोदरच जाहीर करून आम्ही बसलो होतो. या नाटकाचे बरेच प्रयोग यशस्वी झाले आणि त्या नाटकानंच नाट्यमन्वंतरला सावरलं असं मला म्हणायला दिक्कत वाटत नाही.

'उसना नवरा'चे प्रयोग चालू असतानाच श्री. रंगूमामा जोगळेकर यांनी अनुवादीत केलेलं 'जाहिरातीच्या जोरावर' हे नाटक हाती घेतलं. त्या नाटकाच्या तालमी दात्यांनी नियमानं घेण्यास सुरुवात केली. या नाटकात प्रथम काणेकर आणि रेखा यांना त्यातील मुख्य भूमिका देण्याचं ठरवलं होतं, परंतु दोघांनाही त्या करता येणार नाहीत असं दाते म्हणाल्यावरून दात्यांनी आणि लीलानं त्या भूमिका कराव्यात असं आम्ही ठरवलं. परंतु या नाटकाच्या तालमी पुऱ्या होण्याच्या अगोदरच 'उसना नवरा'ची लोकप्रियता संपुष्टात आली. पुण्याचे लोक रसिक आहेत खरे, पण त्यांनी तरी एकच नाटक किती दिवस पाहायचं! आणि दुसरी नाटकं एकदम करणं आम्हाला शक्य नव्हतं. तेव्हा काणेकर आणि मी मिळून असं ठरवलं की कंपनी घेऊन मुंबईला जायचं आणि तिथं 'उसना नवरा'चे प्रयोग होत असतानाच 'जाहिरातीच्या जोरावर' नाटकाच्या तालमी पुऱ्या करायच्या. त्याप्रमाणे आम्ही कंपनी घेऊन मुंबईला आलो. रॉयल ऑपेरामध्ये 'उसना नवरा'चे प्रयोग सुरू केले. पहिल्याच खेळाला श्री. वर्तक सहकुटुंब आले होते ते तर बेहद्द खूष झाले आणि लीलाच्या अभिनयनैपुण्याची व तिच्या 'पाणीदार डोळ्यां'ची त्यांनी इतकी बेफाट स्तुती केली, की ते ऐकून मलाच लाज वाटू लागली नि हसूही आलं. हसू येण्याचं कारण इतकंच की 'लपंडाव' नाटकात दोन सुशिक्षित मुलींच्या भूमिका त्यांनी ज्योत्स्नाबाई आणि पद्मावती वर्तक यांच्यासाठी राखून ठेवल्या होत्या आणि एका अशिक्षित आणि जुनाट वळणाच्या मुलीची भूमिका करायला त्यांना दुसरी कुणी स्त्री मिळेना म्हणून लीलाला ती देऊ केली होती. अर्थात त्यावेळी तिचं अभिनयनैपुण्य आणि तिचे 'पाणीदार डोळे' त्यांच्या कदाचित लक्षात आले नसतील. परंतु ती एक सुशिक्षित स्त्री असून सुधारलेल्या घरात वाढलेली आहे एवढी साधी गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही याचं मला आश्चर्य वाटलं. पण ते असो. या मागच्या गोष्टी मला या ठिकाणी उकरून काढायच्या नाहीत. 'उसना नवरा'चा पहिला प्रयोग झाल्या दिवसापासून वर्तकांना नाट्यमन्वंतराच्या भवितव्याविषयी पुन्हा उत्साह वाटू लागला. शिवाय काळेही त्यावेळी आमच्या कंपनीत नव्हते. वर्तकांचे नि माझे जे प्रथमपासून स्नेहाचे संबंध निर्माण झाले, त्यामध्ये कधीच बिघाड झाला नाही. अर्थात वर्तकांनी जेव्हा आमच्याशी सहकार्य करण्याचं कबूल केलं, तेव्हा मी त्यांचा आनंदानं स्वीकार केला.

गावदेवीतील जे. के. बिल्डिंगमध्ये आम्ही कंपनीसाठी मोठा ब्लॉक घेतला होता. त्याच ठिकाणी आम्ही नवीन नाटकाच्या तालमी सुरू केल्या होत्या. दाते 'उसना नवरा'तील काम करण्यासाठी ज्यावेळी पुण्याहून येत, त्यावेळी ते नवीन नाटकाच्या तालमी घेत. परंतु वर्तकांना हे पसंत पडलं नाही. ते मला म्हणाले, 'या तालमी बरोबर चालत नाहीत. दात्यांना वेळ मिळेल तेव्हाच ते या तालमी घेतात. पण या नाटकाच्या रोज सकाळ-संध्याकाळ तालमी झाल्या पाहिजेत. तरच हे नाटक चांगलं रंगेल. या नाटकातील खाचाखोचांचा मी संपूर्ण रीतीनं अभ्यास केला आहे. तेव्हा मला वाटतं, मीच या नाटकाच्या तालमी घेतो.' यावर मी काय बोलणार! त्यांचा दांडगा उत्साह पाहून मला मात्र बरं वाटलं. मी त्यांना लगेच, 'तुम्ही तालमी घ्या' म्हणून सांगितलं आणि दुसऱ्या दिवसापासून त्यांनी तालमी घण्यास खरोखरच सुरुवात केली. वर्तक या नवीन नाटकाच्या तालमी घेताहेत असं पाहून दात्यांनी आपलं अंग त्यातून हळूहळू काढून घेतलं. मात्र ते नाटकात काम करणार होते. पुण्याला असताना एकदा आणि मुंबईला दोनदा दात्यांचा आणि माझा बराच खटका उडाला होता. म्हणून दात्यांविषयी मी उदासीनच होतो. वर्तकांच्या उत्साहाला नवीन भरती आल्यामुळे त्यांनी आम्हा दोघांमध्ये समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला, परंतु दात्यांविषयी मी पूर्णपणे बेफिकिरीनं वागत असे.

मला वाटतं, वर्तकांनी सतत आठ दिवस या नाटकाच्या तालमी घेतल्या. नंतर एक दिवस सकाळी ते मला म्हणाले, 'मी या नाटकाच्या तालमी घेतोच आहे, पण माझ्या मनात एक नवीन कल्पना सुचली आहे. आपण 'आंधळ्यांची शाळा' पुन्हा एकदा करू या. अहो, त्या दिवशी मी लीलाताईंचं काम पाहिलं, त्याच वेळी त्यांच्यामध्ये पोटेन्शिॲलिटीज किती दांडग्या आहेत याची मला कल्पना झाली. तुम्हाला ती कल्पना व्हायची नाही. अहो, त्यांनी जर बिंबाचं काम केलं तर नाटकाला असा लिफ्ट मिळेल की काही विचारू नका. आपण नाटकांचं उद्घाटन करायला बॅरिस्टर जयकरना बोलावू, आहात कुठं!' मी त्यांना म्हटलं, 'मि. वर्तक,

'आंधळयांच्या शाळे 'चे प्रयोग मुंबईत खूप झाले आहेत. लीलानं जरी बिंबाचं काम केलं तरी तो खेळ कुणी पाहायला येणार नाही. मला नाटयमन्वंतरच्या मागच्या इतिहासाची पुनरावृत्ती इथं व्हायला नको आहे. म्हणून तुम्ही या नवीन नाटकाच्या तालमी सुरू ठेवा आणि तेच नाटक आपण लवकर रंगभूमीवर आणू.' पण वर्तक कसले ऐकतात ! त्यांची चिकाटी दांडगी. ते मला म्हणाले, 'तुम्हाला कसली भीती वाटते ? पैशाची ना. या माझ्या नाटकामुळे जर कंपनीला तूट पडली तर माझ्या घरातील सर्व पैसे आणून कंपनीत ओतीन.' पैशाच्या बाबतीत वर्तक म्हटल्याप्रमाणे करायला चुकायचे नाहीत याची मला खात्री होती. म्हणूनच मी त्यांच्या म्हणण्याला होकार दिला. झालं. 'आंधळयांच्या शाळे 'च्या तालमी पुन्हा सुरू झाल्या आणि तो खेळ पुन्हा एकदा रंगभूमीवर आला. पहिल्या खेळाला जवळ जवळ सात-आठशे रुपये उत्पन्न झालं आणि दुसऱ्या खेळाला उत्पन्न जवळ जवळ शून्यापर्यंत गेलं. लीलानं बिंबाची भूमिका उत्कृष्ट वठवली होती. कारण पहिला प्रयोग होण्यापूर्वी घरी रात्री बारा बारा वाजेपर्यंत ती त्या भूमिकेची तालीम करीत असे.

'आंधळयांची शाळा' दुसऱ्याच खेळाला बसली. 'जाहिरातीच्या जोरावर' नाटकाच्या तालमी पुऱ्या झाल्या नव्हत्या आणि 'उसना नवरा 'चा सीझन संपुष्टात आला होता. अशा वेळी कंपनी मुंबईला ठेवणं शक्य नव्हतं. म्हणून मी मुंबईतील मुक्काम हलवून कंपनी कल्याणला नेली. कल्याणला एका गृहस्थानं चार खेळांचं कॉन्ट्रॅक्ट घेतलं होतं. कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर कल्याणला एक दोन खेळ आम्ही केले. कल्याणहून आम्ही नाशिकला गेलो. नाशिकला साधारण बऱ्यापैकी उत्पन्न झालं आणि कंपनीचं डगमगणारं तारू थोडंसं स्थिरावलं. यावेळी शांताराम श्रृंगारपुरे हा धुळयाला होता. त्यानं तिथं कसला तरी धंदा सुरू केला होता. त्यानं आमच्या खेळाचं कॉन्ट्रॅक्ट घेतलं आणि आम्हाला धुळयाला बोलावलं. धुळयाला खेळाचं कॉन्ट्रॅक्ट दिल्यामुळे उत्पन्नाची आम्हाला काळजी नव्हती आणि कंपनीचं गाडं सुरळीत चाललं होतं. या वेळी वर्तक आणि मिसेस वर्तक आमच्याबरोबर होती. मला या ठिकाणी नमूद करून ठेवलं पाहिजे की मुंबईत जरी वर्तकांच्या हेकेखोरपणामुळे कंपनी खड्डयात पडण्याच्या बेतात आली होती तरी ज्या ज्या वेळी कंपनी अडचणीत येई त्या त्या वेळी सढळ हातानं कंपनीला वर्तकांनी मदत केली होती. इतकंच नव्हे, तर सौ. वर्तकांना खेळामध्ये काम करण्यासाठी ते न चुकता पाठवून देत असत. आता आम्ही धुळयाला आलो होतो. कंपनीची सांपत्तिक स्थिती सुधारण्याच्या बेतात होती. धुळयाला खेळ चालू असताच वर्तकांनी एक नवीन शक्कल शोधून काढली. ते मला म्हणाले, 'आपण इथून नागपूरला जाऊ या. नागपूरला कंपनीला चिक्कार पैसा मिळेल. 'लंपडाव' हा खेळ मुंबईला फेल गेला ना ? अहो नागपुरात या खेळाला लोक डोक्यावर घेऊन नाचतील. पण ते राहू द्या. आपण आता थोडा बिझनेस बघू. तुम्ही आणि लीलाताईंनी नाटयमन्वंतरसाठी इतके कष्ट केलेत, परंतु तुम्ही पैशासंबंधानं कधी बोलणंच काढलं नाहीत. आता तुम्ही असं करा, की प्रत्येक महिन्याला तुम्ही आणि लीलाताईंना म्हणून दीडशे रुपये घेत चला आणि गोदूला आपण महिन्याला शंभर रुपये देऊ.'

मला खरोखर वर्तकांच्या बोलण्याची चीड आली. आम्ही दोघांनी आपल्या संसाराचा विचार न करता केवळ नाटयमन्वंतर जिवंत राहावं म्हणून जी झीज सोसली, ती काय नाटयमन्वंतरमधून पैसे काढून घेण्यासाठी ? मला पुण्यातील एकच प्रसंग यावेळी आठवतो. 'उसना नवरा 'मध्ये काम करण्यासाठी लीला पुण्याला आली. आमची तिन्ही मुलं तिनं स्वयंपाकीबाईजवळ ठेवली होती. त्या दिवशी अजीतला सडकून ताप भरला होता. तरी त्याला सोडून लीला पुण्याला आली. आल्यानंतर ती प्रथम काहीच बोलली नाही. खेळ संपल्यानंतर ती मला म्हणाली, 'मला रात्रीच्या गाडीनं मुंबईला गेले पाहिजे. अंजूला खूप ताप भरला आहे.' डॉक्टरला आणण्यासाठी माझ्याजवळ पैसे नव्हते. त्यावेळी मी काही न बोलता मॅनेजरला बोलावलं आणि त्याला विचारलं, 'तुमच्याकडे किती पैसे शिल्लक आहेत ?' ते म्हणाले, 'असतील ४०–४५ रुपये.' मी त्यांना म्हटलं, 'आणा ते पैसे माझ्याकडे.' ते पैसे मी घेतले नि लीलाला घेऊन स्टेशनवर गेलो. तिचं तिकीट काढून मी तिला बायकांच्या थर्ड क्लासच्या जागेत बसवली. माझ्याजवळ असलेले पैसे मी तिच्या बॅगेत घातले. आतापर्यंत तिच्या येण्याजाण्याच्या खर्चाशिवाय मी तिला एक पैसुद्धा देऊ शकलो नव्हतो. नाटयमन्वंतर जगवण्याचं श्रेय खरोखर तिला होतं. नाटयमन्वंतर जगण्यासाठी आम्ही कशा प्रकारचे दिवस काढले हे सांगण्यासाठीच मी हा प्रसंग या ठिकाणी सांगितला.

आम्ही दोघांना दीडशे रुपयेच का पण शंभर रुपये जरी मिळाले असते तरी त्यात आम्ही समाधान मानलं असतं. परंतु गोदूताईंना शंभर रुपये कशासाठी पाहिजेत ? आपली हौस भागवण्यासाठी तिच्या नवऱ्यानं नाटयमन्वंतर ही संस्था काढली आणि ती बुडवण्याचा प्रयत्न केला म्हणून ? मी नसतो तर ती बुडालीही असती. हे मी अहंपणाने सांगत नाही. वस्तुस्थितीचं दर्शन महाराष्ट्राला व्हावं म्हणून मी हे सांगत आहे. वर्तकांना मी म्हणालो, 'हे पाहा मि. वर्तक, नाटयसंस्था चालवणं हा काही माझा धंदा नाही. मी नट नाही, नाटककार नाही किंवा नाटकं बसवणारा दिग्दर्शकही नाही. केवळ पुरोगामी स्वरूपाची नाटकं महाराष्ट्र रंगभूमीवर यावीत आणि हिंदुस्थानातच नव्हे, तर हिंदुस्थानच्या बाहेरसुद्धा मराठी रंगभूमी गाजावी या एकाच हेतूनं प्रेरित होऊन मी या सर्व भानगडीत पडलो. आज नाटयमन्वंतरला चांगले दिवस आले आहेत. तेव्हा तिला आज माझी गरज नाही. ही नाटयसंस्था मूळची तुमची आहे म्हणून मी ती आता पुन्हा तुमच्या स्वाधीन करतो. मी मुंबईला गेल्यानंतर पुन्हा माझा वृत्तपत्रव्यवसाय हातात घेणार आहे. लीला तुमच्याशी पूर्ण सहकार करील. मात्र तुम्ही तिला न चुकता प्रत्येक महिन्याला दीडशे रुपये दिले पाहिजेत. कारण मला काही काळपर्यंत पैसे मिळवता येतील की नाही याची शंका आहे. मग तुम्ही गोदूताईंना शंभर द्या, दोनशे द्या, तरी चालेल. आता यापुढे तुमच्या नाटयमन्वंतरसाठी मी माझ्या संसाराची राखरांगोळी करणार नाही.' हे माझे शब्द ऐकल्यावर वर्तकांनी मी नाटयमन्वंतर सोडून जाऊ नये म्हणून बराच प्रयत्न केला. परंतु माझा निश्चय कायम झाला.

नागपूरला जाण्यास थोडा अवधी होता म्हणून लीलाला घेऊन मी परत मुंबईला आलो. लीलानं सर्व मुलांना घेऊन नागपूरला जायचं ठरवलं आणि तिचा तिथं जम बसेपर्यंत मीसुद्धा नागपूरला यावं असं ती म्हणाली.

नागपूरला गेल्यानंतर आम्ही वॉकर रोडवर स्वतंत्र ब्लॉक भाड्यानं घेतला. त्या ठिकाणी वसंत ठेंगडी, राजा परांजपे वगैरे मंडळीही राहायला आली. बाकीच्या मंडळींसाठी वर्तकांनी काय व्यवस्था केली ते मला माहीत नाही, परंतु कंपनीतील सर्व माणसं माझ्याकडे येऊन एक ना दोन, गाऱ्हाणी सांगू लागली. वर्तकांच्या आणि माझ्यामध्ये वितुष्ट वाढू लागलं आणि श्री. वर्तक गावात काही मंडळींना सांगत फिरू लागले की मी कंपनीचा हिशेब बरोबर ठेवला नाही, कंपनीचे दोनएक हजार रुपये मी खाल्ले. ही गोष्ट मला ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याकडून कळली. तेव्हा मी वर्तकांना लगेच त्याचा जाब विचारला. वर्तकांनी स्पष्ट नाकबूल केलं. पण ते म्हणाले, की 'कंपनीच्या एकवीसशे रुपयांचा हिशेब तुम्ही अजून का दिला नाही ? तुम्ही हा हिशेब दिला नाही एवढीच गोष्ट मी काही लोकांजवळ बोललो.' मी त्यांना म्हटलं, 'मि. वर्तक, तुम्ही काय काय गोष्टी बोललात हे मला माहीत आहे. पोलीसांकडनं तुम्ही मला अटक करणार आहात कंपनीच्या हिशेबाची अफरातफर केल्याबद्दल. हेही तुम्ही काही लोकांजवळ बोललात तेही मला कळलं आहे. परंतु तुम्हाला निरर्थक गप्पा मारण्याची सवय आहे हे ओळखून मी त्यासंबंधानं काही बोलत नाही. तुम्हाला हिशेब पाहिजे असतील, तर बोर्ड ऑफ डायरेक्टरांची सभा बोलवा, बोर्डापुढे मी माझे हिशेब मांडायला तयार आहे. मी अजूनही कंपनीचा डायरेक्टर आहे हे विसरू नका.'

त्यावेळी डायरेक्टरपैकी काणेकरच तिथं हजर नव्हते. दाते, वर्तक आणि मी नागपुरातच होतो. तेव्हा काणेकरांना तातडीची तार करून बोलावण्यात आलं. काणेकर नागपुरात आल्याबरोबर लगेच ते माझ्याकडे आले. ते म्हणाले, 'बोर्डाची सभा कशाला बोलावली आहे ? ही काय नवीन भानगड उपस्थित झालीय ?' मी त्यांना म्हटलं, 'भानगड वगैरे काही नाही. वर्तकांच्या चावटपणाचा हा एक नमुना आहे.' त्यानंतर बोर्डाची मिटिंग भरली. मी माझा हिशेब व्यवस्थित रीतीनं सादर केला. त्या हिशेबामध्ये—मला कधी हिशेब ठेवण्याची सवय नव्हती—माझा आधार काय तो चेकबूक. माझ्या चेकबुकाच्या सर्व कौंटरफाईल सापडल्या. त्यामध्ये १।२ कौंटरफाईल सापडल्या नाहीत, त्यामुळे दीडशे किंवा दोनशे रुपयांचा हिशेब मला सांगता आला नाही. तेव्हा वर्तक उदारपणाचा आव आणून म्हणाले, 'जाऊ द्या. कौंटरफाईल नाही सापडल्या तर नाही. फक्त दीडदोनशे रुपयांचाच प्रश्न आहे ना ? आपण ते राइट ऑफ करू म्हणजे झालं.' मी त्यांना लगेच म्हटलं, 'मि. वर्तक, हे चालायचं नाही. ही रक्कम कशी खर्च झाली ते मला सांगता येत नाही हे खरं आहे. पुढे मागे त्याचा हिशेब लागेलच. परंतु हिशेब बरोबर झाला पाहिजे. म्हणून आजपर्यंत मी नाट्यमन्वंतरमध्ये जे काम केलं, त्याचं वेतन म्हणून ही रक्कम तुम्ही जमा करा.

हिशेबाचं काम आटपल्यानंतर मी नाट्यमन्वंतरच्या डायरेक्टरच्या जागेचा राजीनामा दिला आणि वर्तकांना सांगितलं, 'यापुढे आपले संबंध धंदेवाईक स्वरूपाचे राहतील. आता बोला, तुम्ही लीलाला महिन्याला दीडशे रुपये देणार आहात की नाही ? देणार असाल तर त्याप्रमाणे तुम्ही लिहून द्या. नाहीतर लीलाला घेऊन मी परत मुंबईला जातो'. यावर वर्तक आरडाओरड करू लागले. ते मला म्हणाले, 'लीलाताईंची बंदूक तुम्ही माझ्या डोक्यावर धरली आहे.' मी त्यांना ताबडतोब उत्तर दिलं, 'लीलाताईंचीच काय, पण कुठलीही बंदूक तुमच्या डोक्यावर धरण्याइतकी तुमची लायकी आहे असं मला वाटत नाही.' यानंतर वर्तक बरेच नरमले. ते मला म्हणाले, 'हे पाहा, आजच माझी धाकटी मुलगी पहिल्या मजल्यावरून खाली पडली. तिला दुखापत झाली. म्हणून मी कुठल्या मनस्थितीत आहे ते तुम्ही पाहा.' हे त्यांचे शब्द ऐकल्यावर माझा राग कुठल्या कुठं पळाला. मी त्यांचा हात आपल्या हातात घेऊन म्हटलं, 'तुम्ही यासंबंधी जास्त काही बोलू नका. तुमचं आमचं भांडण इथं संपलं.' इतकं बोलून मी घरीं आलो.

दुसरे दिवशी सकाळी दाते माझ्याकडे आले व मला म्हणाले, 'तुमचा आता नाट्यमन्वंतरशी काही संबंध राहिला नाही. तुम्ही आता मुंबईला जाणार. पण लीलाताईच्याबद्दल काय करायचं ?' लीला तिथं होतीच. पण ती काही बोलली नाही. मी दात्यांना म्हटलं, 'लीलानं नाट्यमन्वंतरमध्ये काम करावं अशी जर तुमची इच्छा असेल, तर माझ्या दोन अटी तुम्हाला पाळाव्या लागतील. पहिली अट लीलाबद्दलची आहे. ती मुलाबाळांना घेऊन इथं राहाणार आणि आज आमच्याजवळ पैसासुद्धा शिल्लक नाही. मी रिकामा आहे हे तुम्हाला माहीत आहे. तेव्हा आतापर्यंत जो तिचा थकलेला पगार आहे, तो तिला मिळावा अशी व्यवस्था करा आणि यापुढे दर महिन्याला तिला नियमित पगार मिळाला पाहिजे.' दाते म्हणाले, 'लीलाताईंचे सगळे मागचे पैसे आम्हाला एकदम देता येणार नाहीत. ते आम्ही हप्त्याहप्त्यानं देऊ. यापुढील पगार मात्र त्यांना नियमानं देऊ. मागील पगारातील हप्ता आणि सध्याचा त्यांचा पगार असे मिळून दर आठवड्याला ५० रु. त्यांना आम्ही देऊ. तुम्हाला कबूल आहे का हे ?' मी म्हटलं, 'कबूल नसायला काय झालं ? लीला नागपुरात असतांना तिला निदान पैशाची तरी अडचण भासू नये एवढीच माझी इच्छा आहे,' दाते म्हणाले, 'बरं तर. तुमची दुसरी अट कोणती ?' मी म्हणालो, 'माझी दुसरी अट हीच की वर्तकासारख्या माणसाला नाट्यमन्वंतरसारखी संस्था चालवता येणे शक्य नाही. त्यांच्या आडमुठ्या कारभारामुळे नाट्यमन्वंतरमधील सर्व मंडळी त्यांच्यावर नाखुश आहेत. नाट्यमन्वंतरच्या अगदी वाईट दिवसामध्ये, की ज्यावेळी पगारच काय पण आम्हाला पोटापुरतं खायला मिळण्याची पंचाईत पडली, त्यावेळी, मन्वंतरमधल्या एकाही माणसानं हूं की चू न करता आपापली कामं आनंदानं केली. आज मन्वंतरला चांगला पैसा मिळतो आहे, असं असतांना सर्व मंडळी नाराज, याला वर्तक जबाबदार आहेत. म्हणून तुम्ही जर मन घालून नाट्यमन्वंतरची व्यवस्था पाहाण्यास कबूल असाल तरच त्या संस्थेमध्ये लीलाला राहाता येईल.' दात्यांना ही जबाबदारी घ्यायला नको होती. त्यांना पूर्वीप्रमाणेच अंगचोरपणा करायला पाहिजे होता. परंतु मी घातलेल्या अटीमुळे त्यांचा नाइलाज झाला. त्यांनी ती अट स्वीकारली. स्वीकारली म्हणजे काय, माझं समाधान करण्यासाठी ते म्हणाले, 'मी सर्व जबाबदारी माझ्या शिरावर घेतो.' परंतु त्यांच्या पाठीमागे वर्तकच उभे होते. तरीसुद्धा मी विशेष घासाघीस करीत बसलो नाही. ही सर्व व्यवस्था झाल्यावर मी मुंबईला परत आलो.

नागपुरात नाट्यमन्वंतरचे खेळ फारच यशस्वी झाले आणि नाट्यमन्वंतरला पैसाही खूप मिळाला. वर्तकांचा 'लपंडाव' कल्पनेबाहेर यशस्वी झाला. लीलानं तर आपल्या अभिनयनैपुण्यात कीर्तीचा उच्चांक गाठला होता.

यानंतरचा नाट्यमन्वंतरचा इतिहास थोडक्यात सांगता येण्यासारखा आहे. मला वाटतं, की लीला निघून आल्यानंतर ती कंपनी जळगावला गेली. जळगावहून नाशिकला गेली आणि नाशिकला त्या कंपनीची वाताहत झाली. कंपनी बसली आणि कंपनीतील नटांना आपापल्या घरी जाण्याइतकेसुद्धा पैसे मिळाले नाहीत. शेवटी सदू ठकार लीलाकडे गेला आणि तिला एका खेळात काम करण्यासाठी त्यानं विनंती केली. लीलानं ती तात्काळ कबूल केली. सदू ठकारनं कृष्णाबाई पुराणिकालासुद्धा फक्त एकाच प्रयोगात काम करण्याची विनंती केली. कृष्णाबाई ताबडतोब कबूल झाली. या दोघींना घेऊन सदू जेव्हा नाशिकला गेला तेव्हा त्यांना शेवटचा एक प्रयोग करता आला. या प्रयोगाचं जे उत्पन्न झालं, त्याच्या जोरावरच कंपनीतील मंडळींना आपापल्या घरी जाता आलं. परंतु कंपनीचं सामान मात्र नाशिकमध्येच पडून राहिलं. त्या सामानाचं काय झालं ते मला आतापर्यंत माहीत नाही.

मला केशवराव दाते काणेकरांच्या घरी भेटले. त्यांच्या घरून आम्ही दोघे बरोबर बाहेर पडलो. रस्त्यातून चालत असता दाते मला म्हणाले, 'हे पहा डॉक्टर, नाट्यमन्वंतर पुन्हा चालू करण्याला ही सुवर्णसंधी आहे. तुम्ही असं करा की, लीलाबाईंनी आणि तुम्ही नाट्यमन्वंतर आपल्या पुन्हा ताब्यात घ्या. पैसे काही फार लागणार नाहीत. फक्त आठशे रुपये जरूर आहेत आणि हे पैसे कंपनीत घालणं तुमच्या हातचा मळ आहे.' मी त्यांना म्हटलं, 'हे पाहा नाना, तुम्ही सांगता हे ठीक आहे. पण तुमच्या नाट्यमन्वंतरच्या भानगडीत पडण्याचा मूर्खपणा मी पुन्हा करणार नाही. तुमच्यासारख्या मंडळींना उत्तेजन देण्यासाठी आठशे रुपयेच काय, आठ रुपये सुद्धा खर्च करण्याची माझी तयारी नाही.'

नाट्यमन्वंतरचा हा खरा इतिहास आहे.

---

# परसूच्या पशुकथा

पृष्ठ १३ वरून

तेवढ्यात माणसांचा आरडाओरडा ऐकू आला आणि त्याबरोबर ती गाय तशीच टाकून राजाचा कळप पळून गेला. एका माणसाने चटकन् जाऊन मेलेल्या गाईच्या शरीरावर दोन-तीन ठिकाणी स्ट्रिचिनिन् विषाची बाटली ओतून ठेवली. कल्पना अशी की, ती गाय राजाच्या कळपाने स्वतः मारली असल्यामुळे ती खाण्यास कळप पुन्हा परत आल्याशिवाय राहणार नाही. अपेक्षेप्रमाणे रात्री तो कळप तेथे आला होता. दुसरे दिवशी सकाळी असे दिसून आले की, त्या लांडग्यांनी विष घातलेला मांसाचा भाग काळजीपूर्वक रीतीने तोडून बाजूला टाकून दिला होता!!

शेतकऱ्यांना व गुराख्यांना राजाची फार धास्ती वाटू लागली. राजाला मारण्यासाठी बक्षिसाची रक्कम १००० रुपयावर नेण्यात आली. वास्तविक, अनेक चांगल्या शिकाऱ्यांनी यापेक्षा कमी रकमेसाठीसुद्धा हे काम हाती घेतले असते. या बक्षिसाच्या मोहाने एका सुप्रसिद्ध व सरावलेल्या शिकाऱ्याने आपले शिकारीचे खास घोडे आणि लांडग्यांच्या शिकारीसाठी तयार केलेले कुत्रे घेऊन हिरण्य रानात प्रवेश केला. आतापर्यंत त्याच्या कुत्र्यांनी अनेक लांडगे मारले होते आणि म्हणूनच राजाचा फडशा पाडण्यास फारसा वेळ लागणार नाही अशी त्याची खात्री होती.

एके दिवशी सकाळी हा ताफा राजाच्या मागावर निघाला. थोड्याच वेळात कुत्र्यांनी राजाच्या कळपाचा माग काढला आणि पाठलाग सुरू केला. पण त्या कुत्र्यांपेक्षा राजाला त्या भागाची अधिक माहिती होती. कुत्र्यांच्या मागे घोड्यावरून शिकारी येत होता, याची चाहूल राजाला लागली असावी. त्याने चटकन आपला कळप आडवळणाने नेला आणि त्यामुळे साहजिकच घोडा तेथे अडखळला, कुत्री चुकली आणि शिकाऱ्याचा ताफा पांगला. कुत्र्यांची दमछाट होईपर्यंत राजाने त्यांना काट्याकुट्यातून पळविले आणि कुत्री दमली आहेत असे पाहूत राजाचा कळप त्यांच्यावर तुटून पडला. राजाने काही कुत्र्यांना फाडून टाकले आणि बाकीच्यांना जबर जखमी केले. संध्याकाळी लुळीपांगळी झालेली चार-पाच कुत्री रखडत, खुरडत, केंकाटत मालकाकडे परत आली आणि राजाचे सम्राटपद अबाधित राहिले. याच शिकाऱ्याने आणखी दोनदा राजाला मारण्याचा प्रयत्न केला, पण या दोन्ही वेळा पहिल्यासारखीच गत झाली; तेव्हा त्याने राजाचा व बक्षिसाचा नाद सोडून दिला. इतर दोन शिकाऱ्यांनीही राजाला विष चारण्याचा प्रयत्न केला. पण राजाने त्यांच्या प्रयत्नाकडे तुच्छतेने पाहण्यापलीकडे काहीही केले नाही. ¤

यानंतर माझी पाळी आली. माझ्या एका मित्राने हिरण्यात येऊन मी राजाला मारण्याचा प्रयत्न करावा अशी सूचना केल्यावरून मी या सम्राटाच्या प्रदेशात पाऊल टाकले. अर्थात मला त्या प्रदेशाची काही माहिती नव्हती. म्हणून प्रथम मी हिंडून माहिती करून घेतली. मला असे दिसून आले की, अशा प्रदेशात घोड्यांचा किंवा दुर्बिणीचा काहीही उपयोग होत नाही. राजाला मारावयाचे असेल, तर विष आणि पोलादी सापळे यांचाच चतुराईने उपयोग केला पाहिजे. पण त्यावेळी माझ्याजवळ सापळे नव्हते, तेव्हा विषाचाच प्रयोग करणे मला भाग पडले.

मी विषाचे जे निरनिराळे शेकडो प्रयोग केले त्याची तपशीलवार माहिती न सांगता एवढेच सांगतो की, स्ट्रिचिनिन्, आर्सेनिक्' सायनाइड् किंवा प्रसिक ॲसिड याचे वेगवेगळ्या रीतीने जितके म्हणून मिश्रण करता येणे शक्य होते तितके प्रकार मी केले. आमिष म्हणून सर्व प्रकारच्या जनावरांचे मांस मी हाताळले, पण दररोज सकाळी पहावे तो सारे श्रम फुकट गेलेले! माझ्यापेक्षाही राजा धूर्त ठरला!

एकाच उदाहरणावरून राजाचा धूर्तपणा दिसून येईल. लांडगे पकडण्याच्या कामात बरीच वर्षे घालविलेल्या एका मुरब्बी माणसाच्या

सूचनेनुसार एक वासरू मारले आणि त्याच्या किडनीच्या चरबीत चीज वितळविले. ते मिश्रण चिनी बशीत ओतून हाडाच्या सुरीने ते कापले. हाडाची सुरी एवढ्याकरताच वापरली की, त्या पदार्थाला कुठल्याही धातूचा वास येऊ नये. हे मिश्रण थंड झाल्यावर त्याचे गोळे केले. प्रत्येक गोळ्याच्या एका बाजूला भोक पाडून त्यात बरेचसे स्ट्रिचिनिन् व सायनाइड् घातले. ते सुद्धा तसेच ओतले. त्याचा अजिबात वास येऊ नये म्हणून मी फार काळजी घेतली. हे सर्व करीत असताना मी हातात कातड्याचे हातमोजे घातले होते. ते हातमोजेही मारलेल्या वासराच्या गरम रक्तात बुचकळून घेतले होते. इतकेच नव्हे, तर त्या गोळ्यावर माझा श्वासोच्छ्वास जाऊ नये अशीही खबरदारी घेतली होती. कोणत्याही प्रकारे माणसाचा वास त्याला लागू नये अशी मी काळजी घेतली होती. ही सर्व तयारी झाल्यावर ते गोळे कातड्याच्या पिशवीत भरले. अर्थात पिशवीही वासराच्या रक्ताने माखलेली होती. नंतर मी घोड्यावर बसलो आणि हातात मोठी दोरी घेतली. दोरीच्या दुसऱ्या टोकाला वासराचे यकृत व किडनी बांधली होती व हे दोन्ही अवयव माझ्या मागून फरफटत नेत मी जवळ जवळ १० मैलांचा फेरा मारला. पाव मैला-गणिक एक एक गोळा टाकीत मी पुढे गेलो.

सर्वसाधारणपणे आठवड्याचे पहिले दोन तीन दिवस राजाचा कळप या बाजूला फिरत असे. त्या दिवशी राजा येणार याची खात्रीच होती. संध्याकाळी मी घराकडे परतत असतांनाच दूरवर राजाची दमदार डरकाळी ऐकू आली.

दुसरे दिवशी सकाळी अत्यंत अधीरतेने मी बाहेर पडलो. पाव-लांच्या ठशाकरून राजाचा फिरण्याचा मार्ग दिसून आला. कारण सर्वसामान्य लांडग्याचा पंजा साडेचार इंच लांब असतो. लांडगा मोठा असेल तर तो फार तर पावणेपाच इंच असतो, पण राजाचा पंजा साडेपाच इंच लांब होता. त्याची उंची तीन फूट होती आणि वजन १५० पौंड होते. त्यामुळे त्याचा माग काढणे फारसे कठीण नव्हते. त्या मार्गाने मी निघालो. राजा पहिल्या गोळ्यापाशी आला होता आणि त्याने पहिला गोळा उचलून नेला होता. ते पाहिल्या-बरोबर माझा आनंद गगनात मावेना. आता थोड्याच अंतरावर राजाचे प्रेत सापडणार या कल्पनेने खूश होऊन मी पुढे निघालो. दुसराही गोळा नाहीसा झाला होता. तिसऱ्याचीही तीच गत झाली होती. माझा आनंदही त्या मानाने वाढत होता. चौथ्या गोळ्यापाशी मी आलो; माझा आनंद पार मावळला! राजाने तिन्ही गोळे गोळा करून त्या ठिकाणी आणून टाकले होते आणि त्यावर आपल्या पंजांनी माती ढकलली होती! माझ्या धूर्तपणाबद्दल तुच्छता दाख-विण्यचाच त्याचा उद्देश असावा!!

राजाच्या कळपाचा आणखी एक छंद होता. छंद म्हणण्याचे कारण असे की, त्यात केवळ करमणुकीचा भाग होता. एखादे वेळी लहर लागली की, हा कळप एखाद्या मेंढवाड्यात घुसत असे आणि मारता येतील तेवढ्या मेंढ्या मारीत असे. आणि त्याही केवळ गंमत म्हणून. मेंढ्या नेहमी कळपाकळपाने ठेवण्यात येतात. एकेका कळपात हजार-दोन हजार मेंढ्या असतात. पण मेंढ्यांचा सर्वात मोठा दुर्गुण म्हणजे थोडेसे जरी 'खुट' झाले तरी त्या जिवावर काहीतरी बेतले आहे असे समजून चेंगराचेंगरी करतात. आणि त्यांचा कमकुवतपणा म्हणजे पुढचे मेंढरू जिकडे जाईल तिकडे जायचे! हे लक्षात घेऊनच मेंढपाळ मेंढ्यांच्या कळपात दोन-तीन बोकड ठेवतात, कारण बोकड कळपात असले की, मेंढ्या त्यांची पाठ धरून राहतात. रात्री काही गडबड झाली तर लगेच बोकडाभोवती गोळा होतात. शिवाय, तशी वेळ आलीच तर बोकड मेंढ्याइतके घाबरून पळापळ करीत नाहीत. त्यामुळे मेंढ्यांचे संरक्षण करणे सोपे जाते. पण नेहमी असेच घडते असे नाही. एकदा लांडग्यांचा कळप मेंढवाड्याकडे आला, पण हा कळप दुसरा-तिसरा कुठलाही नसून राजाचा होता. लांडगे आले तरी बोकड धिम्मेपणाने मेंढ्यांच्या मधोमध उभे होते. त्यामुळे मेंढ्यांनीही काही गडबड केली नाही. पण बोकड हाच मेंढ्यांचा आधार आहे हे राजाने जाणले. त्याने प्रथम मेंढ्यांच्या वाटेला न जाता, सरळ त्यांच्या पाठीवरून उड्या मारीत बोकडांना गाठले. बोकडांचा निकाल लागल्यावर तो मेंढ्याकडे वळला आणि मग मेंढ्यांच्या कळपाची दुर्दशा विचारूच नका! राजाच्या कळपाने शेकडो मेंढ्यांचे मुडदे पाडले-आणि हे सर्व करमणुकीखातर!

शेवटी एकदाचे सापळे आले. दोन माणसांच्या मदतीने एक आठवडाभर खपून मी सर्व सापळे राजाच्या जाण्या-येण्याच्या सर्व मार्गावर लावून ठेवले. हे सापळे पोलादी होते. ते जमिनीत पुरून ठेवावे लागत असत. त्याला एक साखळी व साखळीला मोठा लाक-डाचा ओंडका बांधलेला असे आणि पोलादी चाप लावलेले असत. सापळा लावून ठेवल्यावर त्यावरून एका विशिष्ट जागेवर लांडग्याचा पाय पडला की, पोलादी चाप झटकन् मिटत असत आणि त्यात लांडगा सापडत असे. असे हे अनेक सापळे मी जमिनीत राजाच्या वाटेवर पुरून ठेवले.

दुसरे दिवशी सापळ्याची पाहणी करण्यासाठी निघालो. मला असे दिसून आले की, प्रत्येक सापळ्यापाशी राजा गेला होता. पण सापळ्याचा धोका त्याला स्पष्ट कळला असला पाहिजे. तो किंवा त्याच्या कळपातील एकही लांडगा एकाही सापळ्यात सापडला नव्हता. उलट राजाने त्या सापळ्याभोवतालची माती पायाने उकरून सर्व सापळे जाणाऱ्या येणाऱ्या लांडग्याला स्वच्छ दिसतील इतपत उघडे करून टाकले होते. त्याच्या पंजांच्या खुणावरून त्याच्या प्रत्येक हालचालीचा मला सुगावा लागला. जेथे जेथे त्याला संशय आला तेथे तेथे तो चटकन् बाजूला गेलेला होता. ही त्याची लकब पाहूनच मला दुसऱ्या तऱ्हेने सापळ्याची रचना करण्याची कल्पना सुचली. मी लगेच सापळ्याच्या दोन समांतर ओळी केल्या. त्यांच्यामध्ये अंतर सोडले आणि त्या ओळीच्या मधोमध एक आडवी ओळ लावली. कल्पना अशी की, तो त्या ओळीतून आत शिरला आणि त्याला संशय येऊन तो चटकन् बाजूला वळला तर बाजूच्या ओळीतील सापळा उडावा आणि अचानक राजा त्यात सापडावा पण येथेही मी हरलो! राजा त्या दोन ओळीतून अपेक्षेप्रमाणे आला. परंतु मधल्या आडव्या ओळीचा त्याला वास आला. त्याने नेहमीप्रमाणे बाजूला उडी मारली नाही, तर बरोबर न चुकता आल्यापावलीच तो मागे गेला. त्याने पुढे येताना जिथे पावले टाकली होती तिथेच नेमकी पावले टाकून तो तसाच मागे मागे गेला होता. त्याच्या बुद्धिमत्तेचे मी थक्क झालो!

तरीही मी चिकाटी सोडली नाही. पुन्हा एक नवी युक्ती काढली.

मी एक वासरू मारले. त्याचे शीर धडापासून वेगळे केले. ते जरा अंतरावर टाकले. जेथे धड पडले होते तेथे सहज दिसतील असे दोन सापळ लावून ठेवले आणि शीर पडलेल्या जागी मात्र दोन मोठे व बळकट असे सापळे मोठ्या दक्षतेने जमिनीखाली लपवून ठेवलेले होते. हे सर्व करताना मागच्या सारखेच माझे मोजे, बूट यावर वासराचे ताजे रक्त लावले होते. शिराजवळच्या जमिनीवरही मी ते रक्त शिंपडले. अशा रीतीने शिंपडले की, ते काय ह्या डोक्यातून बाहेर आले आहे, असा भास व्हावा.

लांडग्यांची एक सवय मी पाहून ठेवली होती. कसल्याही शवाचा त्याला वास आला की, तो कुतूहलाने त्या शवाजवळ गेल्याशिवाय राहायचा नाही. त्याला त्यातले काही खायचे नसले, तरी केवळ कुतूहल म्हणून तो शव हुंगून येणारच ! या त्यांच्या सवयीवरच माझ्या या नव्या कल्पनेची मदार होती. या एका सवयीनेच राजाचा कळप माझ्या तावडीत सापडेल अशी मला जबर आशा वाटत होती. तरी राजाला मात्र माझी ही युक्ती कळल्याशिवाय राहणार नाही यावद्दल मला खात्री होती. तोच जर सगळ्यात पुढे आला तर एकही लांडगा या युक्तीला फसणार नाही हे मी पक्के ओळखून होतो. तथापि, वासराचे शीर बाजूला टाकले होते त्याबद्दल मला बराच भरवसा वाटत होता. कारण वासरू वन्य श्वापदाने मारून शीर निरुपयोगी म्हणून बाजूला टाकले आहे, इतका भास त्या सर्व दृश्यामुळे निर्माण झाला होता. तेव्हा एक तरी लांडगा ते शीर हुंगायला जाणार आणि सापळ्यात सापडणार अशीही खात्री वाटत होती.

दुसरे दिवशी उत्सुकतेने मी बाहेर पडलो. राजाच्या खाणा-खुणा सापडल्या आणि त्याने आपल्या कळपाला धोक्याच्या जागेपासून दूर ठेवले होते हेही स्पष्ट दिसून आले, पण त्याच्याबरोबर माझ्या युक्तीला यश आले होते. एक लांडगा जादा कुतूहलाने त्या शिराजवळ गेला होता आणि सापळा उडून त्यात सापडला होता. आम्ही त्या मार्गावर निघालो. सुमारे एक मैलाच्या आतच सापळ्यासकट रखडत, धडपडत चाललेला एक लांडगा आम्हाला दिसला. आम्ही तेथे पोहोचेपर्यंत तो एका खडकावर जाऊन उभा राहिला होता. आम्ही जवळ जाऊन पाहिले. तो लांडगा नव्हता—लांडगी होती. बंकी म्हणून जिला ओळखत असत तीच ती होती. इतका देखणा लांडगा मी कधीच पाहिला नव्हता. आम्ही जवळ गेल्यावरोवर तिने युद्धाचा पवित्रा घेतला, पण त्याचा काहीच उपयोग नव्हता. ती पक्की जखडली गेली होती. अखेरीस तिने एक डरकाळी फोडली. त्यासरशी दूरवर दमदार डरकाळी ऐकू आली. ती राजाची होती. तीच तिची शेवटची साद. आम्ही जवळ जाऊन ठेपलो होतो आणि तिच्यातही आता शक्ती उरलेली नव्हती.

बंकीचा यातनामय शेवट नजीक आला होता. आम्ही लांबून बंकीच्या गळ्यात लोखंडी साखळीचा फास टाकला. फासाचे दुसरे टोक घोड्यांना बांधले होते. घोडे विरुद्ध दिशेने चालू लागल्याबरोबर फास आवळला जाऊ लागला आणि बंकीचे प्राण बाहेर पडण्यासाठी धडपडू लागले. शेवटी तिच्या तोंडातून रक्त ओघळले, डोळे पांढरे झाले आणि सर्व अवयव ताठ झाले. बंकीचे शव आम्ही आमच्या मुक्कामाकडे नेले. राजाच्या कळपावर आणि साम्राज्यावर केलेला हा पहिला वार होता. हिरण्य रानात मिळालेले पहिले यश घेऊन आम्ही परतत होतो.

हा सर्व प्रकार होईपर्यंत मधून मधून राजाचे ओरडणे ऐकू येतच होते. तो आमच्या दृष्टिपथांत नव्हता, तरी तो जवळपासच घुटमळत होता. दिवसभर त्याचे ओरडणे ऐकू येत होते. तो बंकीच्या शोधात होता. बंकी त्याची जिवाची जोडीदारीण होती याची मला खात्री पटली.

संध्याकाळ झाली तरी राजाचा आवाज ऐकू येत होता. तो आमच्या मुक्कामाच्या जवळपास कोठे तरी होता. पण आता त्याच्या आवाजात एक प्रकारची व्यथा स्पष्ट जाणवत होती. त्याच्या तोंडून नेहमीसारखी हुकुमी व दमदार डरकाळी बाहेर पडत नव्हती. तर जखमी झालेल्या माणसासारखा लांब सूर काढून तो ओरडत होता. 'बंकी बंकी...' असेच जणु काय तो म्हणत होता. आम्ही जेथे बंकीला पकडले त्या जागेपासून तो फारसा दूर नव्हता. पण आम्ही जिथे तिला ठार केले त्या ठिकाणी तो आला, तेव्हा त्याच्या आवाजातील आर्तता ऐकून आम्हाला त्याची दया आली ! ! अत्यंत व्याकुळतेने तो ओरडत होता ! त्याचा दिमाख, सारे क्रौर्य, सारा बादशाही रुबाब गळून पडला होता ! आपल्या सहचारिणीच्या वियोगाने तळमळणारा एक जीव एवढेच त्याचे अस्तित्व होते. बंकी जेथे मरण पावली तेथे सांडलेल्या तिच्या रक्तावरून तिचे काय झाले असावे याची राजाला पुरेपूर कल्पना आली असली पाहिजे.

तो सुगावा काढीत आमच्या मुक्कामापर्यंत आला. बंकी तेथे भेटेल या आशेने तो आला की, सूड घेण्यासाठी आला हे कळायला मार्ग नाही. पण त्याने कशाचीही तमा न बाळगता आमच्या आवारात शिरण्याचा प्रयत्न केला. प्रयत्न केला कशावरून की, आमचे राखणीचे जे दोन कुत्रे होते त्यांना त्यांची चाहूल लागते न लागते तोच त्याने त्या कुत्र्यांच्या अक्षरशः चिंधड्या करून टाकल्या होत्या. त्या रात्री तो एकटाच आला होता हे स्पष्ट दिसत होते आणि तो बेदरकारपणे आणि अविचारीपणाने वाटेल तसा धावला होता. अर्थात हे मला अपेक्षितच होते. म्हणून मी दुसऱ्या दिवशी पुन्हा सगळीकडे सापळे लावून ठेवले; आणि एका सापळ्यात तो सापडलाही होता. पण त्याची शक्ती एवढी अफाट होती की, त्यातूनही तो निसटला होता—स्वतःचे शरीर फाडून घेऊन निसटला होता !

बंकीचे प्रेत सापडेपर्यंत तो तेथे घुटमळणार हे मला कळून चुकले. तेव्हा तो निराश होऊन परत निघून जाण्यापूर्वी आणि त्याची बावचळलेली अवस्था संपण्यापूर्वीच काही प्रयत्न केला तर राजा हाताला लागण्याची शक्यता आहे हे मी ओळखले व त्या दृष्टीने उद्योगाला लागलो.

मी सगळेच्या सगळे, म्हणजे जवळजवळ दीडशे सापळे उपयोगात आणण्याचे ठरविले. आमच्या घराच्या आजूबाजूच्या सर्व भागात ते लावन ठेवले. इतकेच नव्हे तर, त्या सर्व सापळ्यांवरून बंकीचे प्रेत फरफटत नेले. एक दोन ठिकाणी तिच्या पावलांचेही ठसे उमटविले.

दुसरे दिवशी उत्तरेकडील भागातून बातमी आली की, त्या बाजूला गुरांमध्ये मोठी खळबळ माजली आहे. दुपारी मी त्या बाजूला गेलो. मी जवळ जातो तो भला मोठा लांडगा जमिनीवरून उठून उभा राहिला. सुटण्यासाठी तो खूप धडपड करीत होता, पण व्यर्थ ! चार सापळ्यांच्या पकडीत हिरण्य जंगलाचा सम्राट 'राजा' पुरा

बंदिवान झाला होता. राजा शूर होता, मर्द होता. म्हणूनच त्याने आपल्या प्रेयसीचा शोध अखेरपर्यंत चालू ठेवला. त्याला कशाचीही तमा नव्हती–भीती नव्हती. तिच्या शवाचा अंदाज लागल्यावर त्याने ते हुडकून काढण्यासाठी अविरत धडपड केली. मागचा-पुढचा विचार केला नाही आणि त्या व्यथेच्या धुंदीतच तो सापळ्यात पकडला गेला. त्याने सुटकेसाठी खूप धडपड केली होती, पण थकून जाण्या-पलीकडे त्यापासून काहीही निष्पन्न झाले नव्हते. तरीही मी जवळ येताच त्याने आपली मान हिसडली आणि मोठी डरकाळी फोडली. पुन्हा एकदा ते रान राजाच्या दमदार डरकाळीने दणाणून गेले. आपल्या भाईबंदांना मदतीसाठी घातलेली ही अखेरची साद होती. मी त्याला बंदुकीने स्पर्श करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा एवढ्या त्वेषाने त्याने बंदुकीची नळी तोंडात धरून हिसडली की, त्या नळीवर त्याच्या दाताचे वण उमटले. त्याचे डोळे त्वेषाने आणि द्वेषाने जळजळीत व हिरवे दिसत होते. मला खाऊ का गिळू असे त्याला झाले होते. आपला जबडा उघडून तो माझ्या नरडीचा घोट घेण्याच्या विचारात होता. जबडा उघडल्यामुळे त्याचे भयानक सुळे स्पष्ट दिसत होते. हा त्याचा रुद्रावतार पाहून माझे घोडे तर थरथर कापू लागले होते. परंतु इतक्या धडपडीनंतर राजा अतिशय थकून गेला आणि जमिनीवर पडून राहिला.

नित्याप्रमाणे साखळीचा फास टाकणे भाग होते. मी त्याप्रमाणे फास टाकला, पण तो त्याच्या मानेत अडकण्यापूर्वीच त्याने तो जबड्यात पकडून काडकन् चावून तोडून टाकला. एवढी ताकद दुसऱ्या कोणत्याही लांडग्यात मी पाहिली नव्हती. शेवटी बंदूक खराब होऊ नये म्हणून मी बंदूक वापरण्याचा बेत रद्द करून दुसरा फास आणवला. यावेळी प्रथम एक काठी त्याच्याकडे फेकली. अशा रीतीने त्याचा जबडा गुंतल्याबरोबर मी फास टाकला आणि तो बरोबर बसला. फास कसा आवळावा याचा विचार करीत होतो तोच राजाला तसाच जिवंत पकडून न्यावा असे मला वाटले.

म्हणून त्याच्या जबड्यात पुन्हा काठी देऊन दोरीच्या सहाय्याने त्याचा खालचा व वरचा जबडा मी बांधून टाकला. आता तर तो पूर्णपणे निष्क्रिय झाला होता. जबडा बांधून टाकल्यावर मात्र त्याने प्रतिकार करण्याचे सोडून दिले. त्याच्या डोळ्यातला त्वेषही मावळला आणि काही एक आवाज किंवा 'गुरगुर' न करता तो शांतपणे आमच्या हालचालींकडे पाहत राहिला. त्या क्षणापासून आमच्याशी काही एक कर्तव्य नाही अशा भावनेने तो पडून राहिला.

त्याला सर्व बाजूंनी चांगले बांधून जखडून टाकले, पण त्याने हू का चू सुद्धा केले नाही. आम्ही सर्वांनी मिळून त्याचे धूड घोड्यावर घातले. त्याचे डोळेही आता निवळले होते. श्वासही आता एकाच गतीने चालू होता. पण तो आमच्याकडे पाहत नव्हता. दूर रानाकडे आपल्या मावळत्या साम्राज्याकडे——एकटक नजरेने तो पाहत होता. आम्ही आमच्या मुक्कामावर येईपर्यंत त्याने आपली नजर हलविली नाही.

घरी आल्यावर राजाला भक्कम अशा साखळदंडाने बांधून टाकले आणि त्याच्या दोऱ्या सोडून टाकल्या. त्याच्यापुढे मी मांस व पाणी ठेवले. पण त्याने तिकडे ढुंकूनही पाहिले नाही. तो स्वस्थपणे पुढचे दोन पाय पुढे पसरून पडून राहिला होता. दूर कुठेतरी नजर लावून बसला होता. मी माझ्या हाताने त्याला स्पर्श केला, तरी त्याने तिळभरही हालचाल केली नाही. संध्याकाळ झाली तरी त्याने आपली दूर लावलेली नजर काढली नाही. रात्री तो आपल्या कळपाला साद घालील अशी अपेक्षा होती व त्या दृष्टीने आम्ही कळपाचा समाचार घेण्याची व्यवस्था केली होती, पण राजाने मुळीच साद घातली नाही.

सिंहाची शक्ती, गरुडाचे पंख आणि हंसाची मादी यांचे हरण केले असता ते ते प्राणी अपमान सहन न होऊन मरण पत्करतात असे म्हणतात. राजाच्या बाबतीत तर त्याची शक्ती व मादी या दोन्हींचे हरण केले गेले होते ! आणि त्याच्यासारख्या शूर सम्राटाला हा अवमान कदापीही सहन होण्यासारखा नव्हता. सकाळी उठून पाहिले तो राजा रात्री ज्या स्थितीत पडलेला होता त्याच स्थितीत राहिला होता. त्याने आपले शरीर हलविले नव्हते की दूरवर लावलेली नजर हलविली नव्हती. पण त्याचे प्राण मात्र गेलेले होते ! हिरण्य जंगलाचा सम्राट बंदिवासात मरण पावला होता !!

——मी त्याच्या गळ्यातील साखळी काढून टाकली आणि त्याचे शव पडवीत, बंकीच्या——त्याच्या प्रेयसीच्या——शवाजवळ नेऊन ठेवले. बंकीला भेटण्याची त्याची आशा अखेरीस अशा अवस्थेत पुरी झाली !!!


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किंमत सात रुपये

राजहंस प्रकाशन

# पाक्षिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## दि. १ ते १५ फेब्रुवारी १९७४

### सत्ताधारी श्रेष्ठांना अडचणीची परिस्थिती

या पंधरवडयात मंगळ, रवी व गुरू हे महत्त्वाचे ग्रह बदलत आहेत. मकर ही भारताची रास आहे. पंतप्रधान इंदिरा गांधीं, श्री. यशवंतराव चव्हाण यांचा या राशीबरोबर संबंध आहे. दि. १२ रोजी कुंभ राशीत रवी हा राजकारणी धर्माचा ग्रह येत आहे. सत्ताधारी कांग्रेस पक्ष लोकक्षोभाने भूकंपासारखा हादरून जाणार आहे. पंतप्रधानांना संयम अजिबात उरणार नाही. त्या जास्तीत जास्त अडचणीत येण्याची शक्यता आहे. सुब्रम्हण्यम, यशवंतराव, धारिया, कमलापती त्रिपाठी, स्वर्णसिंग व जगजीवन बाबू यांच्या खात्यात बदल होण्याची चिन्हे दिसू लागतील, किंवा बदल होईल. ब्रह्मानंद रेड्डी केंद्रसरकारात नाखूष होतील. लोकांची स्थिती आजच्यापेक्षा वाईट होईल. गुजराथ, महाराष्ट्र, म्हैसूर, बिहार या राज्यात मंत्रीमंडळात उलथापालथ होईल असे दिसते. वसंतराव नाईक पुन्हा अडचणीवर मात करतील. पण त्यांना सत्ता नकोशी होईल. सीमा प्रश्न बाजूला पडेल. संघटना काँग्रेस, जनसंघ व डावे कम्युनिस्ट यांना भारतात भुसभुशीत जमीन सापडेल. राष्ट्रपती गिरी व पंतप्रधान यामध्ये मतभेद निर्माण होतील. जागतिक राजकारणाला कलाटणी मिळणारी एखादी भीषण घटना या काळात घडणार आहे. महाराष्ट्रात नव्या नेतृत्वाची चाहूल लागेल.

**मेष** : गुरुकृपा कमी होणार.

मंगळासारखा एक समर्थ ग्रह ह्या पंधरवडा अखेरपर्यंत आपल्या राशीवर प्रभूत्व गाजवणार असल्यामुळे आपल्या कर्तृत्वात कोणतीच उणीव निर्माण होणार नाही. अजून त्याचे नेतृत्व तुमच्याकडेच राहाणार आहे. नोकरी असो की धंदा असो, कलाक्षेत्र असो की क्रीडाक्षेत्र असो राजकारण असो की समाजसेवेचे क्षेत्र असो तुम्ही आघाडीवरच राहाल यात संशय नको. पण दि, ९ फेब्रुवारीपासून गुरूसारखा एक सात्विक व तेजस्वी ग्रह तुमच्यावरील कृपा कमी करणार आहे याची दखल तुम्ही घेणे आवश्यक आहे. गुरूची अवकृपा म्हणजे स्वैरविचाराला मोकळे रान, गुरूची अवकृपा म्हणजे बौद्धिक अराजक होय. मांगल्य विवेक, उदात्तता यांना रजा देणेच होय. आपणास सारी भिस्त ठेवावयास हवी ती शनी-मंगळावर. ते मात्र तुमच्या आशा आकांक्षांना अजून तरी अनुकूल साथ देणार आहेत. प्रामुख्याने कोणतीही गोष्ट करताना सावधगिरी बाळगा. तूर्त असलेली नोकरी सोडण्याच्या भानगडीत पडू नये. बदलीची मागणी केली तरी आग्रह धरू नये. वरिष्ठांबरोबर मतभेद होतील वा वाढतील असे काहीही न करणे बरे. कोणताही लेखी करार वा व्यवहार करावयाचा झाला तर तो दि. ९ पूर्वी करा. लग्न ठरवायचे वा ठरलेले लग्न पार पाडायचे झाल्यास ते पहिल्या आठवडयातच पार पाडा. येणे वसूल करावयाचे झाल्यास तेही वरील दिनांकापूर्वी करा. शेती, शेतीची अवजारे खते या संबंधीचा कोणताही उद्योग नव्याने करण्याची संधी मिळेल. प्रवासाचा बेत पुढे ढकला. परीक्षेत काळजीपूर्वक पेपर लिहा. **महिलांस** : मनातील कोणतीही गुप्त गोष्ट कुणाकडेच बोलू नका. पैसा जपून वापरा. नोकरीत साधारण अनुकूलता. ¤

**वृषभ** : राजकारणात प्रतिष्ठा

वृषभ राशीच्या व्यक्तीचे भवितव्य नेहमीच चढउताराने भरलेले असते. कधी अनपेक्षित यशाचे शिखर गाठले जाते तर कधी अपयशाचे भागीदार व्हावे लागते. पण ही रास शुक्रधर्माची असल्यामुळे या राशीच्या व्यक्ती कधी उपेक्षित राहात नाहीत. त्यांची उपेक्षा करण्याचा जर हितशत्रूंनी प्रयत्न केला तर त्यांना यश येत नाही. या पंधरवडयात दि. ९ रोजी गुरू कुंभ राशीत म्हणजे तुमच्या दशमस्थानी प्रवेश करणार आहे. त्यानंतरच आपले सारे व्यावसायिक तंत्रच बदलून जाणार आहे. कुंभ राशीतील गुरू अनेक दिव्य भव्य असा पराक्रम घडवून आणतो. याचा प्रत्यय जरी आपणास लगेचच आला नाही तरी त्याची चाहूल मात्र याचवेळी लागणार आहे. तुम्ही राजकारणात वावरत असाल तर तुमच्याभोवती दुसऱ्या आठवडयात भव्य वलय निर्माण होणार आहे. तुमच्या कर्तृत्वाला नवा आशय प्राप्त होणार आहे. तुम्ही सध्या खासदार असाल तर एखाद्या महत्त्वाच्या पदाची माळ तुमच्या गळयात पडणार आहे. तुम्ही एखाद्या महत्त्वाच्या निवडणुकीत उभे असाल तर तुमचे यश निश्चित आहे. प्रामुख्याने तुमची प्रतिष्ठा उंचावणारा असाच हा काळ आहे. मंगळाचे तुमच्या राशीतील नजीकच्या काळात होणारे राश्यांतर तुमच्या जीवनाला नवे रूप देणारे ठरेल. नव्या व्यवसायाचे प्रामुख्याने सौंदर्यप्रसाधनाशी संबंधीत अशा व्यवसायाचे याचवेळी जपावे. आर्थिक परिस्थितीची काळजी आता संपुष्टात येणार आहे. लगेच जरी विपूल पैसा हाती आला नाही तरी बँकेची कृपा तुमच्यावर होणार आहे. लेखनावर आपणास यावेळी समाधानकारक पैसा मिळेल. तब्येतीला देखील आरोग्य लाभेल. **महिलांस** : नोकरीत नवी जबाबदारी स्वीकारावी लागेल. पण पुढील काळात त्याचा फायदा होईल.

¤

## मिथून : अध्यात्मिक यश

साडेसातीच्या कुंपणातून तुम्ही सध्या प्रवेश करीत आहात. पण साडेसातीचा हा दुसरा कालखंड तुम्हाला तेवढासा वाईट जाणार नाही याची खात्री बाळगा. या पंधरवड्यात दि. ९ रोजी गुरू तुम्हाला कुंभ राशीत प्रवेश करून भाग्यवृद्धीकारक होत आहे. त्याचप्रमाणे रवीदेखील गुरूबरोबर दि. १२ पासून साथ करणार आहे. मात्र पंधरवड्याच्या शेवटी मंगळ व्ययस्थानी येत आहे. या एकंदर ग्रहरचनेच्या व्यूहाची आपण नीट कल्पना करून घेऊन त्याप्रमाणे पावले टाकली तर याचाही लाभ घेता येईल. गुरू हा आध्यात्मिक वृत्तीचा ग्रह आहे. तो भाग्यस्थानी तेरा महिन्यांनी येत आहे. आपल्यासारख्या बुद्धीप्रधान ध्येयवादी आणि वैचारिक कर्तृत्व असलेल्या व्यक्तीचे भावी जीवन हा गुरू अघटीत असे चमत्कार घडवून यशस्वी करणार आहे. धार्मिक व मंगल अशा क्षेत्राशी तुमचा निकटचा संबंध येणार आहे. आंतरिक प्रवृत्ती तेजस्वी बनणार असून या वेळी तुम्ही उच्चारलेल्या शब्दाला मोठे महत्त्व प्राप्त होणार आहे. नोकरी व्यवसाय, धंदा सामाजिक व राजकीय कार्य यात आजवर अतृप्त व अर्धवट राहिलेल्या आशा आकांक्षा आता आकार घेणार आहेत. त्याला अनुकूल असे क्षेत्र गवसणार आहे. नोकरीत नव्या अधिकाराची एखादी जागा तुमच्यासाठी तयार करण्यात येऊन तुमच्या कर्तृत्वाला वाव देण्यात येईल. आर्थिक स्थिती सुधारेल. पण बाराव्या मंगळाचे प्रताप दि. १० नंतर जाणवू लागतील. जमीन खरेदीचा व्यवहार करताना काळजी घ्या. **महिलांस :** गुरूची अनुकूल छाया आता तुमच्यावर पडत आहे. महत्त्वाकांक्षा सफल होतील. ☐

## कर्क : अकल्पित अर्थलाभ

चंद्राच्या चांदण्याची शीतलता तुमच्या अंतःकरणात असते तर त्याचे चंचलत्व तुमच्या स्वभावात असते. सौंदर्य हा कर्क राशीचा एक जबरदस्त धर्म आहे. व्यक्तिमत्त्व अत्यंत आकर्षक असणे हे कर्क व्यक्तीचे खास वैशिष्टय आहे. पण मित्र हो, दि. ९ रोजी तुम्हाला असलेली गुरूची साथ संपुष्टात येणार असून तुमचा आधार दुरावणार आहे. तेव्हा महत्त्वाचे जे जे काही करावयाचे ते या आठवड्यात उरकून घ्या. आधीच तुम्हाला साडेसाती आहे. त्यात गुरूचे वर्चस्व संपले तर प्रथम गोंधळ निर्माण होतो तो तुमच्या वागण्यात, वर्तनात व आचारात. या वेळी तुम्हाला मुद्दाम इशारा द्यावासा वाटतो तो हा की आपली मित्रमंडळी व बरोबरचे लोक तपासून घ्या. कुणावरही विश्वास ठेवू नका. व्यसने, चैनबाजी यांच्या आहारी जाऊ नका. तुम्हाला कोणतेच व्यसन नसेल तर ते लागणार नाही याची काळजी घ्या. यावेळी तुम्ही क्षुल्लक कारणाने संतापणार आहात. आशाभंग, निराशा पदरी येण्याची, अपमान होण्याची बरीच शक्यता आहे. पण ग्रह प्रतिकूल असले की त्याला इलाजही नसतो. धैर्याने हे सहन करा. रोज गुरुचरित्र वाचीत जावे. मनःशांती मिळेल. नोकरीत आपले काम की आपण याच्याशिवाय कुठे लक्ष देऊ नये. वरिष्ठांबरोबर लीनतेने वागावे. आर्थिक बाबतीत मात्र हा काळ छान आहे. वारसदारीने संपत्ती मिळेल. लॉटरीत, रेसमध्ये तुमची 'श्रीमंती' जन्माला येईल. **महिलांस :** भांडण व स्वभावातील तुसडेपणा टाळा. नोकरीत अपमान होण्याची शक्यता वाटते. ☐

## सिंह : प्रतिष्ठा उंचावेल

अनेक दिवसापासून प्रत्येक ठिकाणी तुमची कोंडी झाली होती. राजकारणात तुम्ही उपेक्षेचे धनी बनला होता. अनेक ठिकाणी कर्तबगारीला बंधन पडत होते. मला आता कळवायला आनंद वाटतो की दि. ९ पासून गुरूसारखा एक तेजस्वी ग्रह तुमच्यावर कृपा करीत आहे. त्याचप्रमाणे तुमचा सामर्थ्यवान रवीदेखील गुरूबरोबर भ्रमण करणार आहे. हे दोन्ही ग्रह तुमचे सारे तंत्र व मंत्रही बदलून टाकणार आहेत. तुम्ही जर सत्तेवर असलात तर तुमच्यावर मोठी जबाबदारी पडणार आहे. तुमची आजवर जी एक सुप्त महत्त्वाकांक्षा होती ती सफल होणार आहे. एखादे अतिशय महत्त्वाचे स्थान की ज्यामुळे तुमचा प्रभाव एकदम वाढावा असे तुम्हाला लाभणार आहे. दि. ९ नंतर नोकरीत बढती, प्रमोशन, उच्च पदावर बदली असे काही तरी घडावे. ज्यांना एखादा रासायनिक, केमिकल असा उद्योग सुरू करायचा असेल त्याने तो यावेळी करावा. नव्या उद्योगाच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक ते सारे मिळू शकेल. दुसरे महत्त्वाचे एक तुमच्या बाबतीत घडेल ते म्हणजे नोकरीतील महत्त्वाच्या कामानिमित्ताने परदेशी प्रवास. तुमचा लग्नाचा विचार असेल तर दि. ९ नंतर तो सफल होईल. तुम्ही प्रेमात पडला असाल तर त्याला गोड फळे येणार आहेत. संसारातील कटुता, अडचणी संपून नवे प्रसन्नतेचे पर्व तुमच्या जीवनात सुरू होईल. तुम्हाला प्रतिष्ठेने जगता येईल. लोकप्रियता वाढेल. **महिलांस :** पुत्रजन्माचे मंगल सुख उपभोगण्याची संधी येणार आहे. नोकरीत बढती, बदलीची शक्यता. ☐

## कन्या : आशादायक वातावरण

गुरुचे यशांतर हे यावेळच्या काळाचे एक महत्त्वपूर्ण असे वातावरण आहे. तुमच्या जीवनात नवे युग, नवे पर्व सुरू होणार असून सर्वच बाबतीत काही तरी दिव्य-भव्य असे तुमच्या बाबतीत घडावे. मात्र या ग्रहांबरोबरच तुम्हाला प्रयत्न देखील करावेच लागतील. सांगावयाचे ते एवढेच की आता तुम्हाला अनुकूल असे एक वातावरण तयार होत आहे. त्याचा फायदा घ्या. आजवर विशेषतः गेले वर्षभर नोकरी व्यवसायात तुम्हाला अनेक प्रतिकूल धक्के बसले. नोकरीत वरिष्ठांची खप्पा मर्जी झाली. व्यवसायात आर्थिक माघार घ्यावी लागली. हे सारे आता विसरून जावे. येणाऱ्या सुवर्ण युगाची तत्परतेने दखल घ्या. या बदलाला सामोरे जा, स्वागत घडेल. कामाचे स्वरूप बदलेल. वरिष्ठांची सहानुभूती लाभेल. एखादा तुमचा धंदा थांबला असेल तर पुन्हा मूर्त स्वरूप धारण करील. अनेकांचे सहकार्य लाभेल. विरोधक मित्र बनतील. रवी हा देखील सहावा कुंभ राशीत येत आहे. आणि मंगळासारखा उग्र ग्रह दि. १५ रोजी भाग्यस्थानी येत आहे. आजाराने हैराण केलेले तुमचे मन व शरीर आता कार्यक्षम बनणार आहे. नवा उत्साह व नवे तेज तुमच्या कर्तृत्वात निर्माण होईल. हातून भरपूर लेखन होईल. राजकारणात नवे नेतृत्त्व मिळेल. प्रसिद्धी व कीर्ति माळ घालील. आशा-आकांक्षा बहरून येतील. अनुकूल क्षेत्र लाभेल. **महिलांस :** ज्यांना लग्न करावयाचे असेल त्यांनी दि. ९ पूर्वी ते उरकून घ्यावे. नोकरी, धंद्याची स्थिती सुधारेल. ☐

## तूळ : प्रगतीकडे वाटचाल

या पंधरवड्यात गुरु, रवी व मंगळ हे अंतरिक्षातील तीन महत्त्वाचे ग्रह बदलत आहेत. राश्यांतर करीत आहेत. त्याचे अनुकूल प्रतिकूल असे परिणाम तुम्हालादेखील सहन करावे लागणार आहेत. पण यावेळी तुमच्या-वाटचाला अनुकूलता जास्त येणार आहेत. विशेषत: सर्वच बाबतीत प्रतिकूल व उपेक्षित वातावरण विरून जाणार असून आशा व प्रसन्नता याचे एक नवे युग तुमच्या जीवनात सुरू होणार आहे. गेल्या वर्षी तुमच्या आशा आकांक्षाचा वृक्ष करपून गेला होता. वठला होता. पण आता पाचवा गुरु दि. ९ पासून या वृक्षाला नव्या उन्मेषाची पालवी निर्माण करील. महत्त्वाकांक्षेला बहर आणील. तुमच्या कलागुणांना सोन्याचा स्पर्श होईल. अंगभूत असे तुमचे ललित गुण पुन्हा तेजाने तळपू लागतील. चित्रपटसृष्टीत तुम्हाला रस असेल तर तेथे तुम्हाला प्रवेश मिळेल. तुम्ही सध्या या क्षेत्रात असाल तर यावेळी तुम्हाला अफाट मागणी येईल. तुमच्या अभिनयाला प्रसिद्धी मिळेल. तुम्ही गायक व संगीताचे उपासक असाल तर दि. ९ नंतर तुमच्या या तपश्चर्येला नवे उपकारक असे क्षेत्र लाभणार आहे. तुमची मैफल गाजणार आहे. नोकरीत तुमचे चीज होईल. वरिष्ठांची मर्जी संपादन होईल. तुम्ही स्वत: देखील वरिष्ठ बनाल. सरकारी नोकरीत असाल तर उत्तमपैकी स्थानांतर घडेल. वरिष्ठ जागी नेमणूक होईल. वकिलीचा व्यवसाय भर-भराटीला येईल. परीक्षेत मोठे यश मिळेल. बेकारांची बेकारी संपून त्यांना उत्कृष्ट नोकरी मिळेल. इंजिनियर व कृषीपदवीधर यांना चांगली संधी मिळेल. **महिलांस :** गुरुची अनुकूलता लाभत आहे. मन मोकळे करून नव्या कल्पनेला सामोरे जा. लग्नाचा योग आहे. ¤

## वृश्चिक : बंगल्यांची प्राप्ती

आजकाल शहरात एकवेळ 'छोकरी' मिळेल पण जागा मिळणार नाही. पण या बाबतीत मित्र हो, तुम्ही अतिशय भाग्यवान ठरणार आहात हे मला आनंदाने सांगावेसे वाटते. कारण दि. ९ फेब्रुवारीला गुरु तुमच्या गुखस्थानी येत आहे तर रवी दि. १२ रोजी येत आहे. हे कुंभ राशीतील ग्रह तुमचे गुख वाढवणार आहेत. तुमची जागेची चणचण व वणवण थांबवणार आहेत. अर्थातच ज्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणे हा बदल घडणार आहे. ज्याची बंगल्यात राहायची तयारी असेल त्यांना तो मिळेल व ज्यांना साधी खोली हवी असेल त्याला ती मिळणार आहे. तुमच्यापैकी जे कोणी आजवर मातृसुखाला वंचित झाले होते ते आता भाग्यवान ठरणार आहेत. जमीन व घरासंबंधी जर वाद असेल तर तो यावेळी सुटणार आहे, वारसा तुम्हाला मिळणार आहे. एखाद्या स्त्री कडून धनदौलत मिळेल असे ग्रहमान आहे, नोक-रीची स्थिती एकंदरीत सुधारेल. मात्र कामाचा ताण फार वाढणार आहे. रजेवर असलेल्या दुसऱ्याची कामे तुम्हाला करावी लागणार आहेत. नोकरीत लहानप्रमाणात स्थलांतर घडण्याची शक्यता आहे. स्वतंत्र कोणताही धंदा काही प्रमाणात आकारता येईल. नवा धंदा सुरू होईल. चालू उद्योगा-तील पेचप्रसंग सुटू लागतील. तुम्ही मोठे कारखानदार असाल व उद्योगपती व्यापारी असाल तर कामगारांनी तुमच्या सर्व व्यव-हाराला घातलेला घेराव सुटेल. तुमच्या अनेक व्यवहारातील तंटेबखाडे तडजोडीने सुटू लागतील. तुम्ही एखाद्या संप घेराव प्रकरणी गुंतलेले असाल तर त्यातून तुमची सुटका होईल. मिळकतीचे पगाराचे झालेले नुकसान भरून येईल. नोकरीत मात्र तूर्त बदल करू नये. कोर्टात कोणतीच केस नेऊ नये. प्रवासाला हा पंधरवडा चांगला नाही. नवे वाहन घेता येईल. मात्र यावेळी तुमची मन:स्थिती सतत व्यग्र राहील. काहिना काही कारणाने मन उचंबळत राहील, खळबळत राहील. **महिलांस :** चार पैसे हाती येतील ते सुखाने वापरा. बंगल्यात राहायची इच्छा पुरी होईल. ¤

## धनू : कर्तबगारीला उठाव येईल.

गुरुच्या सात्विक धैर्याचा तुमच्यावर मोठा प्रभाव असतो. तुमच्या राशीचा स्वामीदेखील तोच आहे. पण त्यांची प्रतिकूलता असली की सर्वच बाबतीत तुमची कोंडी होते. अप्रियता वाटचाला येते. चांगल्या कामाला व वाग-ण्याला कटू फळे येतात. असाच अनुभव तुम्ही गेले वर्षभर घेतला आहे. आता दि. ९ पासून तुमच्या राशीचा हा मालक तुमच्यावर कुंभ राशीत तिसरा येऊन कृपा करीत आहे. अत्यंत अनुकूल अशी ही परिस्थिती तुमच्या वाटचाला येत आहे. मात्र आता तुम्ही आपला स्वभाव बदलणे आवश्यक आहे. तुम्ही आता संशोधन करा म्हणजे तुम्हाला आपल्या चुकांचे परिमार्जन करता येईल. तुमचा बदललेला स्वभाव तुम्हाला सुधारता येईल. तुम्ही नोकरीत वरिष्ठ जागी असाल तर तुमच्या-कडून अनेक माणसे दुखावली गेली आहेत त्यात आता सुधारणा करा. ज्यांच्यावर तुम्ही अवकृपा केली त्यांना पुन्हा विश्वासात घ्या. त्याला काहीतरी सुख द्या. तुमच्या वागणुकी-मुळे ज्यांचे नुकसान झाले त्यांना मदत करा. कारण हा गुरू तुमच्या जीवनात व मनात चांगले घडवणार आहे. तुमचे मन 'सुमन' बनवणार आहे. तुमच्या जीवनात यश आणि सफलता याचा नेत्रदीपक संगम होणार आहे. तुमचे व्यक्तिमत्त्व आकर्षक बनणार आहे. या पंधरवड्याच्या उत्तरार्धात नोकरीत बढ-तीचा व प्रमोशनचा योग येईल. प्रकाशन व्यवसाय, इंजिनियरिंग, बँकिंग यात काम करणाऱ्यांना शुभदायक असा हा काळ आहे. प्लॅस्टिक, इमारती बांधकाम, औषधी उद्योग, फर्निचर, बायडिंग, छपाई इत्यादी नवे धंदे चालू करावयाला हा काळ उत्तम आहे. घरात एखादे मंगल कार्य ठरेल. नात्यात वा भावंडांत लग्नकार्य ठरेल. त्यात भाग घेणे आवश्यक होईल. आर्थिक परिस्थितीच्या बाबतीत अकल्पित लाभाला यावेळी फार महत्त्व आहे. राजकारणाचे क्षेत्र तुमच्या कर्तबगारीने ढवळून निघेल. निवडणुकीत यश निश्चित आहे. लेखनात यश. परिचय वाढेल. **महिलांस :** सार्वजनिक कामांत मोठा मान मिळेल. सेवेचे चीज होईल. सरकारी मानाचा योग आहे. ¤

## मकर : अडखळत वाटचाल

दीर्घकालीन एखाद्या राशीत वास्तव्य करणाऱ्या ग्रहांचे जेव्हा बदल होतात तेव्हा ते त्या त्या व्यक्तीच्या जीवनातही परिणाम-कारक ठसा उमटवीत असतात. गुरू हा तुमच्या राशीत तसा काही बलवान नाही. पण त्याचे स्थानमहात्म्य कमी लेखून चालत नाही. आता हा गुरू दि. ९ फेब्रुवारीपासून तुमची रास सोडणार आहे. कुंभ रास तो पुनीत करणार आहे. ही रास तुम्हाला दुसरी असून ती शनी धर्माची आहे. हा दुसरा गुरू

तुमची आर्थिक परिस्थिती समाधानकारक अशी सुधारणार आहे. दुसरा रवी दि. १२ ला होते आहे. हे दोन्ही ग्रह काही नवे तुमच्या बाबतीत घडवणार आहेत. पण ते सारे अडखळत व अडवणुकीतून मार्ग काढीत घडणार आहे. आर्थिक परिस्थिती सुधारेल याचा अर्थ कर्जावर गुजराण करावी लागणार आहे. फक्त ते मिळण्यास अडचणी येऊन देखील मिळू शकेल. उसने पैसे कुणाला देऊ नका. तुम्ही भिडस्त माणसे आहात. त्यामुळे या बाबतीत काळजी घेतली नाही तर कुणाच्यातरी जाळयात अडकाल. लेखी व्यवहार जपून करा. पैसे देण्याघेण्याचे व्यवहार डोळयात तेल घालून करा. तुमच्यावर अफरातफरीचा आरोप येण्याची शक्यता आहे. नोकरीत वरिष्ठांबरोबर हुज्जत घातल्याखेरीज काही मिळणार नाही. पण तडजोडही करावी लागेल. काही वेळा अपमानाचा प्रसंग येईल. तुम्ही एखाद्या नव्या योजनेचा पाया घालणार असाल तर दि. १० ते १४ हा काळ चांगला आहे. तरीपण ज्यांच्याकडून आर्थिक सहाय्य मिळावयाचे ते थोडे अडवून धरतील. तूर्त आहे ही नोकरी सांभाळा. बदल करू नका. चालू उद्योगधंद्यात नवे कोणतेही धाडस करू नका. प्रामुख्याने लोखंड व तेल यांच्यासंबंधी जे उद्योग आहेत त्यात काही अडचणी निर्माण होतील. व्यापारात त्रास होईल. विवाहाची तयारी असेल तर तो ९ फेब्रुवारीपूर्वी करा. कौटुंबिक सुख मिळेल. **महिलांस :** संतती नसणाऱ्यांना पुत्रसुखाचा आनंद मिळेल असा योग आहे. नोकरी करणाऱ्यांना शुभवार्ता मिळेल. ¤


**पूर्णिया**

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन


## कुंभ : दैवाला गती येईल.

कुंभ राशीच्या भाग्यवान महापुरुषांना या वेळी मला ज्योतिषशास्त्राच्या आधाराने एक शुभवार्ता कळवायला आनंद होत आहे. ही वार्ता म्हणजे गेली १३ महिने तुमच्या राशीला अक्षरशः व्ययस्थानी बसून तुमच्या राशीला लागलेला गुरु तुम्हाला वरदान देण्यासाठी दि. ९ रोजी तुमच्या चंद्राकडे येणार आहे. हा गुरू तुमचे सारे दैव बहरून टाकणार आहे. गेल्या वर्षात जेवढे म्हणून त्याने वाईट केले तेवढेच तो आता ठीक करणार आहे. त्रास, अडचणी, अपयश, असफलता अप्रसन्नता, दुःस्थिती व वणवण ही सारी आता इतिहासजमा होतील. आता तुमच्या बाबतीत दैवाची गती सुलटी होणार आहे. जे हाती घ्याल त्याचे सोने होणे असेच आता घडणार आहे. दि. १२ रोजी रवी तुमच्या राशीत येईल. त्यापासून काही नवे चमत्कार तुमच्या बाबतीत घडू लागतील. तुमच्या व्यक्तिमत्त्वाला नवे आकर्षक तेज चढणार आहे. सर्व सामान्य माणसाच्या जीवनात त्याला समाधान मिळेल असे काही तरी घडेल. पैशाचा त्रास कमी होईल. श्रमांचे चीज होईल. श्रमांचा योग्य मोबदला मिळेल. संप अगर इतर अडचणीमुळे तुमच्या नोकरीवर जो प्रतिकूल परिणाम झाला होता. तो आता दूर होईल. मालक वा वरिष्ठ तुमच्याबद्दल सहानुभूतीने विचार करण्याच्या मनःस्थितीत येतील. तुमच्या सज्जनपणाची त्यांना खात्री पटेल. बेकारीच्या खाईत तुम्ही चुकून लोटले गेला असाल तर आता त्याचा फेरविचार होईल. आजाराने तुम्हाला घेरले होते. पण आता त्यात सुधारणा दिसू लागेल. रवीमुळे प्रतिष्ठेला उंची येईल. घरात पदोपदी तुमचा अपमान होई तो आता थांबेल. तुमच्या शब्दाला व कृतीला धाक निर्माण होईल. जरब निर्माण होईल. तुमचा मान राखला जाईल. तुम्ही राजकारणात असाल तर तुम्हाला मोठे महत्त्व प्राप्त होणार आहे. मंत्रिपद पदरी पडेल. राजकीय क्षेत्रात तुमच्याकडे महत्त्वाची कामगिरी येणार आहे. आशा-आकांक्षा सफल होण्याचा काळ आता सुरू होत आहे. आर्थिक स्थित्यंतर घडून येणार आहे. **महिलांस :** कुमारिकांचे विवाह झटपट जमून येतील. परीक्षेत त्या उतरतील. व्यक्तिमत्त्व उंचावेल. ¤

## मीन : अडचणीचा काळ

तुमचे सुखस्थान केतू व शनी यांनी दूषीत करून ठेवलेले आहेच त्यात काही उणीव आहे म्हणूनच की काय दि. ९ फेब्रुवारीला गुरू व दि. १२ रोजी रवी बारावे होत आहेत. गुरू हा तुमच्या राशीचा मालक आहे. तो चटकन काही प्रतिकूल घडवील असे नाही. पण रवी शनीचा योग मात्र अनपेक्षित अशा अडचणी निर्माण करीत असतो. दैवगती जेव्हा प्रतिकूल रूप धारण करते तेव्हा परमेश्वर तारक ठरतो. त्याला शरण जाण्याखेरीज आपल्या सारख्यांना दुसरा उपाय कोणता ? तुम्ही रोज गुरुचरित्र वाचा. गायत्री मंत्र १०८ वेळा म्हणा. म्हणजे कोणतीही परिस्थिती सहन करायला हवे असलेले आत्मिक बळ तुम्हाला प्राप्त होईल. तुमच्या पैकी कुणाला रक्तदाब, हृदयविकार, पित्त, गॅस यासारखे जुने आजार असतील तर त्याने पथ्यपाण्यावर लक्ष ठेवून वागावे हे बरे. याचा अर्थ संकटावर संकटे कोसळणार आहेत असे मुळीच नाही. तरीपण कोणतीच गोष्ट धड न घडणे हा देखील त्रासच. पैसा हाती येतांना त्रास होईल. तुम्ही जेथे नोकरीला असाल तेथे ध्यानी मनी नसतांना अडचण उद्भवेल. नोकरीवर परिणाम होईल. बेकारी येईल किंवा पगार कपात होईल. संप वा मंदी यामुळे उद्योगाला तडाखा बसेल. सरकारी नोकरीत महत्त्वाच्या जागी असाल तर तुम्हाला लोकक्षोभाला तोंड द्यावे लागेल. फार वाईट भाषा ऐकून घ्यावी लागेल. तुम्ही राजकीय पुढारी असाल तर अतिशय अप्रीय व्हाल. तुमच्या प्रतिष्ठेला तडा जाईल. मोठेपणाचे अवमूल्यन होईल. मंत्री, आमदार, खासदार वगैरे काहीही असा हा पंधरवडा जपून काढा. बोलताना काळजी घ्या. गैरसमज वाढतील असे काही करू नका. संसारात चमत्कारिक घटना घडतील. निराशा व्यसनाकडे खेचून नेईल. पण संयमाने वागलात तर निभावून जाल. **महिलांस :** अविवाहित स्त्रियांनी जपून वागावे. नोकरीत वरिष्ठांच्या फार जवळ जाऊ नका. वाहन हळू हाका.

# लीना चंदावरकर







# अवांतर

शरद गोखले

ही पोरगी तशी सिकंदर नशिबाची असली पाहिजे. नोंदले जाण्यासारखे यश पदरी नसेल, तर कशी फरफट होते याचा पुरेपूर अनुभव आज बिन्नीला असलेल्या अमिताभ बच्चनने घेतला आहे. चालणारे चित्र चमकत नसेल, खाजगी आयुष्य मचूळ असेल तर कालपर्यंत पत्रकारांच्या आणि चाहत्यांच्या गराड्यामध्ये हिंडणारा कलाकारही कसा विस्मृती प्राय होतो याची झलक वहिदा रेहमान, नंदा यांनी अनुभवली आहे. चलती का नाम गाडी हा एकच घोष माहित असलेल्या फिल्म लाइनमध्ये, जिच्या गाडीने आजपर्यंत कधीच फारसा वेग घेतला नाही अशी ही लीना चंदावरकर सदुसष्ठ पासून श्याहत्तर पर्यंत आपल्याच तोऱ्यात उभी आहे.

अशा अवस्थेमध्ये कलाकार उखडला जातो अशातला भाग नाही. तथापी टिकून राहण्यासाठी त्याला धडपड करावी लागते, तडजोडीला मंजूरी द्यावी लागते. याही बाबतीत ही लीना आपलाच ठेका चालवून आहे. मागेल ती किमत आणि म्हणेन तो नायक असा हेका हमखास चालवणाऱ्या दोघीच आज मुंबईच्या फिल्म लाइनला आहेत. मद्रास-बंगालच्या मिश्रणाचा रसगुल्ला असलेली हेमा मालिनी आणि आपले सारस्वत मराठीपण कटाक्षाने लपवणारी लीना चंदावरकर !

जो हिंदी चित्रपटाशी परिचित आहे त्याला लीना चंदावरकर नाव नवीन नाही हे खरे, पण सहा वर्षामध्ये दहापेक्षा जास्त चित्रे देणाऱ्या लीनाचे एखादे तरी बंपर सोडाच, पण चांगल्यापैकी चाललेले चित्र सांगा असा अवघड सवाल कोणा चित्ररसिकालाच कशाला चित्र पंडीताला जरी विचारला, तरी त्या बिचाऱ्याला अवघडल्यासारखे होईल. आणि तरीही लीना आज एकदम 'टॉप'ला आहे आणि म्हणूनच मी तिला सिकंदर नशिबाची म्हटले आहे.

युसुफ मिया म्हणून तमाम फिल्म लाइनला परिचित असलेल्या दिलीपकुमार बरोबर एखादे तरी चित्र मिळावे म्हणून मी मी म्हणणाऱ्या चित्रतारकांनी धडपड केली, आपली इच्छा या ना त्या रूपाने संबंधीत निर्मीत्यापर्यंत, अथवा जनाब खुद्द युसुफ मियांपर्यंत पोहचवली, आणि तरीही त्यांना दिलीप बरोबर चित्रपट मिळू शकले नाहीत. आणि आपल्याच तोऱ्यात वावरणाऱ्या या पोरीला चक्क युसुफ मियांनी फोन लावला. आणि आपल्याबरोबर बैरागमध्ये काम करण्याची विनंती केली. दिलीपबरोबर काम करण्याची तमन्ना लीनाला जरूर होती. पण तिने आव असा आणला की तिच्यापेक्षा दिलीपलाच तिची गरज आहे. कागदावर दस्तखत करण्यापूर्वी तिने चक्क अख्खी कथा ऐकवायला लावली. दुर्दैवाने हे चित्र जरुरीपेक्षा जास्त रेंगाळले हा भाग अलहिदा. शिवाय स्वत: दिलीप अशा काही धास्तावलेल्या अवस्थेमध्ये आहे की 'बॉबी'ची नशा पूर्ण उतरेपर्यंत बैराग पडद्यावर येणार नाही याची तो पूर्ण काळजी घेऊन आहे. बहात्तर साली दास्तानच्या अपयशाने जायबंदी झालेला दिलीप पडद्यावर यायलाच बिचकतो आहे. गेल्या नोव्हेंबरामध्ये त्याला बैरागच्या एडिटींगच्या वेळी पाहिला होता. चित्र रिलीज करण्याची तमाम तयारी झाली आणि काही भाग पुन्हा चित्रीत करण्याचा हेका दिलीपने धरला. बैरागचे वितरण रेंगाळले. अर्थात बैरागमध्ये आपण दिलीपची नायीका आहोत याची चित्रपट व्यवसायीकांना पुरेपूर माहिती होणे एवढी गोष्ट लीनाच्या हिशेबी पुरे होती. चित्रामध्ये सायराबानू असली तरी तिच्या बरोबर आपले एकही दृष्य चित्रीत होणार नाही याची दक्षता लीनाने घेतली आहे. दिलीप बरोबरचे आपले हे चित्र आपल्याला नायीका म्हणून मान्यता मिळवून देईल अशी लीनाची अपेक्षा आहे.

एखाद्या कलाकाराला, व्यक्तिला आदर्श मानणाऱ्या भाऊक कंपनीमध्ये लीनाचा समावेश होत नसला, तरी रुपेरी पडद्यावरील यशाची चव चाखायला देणाऱ्या सुनिल दत्तबद्दल ती निदान जाहिररित्या तरी आदराने बोलते. दिल अपना और प्रीत पराई हे लीनाचे चित्र तिने पाहिल्यावर चित्रपट या प्रकाराबद्दल तिला आकर्षण

ाटले. चित्रपट पाहणे ही नित्याची बाब होऊन बसली.
युनायटेड प्रोड्यूसर्स मार्फत जी स्पर्धा १९६५ मध्ये आयोजित करण्यात आली त्या स्पर्धेसाठी लीनाने आपला तपशील व तसबिर पाठवली होती. आपल्याजवळ सौंदर्य आहे, सौष्ठव आहे, खाशा ढंगाचे हिन्दी आहे याची लीनाला जाणीव होती. वळून वळून 'पुरुषी नजरेने' मंडळी आपल्याकडे वेडावून बघत राहतात या गोष्टींचा तिला अनुभव होता. आपण निश्चित चित्रतारका होऊ अशी खात्री असलेल्या लीनाला मुंबईला मुलाखतीसाठी बोलावणे आल्यावर डॅडींना पत्ता लागला की पोरीला फिल्म लाइनची आवड आहे. घरून परवाना मिळाला आणि लीना मुंबईमध्ये आली.
ज्या युनायटेड प्रोड्यूसर्ससाठी म्हणून ती मुंबईला आली त्या मंडळीपर्यंत पोचण्यापूर्वीच सुनिल दत्तने लीनाला 'चमीन' या मल्याळी चित्राच्या हिन्दी आवृत्तीसाठी करारबद्ध केले. पुढे चमीनची योजना बारगळली. झटपट पुरे होणारे मन-का-मीत हाती घेण्यात आले. चित्रातील प्रमुख भूमिकेसाठी सुनिलने आपल्या भावाची निवड केली. विनोद खन्नाही याच चित्रामध्ये प्रथम पडद्यावर आला. हिन्दी चित्रपटाच्या नायक नायीकांना जे प्रशिक्षण अभिप्रेत असते ते सर्व शिक्षण या नवीन कलाकारांना देण्यात आले. मन का मीत पडद्यावर आले. भावाचा दांडगा वशिला असूनही सोमदत्तचे हे पहिले आणि अखेरचे चित्र ठरले. नवीनसर नायीकेचे नावही आज आठवत नाही. मनका मीत पडद्यावर आले– कोसळले, तरी या चित्राने एकच नाव तेजाळले लीना चंदावरकर.
पडेल चित्राच्या प्रदर्शनानंतर केवळ चार महिन्यात बाईंनी कोणाही निर्मात्याच्या दाराचे जोडे न झिजवता सहा चित्रपटांच्या करारपत्रावर सह्या ठोकल्या. शिवाय बरोबरचे नायकही आलतू-फालतू नाही. प्रेक्षकांचा प्यार व लाखांच्या रकमेने मोबदला घेणारे धर्मेंद्र, जितेंद्र, संजय, संजीव यासारखे मातब्बर कलाकार. चित्र भले न चालो, लीना चंदावरकर नावाची पत वाढतच राहिली. रामन्ना नावाच्या मद्रासी दिग्दर्शकाने सेक्स क्राइमचा एक नवा फॉर्म्युला आणला होता. लीना चंदावरकर या नावाच्या नटीच्या देहाचे सामर्थ्य जोखणाऱ्या त्या व्यापारी दिग्दर्शकाने हमजोली आणि जवाब या चित्रामध्ये तिचा भरपूर उपयोग करून घेतला.
हमजोलीतले ओलेते नृत्य, किंवा जवाब मधील ओल्या चिखलामधील लीना-जितेंद्रचा प्रणय पाहिलेल्या प्रेक्षकाला रामन्ना संबंधी वेगळे सांगण्याची गरज नाही. लीनाजींच्या हिशेबी जवाबमध्ये मिनाकुमारीची भूमिका होती, एवढी एकच गोष्ट नोंदली असली तरी 'नायकाची प्रेयसी' एवढेच लीनाचे स्थान. याच रुपामध्ये धर्मेन्द्रबरोबर ती रखवालामध्ये वावरली. अगदी अलिकडे आलेल्या आणि यशस्वी चित्रपट असा तिच्या ज्या एकमेव चित्राचा उल्लेख करता येईल त्या अनहोनी या संजीवकुमार बरोबरच्या चित्रामध्येही छान छान कपडे करून वावरणारी, गोड चेहऱ्याची, लव्हाळ कांतीची मुलगी ही लीनाची प्रतिमा कायम राहिली.
अभिनयाची एक वेगळीच हलकी फुलकी झलक तिने फक्त दोनच चित्रांमध्ये दाखविली–सास भी कभी बहू थी आणि हनिमून. या विनोदी प्रवृत्तीच्या दोन चित्रातून तिचे स्वतंत्र अस्तित्त्व जाणवले. दोन्ही चित्रपटांचे तीन तेरा वाजले. विनोदी ढंगाच्या भूमिका लीनाच्या वाट्याला आल्या तर ती निश्चित भाव खाऊन जाते. कॅमेऱ्याने टिपलेली भावनाप्रधान दृश्ये तिच्या चेहऱ्याला पेलवत नाहीत. अभिनयाचा तो केवीलवाणा प्रयत्न हास्यास्पद ठरतो. दिल का राजासारख्या चित्रपटामध्ये राजकुमारसारख्या प्रौढाबरोबर– समुद्रतीरीच्या हलक्या फुलक्या दृश्यातून ती जी मौज आणते त्याचा दहावा हिस्साही न्याय ती गंभीर दृश्यांना देऊ शकत नाही. अर्थात भले-भले ठोकळे वर्षानुवर्षे पचवणाऱ्या हिंदी फिल्मवाल्यांना लीनाचा सुडौल बांधा आणि आकर्षक चेहरा वर्षानुवर्षे मोह घालीत राहीलच. या वर्षीच्या पहिल्या सहामाहीमध्ये लीनाची इमान (संजीवकुमार) व बैराग (दिलीपकुमार) ही दोन 'मोठी' चित्रे पडद्यावर येतील. चित्रपटाच्या यशापयशाचा परिणाम न भोगावी लागणारी–ही एकमात्र नटी चित्रपटांच्या भवितव्यापेक्षा हाती असलेल्या चित्रपटांच्या चित्रीकरणामध्ये आणि संजीवबरोबर इष्क फर्माविण्यात मश्गूल आहे.

## ना मराठी ना कर्नाटकी

या सारस्वताची अवस्था मोठी विचित्र. मराठी मुलखामध्ये अनेकजण त्यांना कन्नड समजतात. तर कोल्हापूर सोडल्यावर लागणाऱ्या अस्सल कन्नड भूमीमध्ये ही मंडळी मराठी म्हणून ओळखली जातात. आज मुंबईमध्ये स्थिरावली असली तरी लीना मूळची धारवाडची. परवाच्या भाषिक दंगलीमध्ये धारवाडला असलेल्या तिच्या घराभोवती गराडा पडला. सर्वानुमते ती मराठी असल्याचा ठराव पास केला गेला आणि वफादार कन्नडियांनी लीनाच्या धारवाडच्या घराची होळी करून टाकली–जय एकात्मता!

## सामना

लीनाची प्रेमप्रकरणे जशी गॉसीपमध्ये चवीने चर्चिली जातात, तशीच तिची भांडणे हाही या मंडळींचा एक जिव्हाळ्याचा विषय. निर्मात्यांशी, कलाकारांशी ती कशी ताठपणे वागते, तिची गाठ घेणे कसे मुष्कील असते आदी वार्तांबरोबर तिच्या आणि नजमा नामे नटीच्या कडाक्याच्या भांडणाच्या वार्ता सर्वत्र प्रसृत झाल्या त्या वेळी एका नवीन पत्रकाराने हनिमून चित्रणाच्यावेळी झालेल्या त्या भांडणावर प्रतिक्रिया विचारली. दोन मिनिटानंतर थंड डोक्याने लीनाने जबाब दिला. कौन ये नजमा? झगडा करनेवाले कमसे कम बराबरके तो होने चाहिये?






पद्मा खन्ना हेमा आणि अमिताभ बच्चन

## छे ! मुमताझ होणे नाही जमणार !

पद्मा खन्नाचे 'सौदागर' हे चित्र येण्यापूर्वी पद्मा खन्ना मुमताझची जागा घेणार असल्याची टिमकी वाजविण्यात आली. अमिताभच्या यशस्वी चित्रांच्या मालिकेने सौदागरचे अपयश त्याच्यापुरते झाकले गेले तरी पद्मा खन्ना मुमताझ होणार अशी हवा पिकवणारी मंडळी थंडावली. पद्मा खन्नानेही आपली झेप हेलनच्या फार पुढे जाऊ शकणार नाही हे ओळखले असावे. 'प्रभात' या महाभंकस चित्रानंतर दो नंबर के अमीर हे चित्र देणाऱ्या निर्माते राम दयाळ यांच्या या चित्रातील पद्माची छबी पाहिली तरी लक्षात येते की पद्मा खन्ना–मुमताझ नाही होणार. पद्मा खन्ना म्हणून वावरली तर मात्र तिला डर नाही.


अमिताभचे त्या वेळी आजच्यासारखे नाव झाले नसले तरी हेमा एकदम फॉर्ममध्ये असताना श्रीधरचे गहरी चाल हे चित्र पडद्यावर आले आणि भरीला जितेंद्र असूनही एकदम साफ झाले. हे चित्र चालते तर हेमा–अमिताभची चार-सहा चित्रे जरूर सेटवर जाती. पण गहरी चाल पडल्यावर अमिताभने पुन्हा तुफानी उचल खाल्ली. जंजीर, अभिमान, नमकहराम. आणि पुन्हा मंडळींच्या डोक्यामध्ये 'हेमा–अमिताभ'चे खूळ शिरले. कसोटी या नवीन चित्रात मिस्टर लम्बू आणि स्वप्नसुंदरी एकत्र येत आहेत. त्याखेरीज सीता और गीता गाजवणाऱ्या रमेश सिप्पी यांनी कलाकारांची जी प्रचंड परेड 'शोले' या आपल्या नवीन चित्रासाठी गोळा केली आहे, त्या परेडमध्ये हेमा–अमिताभ आहेतच. अर्थात पडद्यावर ते कोणत्या स्वरूपामध्ये येतात ते अनिश्चित आहे. कारण याच चित्रामध्ये जया भादुरी नव्हे जया-बच्चनही आहेत.

## विनोद-अंजू

चित्रपटाच्या दर्जाची मिजास संभाळण्याच्या नादामध्ये देव आनंद जंजीर सारखे चित्र घालवून बसला. त्या चित्रातील अमिताभची भूमिका त्याला देण्यात आली होती. पण या इष्क महोब्बतवाल्या गुलाबी नायकाने गाणे नाही म्हणून चित्र नाकारले. या उलट येईल ते चित्र स्वीकारण्याची अशोककुमारची परंपरा संजीव व विनोद खन्ना चालवीत आहेत. आता अचानक सारख्या चित्रपटानंतर 'तीर और तलवार' असले नाव असलेल्या चित्रपटामध्ये विनोदला पहावे लागल्याबद्दल प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केली तरी विनोदला त्याची फारशी दिक्कत नाही. आणि म्हणूनच अंजू सारख्या नटीबरोबर तो तीर और तलवार मध्ये आला तरी त्याला सामोरे जाणे–निदान त्याच्या चाहत्यांना तरी अपरिहार्य आहे.



रेखा । नवीन निश्चल



रीना रॉय । मेहमूद । विनोद मेहरा



येईल तो चित्रपट स्वीकारणे, आणि मिळेल त्या नायीकेबरोबर काम करणे हा एकमेव मार्ग उरलेल्या रणधीरचे जे अनेक चित्रपट चालू आहेत त्यामध्ये ' नयापुराना ' नावाचे एक चित्र आहे. सुदैवाने या चित्राचे चित्रीकरण वेगाने सुरू असून चित्र लवकरच पडद्यावर येईल. पुराणा रणधीर आणि नयी तरल या चित्रामध्ये एकत्र येत आहेत. धोकादायक अवस्थेमध्ये असलेल्या कलाकाराला नवीन नायीका हा एक दिलासा असतो. कारण चित्र चालले तर आपल्या मुळे चालले आणि पडले तर जिम्मेदार नवतारका ! असा विचित्र पवित्रा सोईस्करपणे घेता येतो. रिक्षावाला अगदी केविलवाणे होऊन पडले आणि रणधीरने नितुसिंगकडे बोट दाखवले. आता समजा नया पुराना चालले तर रणधीरची कौतुकाची थाप मात्र हमखास स्वतःच्या पाठीवर पडेल.





विनोद खन्ना । अंजू महेंद्रु

## विनोद-मेहमूद

मेहमूद आणि विनोद मेहरा—या दोघांच्या ' दो फूल ' या चित्राचे चांगले स्वागत झाले. खूप दिवसांनी आलेल्या मेहमूदचे हे चित्र चालले तरी...ॲन्ड मेहमूद या जाहिरात तर्जुम्यातील मौज आता संपली आहे. आज जमाना असरानी—पेन्टलचा आहे. अर्थात निवृत्ती हा प्रकार आपल्या समाजाच्या कोणत्याच भागाला लागू नसल्याने नको असलेला राजकारणी जसा खपवून घ्यावा लागतो तसाच नको असला तरी एखादा राजेंद्रकुमार, अथवा महमूद पहावा लागतो.

रणधीर कपूर
तरल



## नवीन-रेखा

नवीन निश्चल सावन भादोच्या वितरणा नंतर जितक्या झपाटयाने प्रकाशझोतामध्ये न्हाऊन निघाला, तितक्याच झपाटयाने त्याच्या भोवतालचे तेजोवलय नाहीसे झाले. असे सांगतात दीड लाखाच्या घरात मोबदला मागणारा नवीन व्हिक्टोरिया २०३ च्या प्रदर्शनापूर्वी तीस हजारावर घसरला होता. व्हिक्टोरिया आणि त्या पाठोपाठ 'धुंद' चालल्याने पुन्हा त्याची चलती आहे. रेखा ही त्याच्या पहिल्या चित्रातील नायीका—त्याच्या किती तरी पुढे गेली आहे. नवीन चित्रामध्ये प्रथमच एकत्र आलेली रेखा ननीनची जोडी आज पुन्हा एकत्र आली आहे. सायरा बानू बरोबर एक चित्र आणि 'तो मी नव्हेच' या मराठी नाटकावर आधारीत वो मैं नही हे मोहन सैगल यांचे चित्र या बेगमीवर नवीन वाटचाल करतो आहे. तर वाटेत आलेल्या एका चित्रामध्ये रेखा त्याच्या बरोबर काम करीत आहे.


ता.क.
साहेब हा ड्यूटीवर येत नाही. कमरेला विळखा घालून ढकलायला त्याला लाज वाटते म्हणे!
अग, आपला संतप्त महिलांचा मोर्चा आहे अन् तू हंसतेस काय खुळ्यासारखी?
श्यामजोशी

# टॉलस्टॉय-एक माणूस

लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

## पूर्वग्राहक : विनामूल्य भेट : योजना

कागद, छपाई, बांधणी इत्यादींचे भडकते भाव पहाता टॉलस्टॉय-एक माणूस लेखिका : सौ. सुमती देवस्थळे या चरित्रग्रंथाची किंमत अगाऊ निश्चित करता येत नाही. तरी ती रुपये तीस ते चाळीसच्या घरात जावी असा अंदाज आहे. आपण वीस रुपये भरून पूर्वग्राहक म्हणून नोंदणी करावी. ग्रंथ पाठविण्याचा टपाल-पॅकिंग इत्यादी खर्च मात्र आपल्याला करावा लागणार आहे. [ वीस रुपये दोन सारख्या हप्त्यात भरण्याचीही सवलत आपण घेऊ शकता. ]

¤ पाच वर्षांची साप्ताहिक माणूसची किंवा चित्रवार्ता पाक्षिकाची रुपये शंभर ही वर्गणी आपण एकदम भरली तर हा ग्रंथ आपणास विनामूल्य मिळेल. पाठवणी-खर्च आपल्याकडे राहील.

¤ पाच वर्षांसाठी रुपये शंभरची ठेव 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवली तरी हा ग्रंथ विनामूल्य मिळू शकेल. पाठवणीखर्च ठेवीदाराचा.

¤ सव्वाशे रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपण विकत घेतलीत तर हा ग्रंथ विनामूल्य देण्यात येईल. पाठवणीखर्च ग्राहकाचा.

¤ ग्रंथ १९७४ अखेर प्रसिद्ध होईल.

¤ ठेव असल्यास 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्ट किंवा म. ऑ. ने रक्कम पाठवावी.

¤ पाच वर्षांची वर्गणी पाठविणे असल्यास ड्राफ्ट 'व्यवस्थापक माणूस' या नावावर पाठवावा व सोबतच्या पत्रात चित्रवार्ता पाक्षिक किंवा साप्ताहिक माणूस यापैकी कुठला अंक हवा त्याचा खुलासा करावा.

¤ चेकने रक्कम पाठवणाऱ्यांनी वटणावळ म्हणून एक रुपया अधिक पाठवावा.

¤ या टॉलस्टॉय पुस्तक योजनेची मुदत ३१ मार्च १९७४ पर्यंत आहे.

**राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पुणे-४११ ०३० दूरध्वनी : ५७३५९**


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून तेथेच, संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**